CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २४५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



व्यवसायाच्या क्षेत्रात सुद्धा स्वयंसेवकाचे वर्तन इतरांपेक्षा वेगळे दिसले पाहिजे. माझे जे काही काम आहे, ते माझ्या समाजाचे आहे, ते मी उत्तमच करीन, हीच त्याची भावना असली पाहिजे. त्याने संवेदनशील असले पाहिजे. स्वयंसेवकाचे उत्तम वर्तन बघून इतरही त्याचे अनुकरण करतील. अशा पद्धतीनेच सामाजिक परिवर्तन घडेल.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## विनम्र अभिवादन



शीख पंथाचे संस्थापक गुरू नानकदेव यांची आज जयंती

# नगरपरिषदा-नगरपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजला

**● २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला निकाल ● विदर्भातील १०० नप, नपंसाठी होणार निवडणूक**

**मुंबई/नागपूर, ४ नोव्हेबर**

**राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम मंगळवारी जाहीर झाला. याद्वारे ६,८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड केली जाणार आहे. मतदान २ डिसेंबरला व ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. विदर्भात नगरपरिषद आणि नगर पंचायतींचाही यात समावेश आहे. यात अमरावती विभागातील अमरावतीत १२, अकोल्यात ६, बुलढाण्यात ११, वाशीममध्ये ५, यवतमाळ ११, तसेच नागपूर विभागातील भंडारा ४, चंद्रपूर ११, गडचिरोली ३, गोंदिया ४, नागपूर २७ आणि वर्धा जिल्ह्यातील ६ जागांचा समावेश आहे.**

**भंडारा** : जिल्ह्यातील पवनी, भंडारा, तुमसर, साकोली अशा चार नगर परिषदांचा समावेश आहे. भंडारा नगर परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिला, पवनी आणि साकोली ओबीसी महिला व तुमसर नगर परिषदेचे अध्यक्ष नामाप्र पुरुष प्रवर्गासाठी राखीव आहे.

**वर्धा** : जिल्ह्यात वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव, देवळी आणि सिंदी रेल्वे या सहा नगर पालिकांकरिता निवडणूक होणार आहेत.

**वाशीम** : जिल्ह्यात वाशीम, रिसोड, कारंजा, मंगरुळनाथ या नगर पालिकेत तर मालेगाव नगर पंचायतमध्ये निवडणूक होणार आहे.

**बुलढाणा** : जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांची निवडणूक होणार आहे. यात बुलढाणा, चिखली, मेहकर, लोणार, देऊळगावराजा, सिंदखेडराजा, मलकापूर, नांदुरा, शेगाव, जळगाव जामोद आणि खामगाव नगर परिषदेचा समावेश आहे.

**चंद्रपूर** : बल्लारपूर नगरपालिका सर्वात मोठी असून, नगराध्यक्षपद ओबीसी महिलासाठी राखीव आहे. वरोरा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, मूल नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, चिमूर अनुसूचित जाती महिला, घुग्घुस अनुसूचित जाती महिला, तर नगरपंचायतमध्ये जिवती नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, गोंडपिपरी अनुसूचित जाती महिला व सावली नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग

(उर्वरित पान ८ वर)

### निवडणूक कार्यक्रम

| | |
|---|---|
| अर्ज दाखल करण्याची सुरुवात | १० नोव्हेंबर |
| अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख | १७ नोव्हेंबर |
| उमेदवारी अर्जांची छाननी | १८ नोव्हेंबर |
| अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख | २५ नोव्हेंबर |
| मतदान | २ डिसेंबर |
| मतमोजणी | ३ डिसेंबर |

### प्रभाग, सदस्य, आरक्षण

| एकूण प्रभाग | एकूण सदस्य संख्या | महिलांसाठी राखीव |
|---|---|---|
| ३,८२० | ६,८५९ | ३,४९२ |

### खर्चाची मर्यादा वाढली

| | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
|---|---|---|---|
| न. प. अध्यक्ष | १५ लाख | ११.२५ लाख | ७.५० लाख |
| सदस्य | ५ लाख | ३.५० लाख | २.५० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| नगर पंचायत अध्यक्ष | ६ लाख | सदस्य | २.२५ लाख |

### हिवरखेडमध्ये प्रथमच, पातूरला निवडणूक नाही

**अकोला** : जिल्ह्यात तेल्हारा, बाळापूर, मूर्तिजापूर, आकोट आणि हिवरखेड नगर परिषदेची निवडणूक होणार आहे. यात हिवरखेड नगर परिषदेची ही पहिलीच निवडणूक आहे. पातूर नगर परिषदेची निवडणूक प्रक्रिया न्यायप्रविष्ट असल्याने या टप्प्यात येथील निवडणूक होणार नाही.

### १,०७,०३,५७६ मतदार

३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार, नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी राज्यात एकूण १,०७,०३,५७६ मतदार आहेत. या मतदारांमध्ये ५३,७९,९३१ पुरुष आणि ५३,२२,८७० महिला मतदार तर ७७५ पारलिंगी मतदारांचा समावेश आहे.

### एकापेक्षा अधिक मत देणे अपेक्षित

नगरपरिषदेच्या निवडणुकीत बहुसदस्यीय पद्धत असून, एका प्रभागात सर्वसाधारणपणे दोन जागा असतात. एकूण सदस्य संख्येचा विषम आकडा असलेल्या नगरपरिषदेत एका प्रभागात तीन जागा असतात. त्याचबरोबरत थेट अध्यक्षपदासाठीही मतदार होत आहे. त्यामुळे एका मतदाराने तीन ते चार जागांसाठी मत देणे अपेक्षित आहे. एका नगरपरिषदेची एकूण सदस्यसंख्या किमान २० ते ७५ असते. नगरपंचायतीची निवडणूक एकसदस्यीय पद्धतीने होत असली, तरी नगरपंचायतीच्या मतदारानेही दोन मते देणे अपेक्षित आहे.

# सोलापूरच्या असंघटीत कामगारांना राज्य शासनाकडून दिलासा

- १६ कोटी ९३ लाख अनर्जित रक्कम
- ८ लाख कर थकबाकी माफ
- ३० हजार घरांचा प्रकल्पास राज्य शासनाची मंजूरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

सोलापूर येथील असंघटीत कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी अनर्जित, नजराणा रक्कमेसह अकृषिक वापर शुल्कातून सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी येथील दक्षिण सोलापूर येथील रे नगर फेडरेशन आणि संलग्न गृहनिर्माण संस्थांना एकूण २१ हे. आर. ६२ इतकी जमीन शासनाने गृहनिर्माण प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली आहे. या जमिनींची अनर्जित रक्कम प्रति चौरस मीटर एक रूपया या नाममात्र दराने आकारण्यात येणार आहे. या निर्णयानुसार २१ हेक्टर ६२ आर जमिनीवरील १६ कोटी ९३ लाख ८९ हजार ३00 रुपयांची अनर्जित रक्कम तसेच आठ लाख पाच हजार २२४ रुपयांची थकीत अकृषिक कर थकबाकी माफ करण्यात येणार आहे.यामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहर व परिसरातील असंघटीत कामगार, मजूर, लघुउद्योग व सेवा क्षेत्रातील कुटुंबांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना त्याच ठिकाणच्या राखीव जागेत लघुउद्योजकांना परवानगी देवून रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्नही शासनस्तरावरून सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

# विरोधकांच्या शिष्टमंडळाला आयोगाने भेट नाकारली

**नवी दिल्ली, ४ नोव्हेंबर**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला असतानाच, राजधानी नवी दिल्लीत एक मोठा राजकीय संघर्ष उफाळून आला आहे. मतदार याद्यांमधील गोंधळाविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाला केंद्रीय निवडणूक आयोगाने भेटण्यास नकार दिल्याने संतप्त नेत्यांनी आयोगाच्या कार्यालयातच ठिय्या दिला. मतदारयाद्यांमधील घोळासंदर्भात तक्रार करण्यासाठी मनसे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे शिष्टमंडळ केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेण्यासाठी दिल्लीत दाखल झाले. या शिष्टमंडळात खा. अनिल देसाई, अरविंद सावंत, मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई यांच्यासह अतुल लोंढे, राजवी झा यांचा समावेश होता. आमच्या सर्व नेत्यांसोबत आयोगाचे अधिकारी भेट घेईपर्यंत आम्ही कार्यालयातून बाहेर पडणार नाही, अशी ठाम भूमिका घेत सर्वांनी ठिय्या आंदोलन सुरू केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरात आता रात्री २१ ठिकाणी ‘सरप्राईज नाकाबंदी’

## ● वाहतूक पोलिसही असणार मदतीला; चोरी, दरोड्याच्या घटना रोखण्यासाठी निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

विजापूर नाका पोलिसांच्या हद्दीत १५ दिवसांत शस्त्रानिशी हल्ले करून लाखोंचा ऐवज लुटून नेल्याचे दोन गुन्हे घडले. रात्रीच्या वेळी आयटी इंजिनिअरला अडवून लुटणे आणि एका ज्वेलर्स दुकानात दरोड्याचा प्रयत्न झाला. यापूर्वी वसंत विहार परिसरात अशीच घटना घडली होती. या घटनांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलिस ॲक्शन मोडवर आले असून आता दररोज शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकाचवेळी तीन ठिकाणी अचानक नाकाबंदी लावण्याचा निर्णय पोलिसांकडून घेण्यात आला आहे. या नाकाबंदीवेळी पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांसोबत वाहतूक पोलिसही असणार आहेत.

सोलापूर शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने विशेषतः विजापूर नाका पोलिसांच्या हद्दीतील घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. सोलापूर शहरात फौजदार चावडी, एमआयडीसी, जेलरोड, सलगर वस्ती, एमआयडीसी, सदर बझार व जोडभावी अशी सात पोलिस ठाणी आहेत. सध्या दररोज रात्रीच्या वेळी एकाच ठिकाणी नाकाबंदीची कार्यवाही होते. वाहतूक पोलिस व स्थानिक पोलिसांची नाकाबंदी वेगवेगळी होती. पण, आता दररोज प्रत्येक पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या हद्दीत प्रमुख तीन ठिकाणी नाकाबंदी लावावी, ही नाकाबंदी कधी व कोणत्यावेळी तसेच कोणत्या ठिकाणी करण्यात येणार असेल ती अचानाकपणे ठरविण्यात येणार आहे.



तसेच या नाकाबंदीवेळी वाहतूक पोलिस देखील त्याठिकाणी असतील, असेही या बैठकीत ठरले. शहराच्या मध्यवर्ती भागात चोरी, दरोड्याच्या घडू लागल्या आहेत. चोरी गुन्ह्याचे प्रमाण दरवर्षी एवढेच असले तरी त्याचे प्रमाण कमी झालेले नाही. या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरात रात्रगस्त वाढविली जाणार आहे. त्यासाठी स्थानिक पोलिसांसह शहर पोलिस मुख्यालयातील २५ ते ३० अंमलदारांची मदत घेतली जाणार आहे. दिवाळीच्या काळात असाच प्रयोग पोलिस आयुक्तांनी केला होता, त्यामुळे सणात चोरी, दरोड्यासारख्या घटना घडल्या नाहीत. त्या पद्धतीने आता दररोज तीन ठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रात्रीच्या वेळी असे आवाहन पोलिसांनी केले आहे. कोणीही विनाकारण बाहेर फिरू नये असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



> सोलापूर शहरात आता रात्रगस्त वाढविली जाणार असून त्यासाठी मुख्यालयातील अंमलदारांचीही मदत घेतली जाणार आहे. याशिवाय सातही पोलिस ठाण्याच्या हद्दीत अचानक नाकाबंदी लावाणार आहे. जेणेकरून रात्री गुन्हे घडणार नाहीत.
> **- विजय कबाडे, पोलिस उपायुक्त, सोलापूर शहर**

# जिल्ह्यातील ३ साखर कारखान्यांचे गाळप परवाना अर्ज फेटाळले

### पंधरवड्यात कारखान्यांचा गाळपाचा होणार धडाका सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

१ नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील यंदाच्या ऊस गाळप हंगामाला सुरुवात झाली आहे. बहुसंख्य कारखाने सुरु झाले असले तरी अनेक कारखान्यांना साखर आयुक्तांकडून अद्याप गाळप परवाना मिळालेला नाही. यापैकी काही कारखान्यांनी याबाबत अर्ज ही केलेला नाही, आतापर्यंत सोलापुरातील प्रादेशिक कार्यालयाकडे जवळपास ३५ कारखान्यांनी अर्ज केलेला आहे. त्यापैकी सोमवारी १५ कारखान्यांचे अर्ज साखर आयुक्तालयाकडे पाठविण्यात आले आहेत.

तर सिध्देश्वर, गोकुळ आणि जयहिंद साखर कारखान्याने मागील वर्षीची एफआरपी अद्याप दिलेली नाही; त्यामुळे त्यांचे गाळप परवान्याचे अर्ज प्रादेशिक कार्यालयाने फेटाळले आहेत. शासनाने आदेशीत केल्याप्रमाणे पूरग्रस्तांना प्रति टन ५ रुपये तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५ रुपये आणि स्व. गोपीनाथ मुंडे महामंडळाला प्रति टन ३ रुपये भरणा केल्याशिवाय गाळप परवाना दिला जाणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले आहे, त्यानुसार आता अनेक कारखान्यांनी सदर रक्कम भरायला सुरुवात केलेली आहे. जस जसे प्रस्ताव येतील तसतसे गाळप परवानगीसाठीचे प्रस्ताव साखर आयुक्त कार्यालयाला पाठविण्यात येतील, अशी माहिती प्रादेशिक कार्यालयाने दिली. आजतागायत सोलापूर विभागातील अवघ्या ४ साखर कारखान्यांनाच परवानगी देण्यात आली असून, १५ कारखान्यांचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, या पंधरवड्यात इतरही कारखान्याचे प्रस्ताव पूर्ण होवून ३५ पर्यंत साखर कारखाने चालू होण्याची शक्यता प्रादेशिक कार्यालयाकडून व्यक्त करण्यात आली.

## ▶▶ महत्वाचे...

### रस्ते अपघातात दुचाकीवरील एकाचा मृत्यू तर एक जखमी

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

सोलापूर ते मोहोळ रस्त्यावरील चिंचोळी एमआयडीसीजवळ झालेल्या रस्ते अपघातात दुचाकीवरील एकजण मरण पावला तर एक जखमी झाला. रणजित दिलीप खराडे (वय ३२, रा. उपळाई बु, ता. माढा) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. तर माधव संतोष नकाते (वय ३५, रा. उपळाई बु, ता. माढा) असे जखमींचे नाव आहे. माधव नकाते व रणजित खराडे हे दोघे ३ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास सोलापूर ते मोहोळ दुचाकीवरून जात होते. त्यावेळी चिंचोळी एमआयडीसी येथील वासुदेव ढाब्याच्या अलिकडे रस्ते अपघातात दोघेही जखमी व बेशुध्दावस्थेत मिळून आले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरु असताना ४ नोव्हेंबर रोजी पहाटे दीडच्या सुमारास रणजित खराडे यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. अक्षय इमडे यांनी घोषित केल. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

---

### पिकावर फवारणीचे औषध तोंडात गेल्याने दोघे अत्यवस्थ

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

पिकावर फवारणीच्या विषारी औषध तोंडात गेल्याने दोघांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैशाली बसवराज नरोटे (वय २६, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर) या ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कुंभारी येथील माहेरी असताना चुकून पिकाला फवारणीचे औषधाचे टोपन काढताना औषध तोंडात गेल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत मल्लिकार्जुन सिद्रामप्पा बादोले (वय ६२, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) हे ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी डोंबरजवळगे (ता. अक्कलकोट) येथील शेतात पिकावर फवारणी करीत असताना फवारणीचे औषध नाका तोंडात गेल्याने त्यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# मोकाच्या गुन्ह्यातून एकाची जामीनावर मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

संघटित गुन्हेगारीच्या (मोक्का) कायद्यानुसार दाखल गुन्ह्यातुन अनिसअहमद रंगरेज याची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांनी जामीनावर मुक्तता केली. अनिसअहमद रियाजअहमद रंगरेज (वय ३३, रा. सोलापूर) असे जामीन मिळालेल्याचे नाव आहे. यास कोल्हापूर जामीन मंजूर केला.

२ जुलै २०२५ सुमारास सोहेल सय्यद हा नई जिंदगी सोलापूर येथे असताना यातील आरोपी अनिसहमद व इतर आरोपींनी हात उसने दिलेले पैसे परत मागण्याचे कारणावरून त्याला लाथाबुक्क्यांनी व चाकूने मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. अशा आशयाची फिर्याद सोहेल याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून पोलिसांनी अनिसहमद यास अटक केली होती. तपासा दरम्यान पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारीच्या (मोक्का) कायद्यानुसारआरोपी विरुद्ध कलम वाढ केली होती.

त्यावर अनिसअहमद याने सत्र न्यायालयात जामीन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर आरोपी अनिसअहमद याने कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीच्या वेळी आरोपीच्या वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीशांनी २० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. यात सरकार तर्फे ॲड एस एस चौधरी यांनी तर आरोपीतर्फे ॲड रितेश थोबडे, ॲड राजकुमार मात्रे यांनी काम पाहिले.

# कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारी पिकअप जीप इलेक्ट्रिक पोलला धडकली

### ▶▶ घटना पाहून आरडाओरड करणाऱ्या महिलेचा विनयभंग; तिघांवर गुन्हा
### ▶▶ मंगळवारी पहाटे साडेचारची लक्ष्मी मार्केट परिसरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

शहरात कत्तलीसाठी चोरट्या मार्गाने जनावरे घेऊन येणारी भरधाव पिकअप जीप चालकाने इलेक्ट्रिक पोलला धडकवली. यावेळी आरडाओरड करणाऱ्या महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन (एमएच १६ ए वाय ७३६९) पिकअप जीपचा चालक जहिर अब्बास मैनुद्दीन कुरेशी (रा. शुक्रवार पेठ, सोलापूर), एमएच १३ ईक्यू ३६९८ या दुचाकीवरून दोन अनोळखी व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ नोव्हेंबर रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास यातील पिडीत महिला ही तिच्या घरासमोर उभी होती. त्यावेळी एमएच १६ एवाय ७३६९ या पिकअप जीपचा चालक जहीर कुरेशी याने त्याच्या ताब्यातील पिकअप जीप ही निष्काळजीपणे चालवून पिडीतेच्या घराजवळील इलेक्ट्रिक पोलला जोरदार धडक दिली. यामुळे इलेक्ट्रिक पोलचे व त्यावरील वायरी खाली पडून नुकसान झाले. धडक दिल्यानंतर पिकअप जीपची पाहणी केली असता पिकअप जीपच्या मागील हौदात ६ काळ्या रंगाच्या जर्सी गायी होत्या. या जनावरांच्या चारा-पाण्याची सोय न करता त्यांना क्रूरतेची वागणूक देत कत्तलीसाठी या जनावरांची वाहतूक होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पिडीता ही जोरात आरडा ओरड करीत होती. त्याचवेळी पिकअप जीपच्या पाठीमागून एमएच १३ ईक्यू ३६९८ क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या अनोळखी व्यक्तींनी पिडीतेच्या तोंडावर हात ठेवत तिला लज्जा वाटेल असे कृत्य केले. त्यामुळे तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

# लेप्रसी कॉलनीत तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

शहरातील लेप्रसी कॉलनीतील जीवन विकास नगर येथे तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. साईनाथ दयानंद आयवळे (वय ३१, रा. जीवन विकास नगर, लेप्रसी कॉलनी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या पूर्वी राहत्या घरी अज्ञात कारणावरून साईनाथ आयवळे याने छताच्या लोखंडी हुकला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी साईनाथ यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जी एल काळे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजेंद्र सैनी यांनी साईनाथ यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शेतीच्या वादाच्या कारणावरून सख्ख्या भावांना मारहाण

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

कुरघोट येथे शेतीच्या वादाच्या कारणावरुन सख्ख्या भावांना मारहाण करण्यात आली. रोहन भारत गाडेकर (वय १९) आणि रोहित भारत गाडेकर (वय २१, रा. कुरघोट, ता. दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास कुरघोट येथून रोहन गाडेकर व रोहित गाडेकर हे दोघे दुचाकीवरून सोलापूरकडे जात असताना अहिल्यादेवी मंदीराजवळ शेतीच्या वादाच्या कारणावरून अर्जुन शिवप्पा घोडके याने चालत्या गाडीवरून ओढून पाडून लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. दोघांनाही उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

घरगुती वादातून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न केला. श्रुतिका आकाश गायकवाड (वय २२, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ६, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. ३ नोव्हेंबर रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास राहत्या घरी श्रुतिका हिने घरगुती वादातून घरातील थॉयरॉडच्या २० ते २५ गोळ्या खाल्याने त्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे पती आकाश याने श्रुतिकाला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**विशेष सहाय्य योजनेअंतर्गत...**

# दिव्यांग लाभार्थीच्या अर्थसहाय्य रक्कमेत वाढ

### तहसीलदार शिल्पा पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य दरमहा १ हजार ५०० रुपये वरुन २ हजार ५०० करणेत आले आहे.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदीरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदीरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदीरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेच्या दिव्यांग लाभार्थ्यांना यापूर्वी १५०० रु.अनुदान दिले जात असे. परंतु शासन निर्णयान्वये माहे ऑक्टोंबर २०२५ पासून डीबीटीव्दारे २५०० रु. अनुदान




वितरीत केले जात असल्याचे संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदार शिल्पा पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

परिपत्रका नमूद केले आहे की, जे लाभार्थी दिव्यांग आहेत परंतु त्यांना माहे ऑक्टोंबर २०२५ पासून २ हजार ५०० अनुदान प्राप्त न होता केवळ १ हजार ५०० रु. अनुदान प्राप्त झाले आहे; अशा लाभार्थ्यांनी तसेच सर्व दिव्यांग लाभार्थी यांनी पुढीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे घेवून यावीत. यामध्ये दिव्यांग प्रमाणपत्र व युडीआयडी कार्डची छायांकित प्रत, आधारकार्ड छायांकित प्रत, बँकेचे पासबुकचे छायांकित प्रत, मोबाईल नंबर (मोबाईल नंबर व आधारकार्ड ज्या बँकेच्या खात्याला लिंक केला असेल त्या बँक खात्यात सदर अनुदान जमा होणार आहे, शिधापत्रिका छायांकित प्रत. संबंधित तहसिल कार्यालयाच्या संजय गांधी शाखेत अथवा संबंधित गावचे तलाठी यांचेकडे तात्काळ जमा करावेत. जे लाभार्थी आवश्यक कागदपत्रे जमा करणार नाहीत ते लाभार्थी वाढीव अनुदानापासून वंचित राहतील याची नोंद घ्यावी. विशेष सहाय्य योजनेचे दिव्यांग लाभार्थी हे अनुदानापासून वंचित राहू नये यासाठी लाभार्थ्यांनी आपली कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाचे संजय गांधी शाखा अथवा संबंधित गावच्या तलाठ्याकडे जमा करावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासन यांचेकडून करण्यात आले आहे.

# भारत विकास परिषदेतर्फे पुसेगाव येथे १६ नोव्हेंबरला होणार दिव्यांग शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, दि. ४ नोव्हेंबर -**

भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्र पुणे आयोजित दिव्यांग शिबीर रविवार १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता प.पू. श्री.सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्ट, पुसेगाव (ता.खटाव) येथे होणार आहे. या शिबिरात दिव्यांगांसाठी मोफत कृत्रिम, अत्याधुनिक मॉड्युलर पाय व हात ३०० दिव्यांगांना देण्यात येणार आहे. सातारा जिल्ह्यातील गरजु दिव्यांगांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सातारा जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे यांनी केले. यावेळी सातारा सिव्हिल हॉस्पिटलचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे उपस्थित होते.

पुसेगाव येथील दिव्यांग शिबिर रोटरी क्लब ऑफ पुना वेस्ट,विलो फाऊंडेशन, पुणे यांच्या सी.आर एस. निधीतून ३०० दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय व हात दिले जाणार आहेत, अशी माहिती भारत विकास परिषद दिव्यांग केंद्र पुणे यांचे पुसेगाव शिबिर प्रचार साहित्याचे समन्वयक व प्रचार प्रमुख, पत्रकार विनायक भिसे यांनी दिली.

यावेळी दिव्यांग शिबिराचे प्रसारासाठी डॉ. महेश खलिपे व डॉ. युवराज करपे यांचे हस्ते माहिती पत्रक व भित्तीपत्रक बॅनरचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी भारत विकास परिषद सातारा शाखेचे सचिव प्रकाश बडदरे, समन्वयक मदन जांभळे, हणमंत नलावडे व ज्ञानेश्वर गजधरणे आदी उपस्थित होते.

सातारा जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत विभागाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी संजय जगताप व जिल्हा समाज कल्याण अधिकारी विद्यानंद चल्लावार यांनीही दिव्यांग शिबिरासाठी जास्तीत जास्त दिव्यांगांना सहभागी करणेसाठी सहकार्य करणेचे आश्वासन दिले. या शिबिरासाठी दिव्यांगांनी पूर्व नोंदणी करणे आवश्यक असून त्यासाठी कुलकर्णी (९४२२०२९९४६) अथवा विनोद (९८८११३८०५२) यांच्याशी संपर्क साधावा.

# ‘तू प्रेम मागितले, मी तुला चाफा दिला’

### ▶▶ सुखात होतो तेव्हा डोक्यात कुणाच्या सललो नाही...
### ▶▶ गझल महोत्सवाचा थाटात शुभारंभ





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

तू आलीस की समुद्र होतो माझा तू गेलीस की वाळू होते.. तुझे चालले होते कख शिकणे तेव्हा माझे बीए चालू होते. अशा विविध गझला आणि गीते हुतात्मा स्मृती मंदिरच्या रंग मंचावर सादर करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित तीन दिवशीय गझल महोत्सवाचे उदघाटन सोमवार दि. ३ नोव्हेंबर रोजी हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राध्यापिका नसिमा पठाण, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, सांस्कृतिक विभागाच्या अधिक्षक जानव्ही जानकर, समन्वयक अमोल धाबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मी उगाच मुंबईत काढला बराच काळ पण पुण्यात प्रेम लागले मिळायला. असे बालपण नव्हते माझे कोणीही येवून मुका घ्यावा असे गालपण नव्हते माझे. जीव घेणारी तुझी स्पर्धा जिथे मी येत आहे दुसरा. नको नको ते करून बसलो आहे आयुष्यात उठून बसलो आहे. अशी गझल आणि गीत कवन प्रस्तुत अक्षर अक्षर तुझेच आहे यामध्ये अपूर्व राजपूत, अविनाश काठवटे, सारंग पांपटवार आणि नैनेश तांबे यांनी सादर केले. तर संगीत संयोजन राग आणि प्रकाश योजना ईशान-गार्गी यांनी केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात गझल रंग यामध्ये वीनल देशमुख, तुप्ती दामले आणि उमेश साळुंखे यांनी कार्यक्रमात बहार आणली.

प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे गीत सादर करण्यात आले त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी बोलताना प्राध्यापिका नसिमा पठाण यांनी गझल दीप आहे श्वास आहे विश्वास आहे असे सांगून सोलापूर मध्येही अनेक गझलकार आहेत आणि त्यांचे गझल सादर केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. इरेश स्वामी यांनी आपल्या मनोगतामधून सांगितले. अलीकडच्या पिढीला गझलची अधिक माहिती आहे. गझल अधिक कळते अशी पिढी आजची आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभीच सानप यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे समन्वयक अमोल धाबळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि संचालक विभिषण चवरे यांच्या प्रयत्नातून हा तीन दिवशीय गझल महोत्सव सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरात सुरू झाला. रसिक श्रोत्यांनी या आजच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाला चांगली गर्दी केली होती.

# जन्म-मृत्यू कार्यालयात अनेक अर्ज प्रलंबित

### दाखले तातडीने द्या ; संभाजी ब्रिगेडचे महापालिका उपायुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

जन्म मृत्यू नोंदणी विभागाकडून जन्म मृत्यू बाबतची अनेक अर्ज मागील काही महिन्यापासून प्रलंबित आहेत. घरी मयत झालेले मृत्यू दाखले, बाळाचे नाव दाखल करणे, दुरुस्ती करिता करण्यात आलेल्या अर्ज गेल्या काही महिन्यापासून आजतागायत निकाली निघाले नाहीत. दाखले त्वरित मिळावेत, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

जन्म मृत्यूचे एकूण अर्जाची संख्या दहा ते बारा हजार पेक्षा अधिक प्रलंबित आहेत . त्यामध्ये बाळाचे नाव दाखल करणे अर्ज १ हजार पेक्षा अधिक प्रलंबित आहे. व घरी मयत झालेले मृत्यू दाखला मिळण्यासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे घालावे लागत आहेत. सामान्य नागरिकांचे अर्ज दोन ते तीन महिन्यापासून प्रलंबित ठेवले जातात.

जन्ममृत्यू ऑफिस मधील अधिकारी ऑपरेटर व एजंटावर तत्काळ कारवाई करण्यात यावी.सोलापूर शहरातील सामान्य नागरिकांची होणारी पिळवणूक थांबवून त्यांच्या अडचणी लवकरात लवकर दूर कराव्यात, अन्यथा संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे , महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे, श्रेयश माने, महिला कार्याध्यक्ष जयश्री जाधव, सुनंदा सूर्यवंशी, सुनिता कारंडे, सिद्धांम्मा तपले, जानकाबाई पाटील, रुक्मिणी चिल्लाळ, शिवलीला दुबलगुंडे, अंबाबाई चलगेरी, अंबू मुंगळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### मंगळवेढ्यात अज्ञात कारणावरुन तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा दि.४ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरातील भगरे गल्लीत एका ३४ वर्षीय तरुणाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन राहते घरात कापडी फेट्याच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून याची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.३ रोजी सायंकाळी ५ च्या पुर्वी खबर देणारे विकास भगरे यांचे मयत चुलत भाऊ अमोल गणपत भगरे (वय ३४) याने राहते घराच्या दुसऱ्या मजल्यावरील स्लॅबच्या खोलीत छताच्या हुकास कापडी फेट्याच्या सहाय्याने गळफास घेवून अज्ञात कारणावरुन आत्महत्या केली. सुधीर भगरे,सोमनाथ भगरे, प्रशांत ओमने,शहाजी जाधव या सर्वांनी मिळून अमोल यास खाली उतरवून उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे घेवून गेले मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून ते उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगीतले. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान एका तरुण व्यक्तीने टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र शहरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

### आंधळगाव परिसरातून १२ शेळ्या पळविल्या

**मंगळवेढा दि.४ नोव्हेंबर-**

आंधळगाव परिसरातून एका शेतकऱ्याच्या १ लाख २० हजार रुपये किंमतीच्या १२ शेळ्या चोरट्याने चोरुन नेल्या असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी तथा शेतकरी सतिश पाटील (रा.धरणवाडी) यांच्या दि.२ रोजी १२ शेळ्या घराबाहेर बांधून फिर्यादी झोपी गेले होते. दि.३ च्या सकाळी ६ वाजता फिर्यादी हे उठून घराबाहेर आल्यावर बांधलेल्या शेळ्या दिसल्या नाहीत. फिर्यादीने घराच्या आजूबाजूला व परिसरात शोध घेतला असता शेळ्या मिळून आल्या नाहीत त्यामुळे फिर्यादीची खात्री पटली की चोरट्याने १ लाख २० हजार रुपये किंमतीच्या १२ शेळ्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी चोरुन नेल्या असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान चोरट्याने आपला मोर्चा आता शेतकऱ्यांच्या शेळ्यावर व उत्पादीत केलेल्या मक्यावर, ड्रीप पाईप, पाण्याचा टँकर याकडे वळवला आहे.

### रड्डे परिसरातून १९ वर्षीय नवविवाहिता बेपत्ता

**मंगळवेढा दि.४ नोव्हेंबर-**

रड्डे परिसरातून एक १९ वर्षीय नवविवाहिता बेपत्ता झाली असल्याची तक्रार तिच्या पतीने पोलीसात केली असून पोलीस त्या बेपत्ता महिलेचा कसून शोध घेत आहेत. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी,दि.१ रोजी रात्री ९ वाजता पती-पत्नी व मुले जेवणखाण करुन रात्री खोलीमध्ये झोपी गेले होते. मध्यरात्री १२ च्या सुमारास विवाहितेच्या पतीस जाग आली असता पतीला त्याची पत्नी झोपलेल्या ठिकाणी दिसून आली नाही, म्हणून तिचा घरा शेजारी व गावात नातेवाईकाकडे सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याने पोलीसात तक्रार पतीने दाखल केली आहे. आधिक तपास पोलीस करीत आहेत.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

शेअर मार्केटमध्ये झालेले कर्ज फेडण्यासाठी माहेरकडून १ लाख रुपये घेवून ये म्हणत विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ केला.याप्रकरणी पती, सासू सासऱ्यावर सदर बझार पोलिसांत मंगळवारी दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना विवाहितेच्या सासरी २८ ऑक्टोबर २०२० ते ७ सप्टेंबर २०२५ दरम्यान केशन नगर,पिंपरी चिंचवड पुणे या ठिकाणी घडली. याबाबत पल्लवी मल्लेश दिवेकर (वय ३० रा. उत्तर सदर बझार, कुंभार गल्ली, मौलाली चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती मल्लेश महादेव दिवेकर ,सासरे महादेव, सासू सुमित्रा(रा.पुणे)यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहिता सासरी नांदत होती. त्यावेळी आरोपींनी विवाहितेस तुझ्या माहेरच्या लग्नात मानपान केला नाही.तसेच लग्न झाल्यापासून मुल न झाले नाही म्हणत आरोपींनी विवाहितेच्या पतीचे दुसरे लग्न करून देण्याची धमकी दिली. तसेच पती मल्लेश यास शेअर मार्केटमध्ये झालेले कर्ज फेडण्यासाठी तुझ्या आई वडिलांकडून १ लाख रुपये घेवू ये असे म्हणून शिवीगाळ,व मानसिक त्रास दिला आहे. असे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अंमलदार इनामदार हे करीत आहेत.

### देवदर्शनासाठी आलेल्या महिलेचा ५१ हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

एक महिला भाविक देवीच्या दर्शनासाठी आल्या होत्या. त्यानी सोन्याचे कानातील झुबे व रोख रक्कम असे एकुण ५० हजार ७०० रुपयांचा ऐवज असलेली पर्स जीपमध्ये ठेवली होती. ती पर्स जीपमधून अज्ञाताने लंपास केला,याप्रकरणी सदर बझार पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३ नोव्हेंबर रोजी पावणे तीनच्या सुमारास सिव्हिल हॉस्पिटल,महालक्ष्मी मंदिराच्या बाजूला असलेल्या पार्किंगमध्ये घडली आहे. याबाबत मंगल चंद्रकांत जानगवळी (वय ४० रा. किसान नगर,अक्कलकोट रोड सुतमील सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगल जानगवळी या ३ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणे तीन च्या सुमारास सिव्हिल हॉस्पिटल परिसरात असलेल्या महालक्ष्मी देवीच्या दर्शनासाठी जीपमधून आल्या होत्या. त्यांनी जीप मंदिराच्या पाठीमागील बाजूस पार्क केली होती. त्या जीपमधील मधल्या सीटवर ५० हजार रुपये किंमतीचे कानातील झुबे व ७०० रुपये पर्स ठेवली होती. फिर्यादी दर्शन करण्यासाठी गेल्या होत्या. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी महिलेची नजर चुकवून जीपमधून पर्स गायब केली आहे.

### बालाजीनगर ग्रामपंचायत निधीतून खरेदी केलेले पाणी फिल्टर सरपंचाने शेतात बसविले

**मंगळवेढा, दि.४ नोव्हेंबर-**

लमाणतांडा (बालाजीनगर) येथील सार्वजनिकरित्या गावाला शुध्द पाणी पीता यावे म्हणून ग्रामपंचायत निधीतून खरेदी केलेले पाणी फिल्टर चक्क सरपंचाने स्वत:च्या शेतात बसविल्याचा धक्कादायक प्रकार घडला असून या घटनेची संपूर्ण चौकशी करुन संबंधीतावर कारवाई करण्याची मागणी ग्राम पंचायत उपसरपंच व अन्य सदस्यांनी गटविकास अधिकारी डॉ.जास्मिन शेख यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे. या घटनेची हकीकत अशी,लमाणतांडा (बालाजीनगर) येथील सार्वजनिकरित्या गावाला शुध्द पाणी पीता यावे म्हणून ग्रामपंचायत विकास निधीतून ते पाणी फिल्टर खरेदी केलेले होते. फिल्टर चालू असताना ते बदलून निव्वळ वैयक्तीक लाभासाठी पुन्हा वित्त आयोगाच्या रकमेतून गेल्या वर्षी नव्याने पाणी फिल्टर खरेदी केले आहे. या घटनेमध्ये ग्रामपंचायत उपसरपंच व सदस्य यांची दिशाभूल करुन पहिले खरेदी केलेले फिल्टर ग्रामपंचायतमध्ये ठेवले असे भासवून ग्रामपंचायत मालकीचे फिल्टर स्वत:च्या शेतात बसविले असून या घटनेची संपूर्ण चौकशी करुन फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा अशी लेखी मागणी उपसरपंच अश्विनी श्रीकांत पवार,ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत बाबुराव चव्हाण, तुळसाबाई रघुनाथ राठोड,हरिश्चंद्र फुलसिंग राठोड,श्रीकांत नंदकुमार पवार, विजय दशरथ पवार आदी सात जणांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. दरम्यान या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

# जि.प.च्या निवडणुकीसाठी मतदार यादी निश्चित

### अंतिम आरक्षणाविरुध्दच्या दहा हरकती फेटाळल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाकडून मंगळवारी राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतीच्या निवडणूका जाहीर करण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेतील सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवार ३ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी निश्चित करण्यात आली.

याशिवाय यापूर्वी जिल्हा परिषद मतदारसंघासाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाविरुध्द दाखल करण्यात आलेल्या दहा हरकतीही विभागीय आयुक्तांकडून फेटाळण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची तयारी करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आतापर्यंत मतदार नोंदणी अभियान व दुरुस्ती घेण्यात आली. या निवडणुकीसाठी अपेक्षित असलेली मतदार यादीही सोमवारी अंतिम करण्यात आल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यालयाकडून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. गणाकरिताही आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या आरक्षणाविरोधात दहा तक्रारांदारांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे हरकती घेतल्या होत्या. गटात व गणात आरक्षण चुकीच्या पध्दतीने पडले असून त्यात दुरुस्ती होण्यासंदर्भातच्या हरकती यावेळी घेण्यात आले होते. विभागीय आयुक्त यांच्याकडे याप्रकरणी सुनावणी होऊन सोमवारी या सर्व हरकती फेटाळण्यात आल्या. त्यामुळे यापूर्वी जिल्हा प्रशासनाने केलेल्या गट व गणाच्या आरक्षणानुसारच निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



# अतिवृष्टी नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक कोळेगाव येथे आज दाखल झाले होते. यावेळी त्यांनी झालेल्या नुकसानीची पाहणी केली तसेच बंधाऱ्याचे नुकसानीचीही पाहणी केली. या पथकात केंद्र शासनाच्या विविध विभागाचे चार वरिष्ठ अधिकारी सहभागी आहेत.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे व इतर अधिकारी उपस्थित होते. या केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यामध्ये केंद्रीय ग्राम विकास अवर सचिव



अभिषेक कुमार, ऊर्जा विभागाचे उपसंचालक करन सरीन, वित्त विभागाचे उपसचिव कंदर्फ पटेल, आणि जलशक्ती विभागाचे संचालक सत्येंद्र प्रताप सिंग उपस्थित होते. यावेळी केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची ही संवाद साधला. तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी, पुराची घेतली तसेच त्यामुळे झालेल्या अतिवृष्टी, पुराची घेतली तसेच त्यामुळे झालेल्या नुकसान बाबतही जाणून घेतले.

# पोलिसांनी व्हॉटसअपच्या आधारे हरवलेल्या बालिकेला केले वडिलांच्या स्वाधीन

### केवळ अर्ध्या तासात फत्ते केली शोधमोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.४ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरातील दामाजी चौकात एक अडीच वर्षीय बालिका फिरताना मिळून आल्याने तिच्या पालकांना पोलीसांनी केवळ व्हॉटसअपच्या माध्यमातून अर्ध्या तासात शोध घेवून कुटूंबियाच्या ताब्यात दिले.

या घटनेची हकीकत अशी,दि.४ रोजी सायंकाळी ७ वाजता दामाजी चौकातील श्री संत दामाजी पुतळ्याजवळ अशीया नामक अडीच वर्षीय मुलगी सैरावैरा फिरत असल्याचे नंदा गायकवाड व शुभांगी गायकवाड या दोघींच्या निदर्शनास आले. या दोघी पंढरपूरहून बसमधून उतरुन मंगळवेढा शहरात जात असताना या दोघींची नजर त्या बालिकेकडे गेली. तिला मायेने जवळ घेवून वडिलाचे नाव,आईचे नाव विचारले असता ती केवळ एकच शब्द बोलत असल्याने आई, वडिलाविषयी माहिती मिळू न शकल्याने त्यांनी त्या बालिकेला मंगळवेढा पोलीस ठाण्यात आणले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुकर, पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर,



गोपनीय विभागाचे दिगंबर गेजगे, ठाणे अंमलदार कृष्णा जाधव, महिला पोलीस हवालदार वंदना अहिरे आदींनी सदर मुलीचे फोटो काढून शहरातील सर्व व्हॉटसअप ग्रुपवर टाकल्यानंतर त्या मुलीच्या पालकांचा शोध लागला. सदरची मुलगी आई-वडिलांबरोबर एका कार्यक्रमस्थळी आली होती. आई, वडिल कार्यक्रमात असताना नजर चुकवून ती मुलगी रस्त्यावर आली व रोडने ती फिरत फिरत दामाजी चौका पर्यंत येवून पोहचली. सदर मुलीच्या वडिलाने पोलीस स्टेशन मध्ये येवून मुलीची ओळख सांगीतल्यानंतर पोलीसांनी त्या बालिकेला त्यांच्या ताब्यात दिल्यानंतर आई-वडिलांचा जीव भांड्यात पडला. सदर मुलीच्या वडिलाचे नाव अक्रम अब्बास मुलाणी (रा.मुलाणी गल्ली) असल्याचे सांगण्यात आले.

# शहर पोलीस आयुक्तालयाच्या संकेतस्थळाचे नूतनीकरण

### पोलीस ठाण्यांची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाचे संकेतस्थळ आता नव्या, आधुनिक रुपात नागरिकांसाठी उपलब्ध झाले आहे. www.solapurcitypolice.gov.in या संकेतस्थळाचे नूतनीकरण करण्यात आले असून, याचे उद्घाटन आज पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. या संकेतस्थळाचे तांत्रिक नूतनीकरणाचे काम पॉवरकोड टेक्नोलॉजी या कंपनीने केले आहे.नवीन संकेतस्थळ इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये तयार करण्यात आले असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे हे संकेतस्थळ मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकावर काही सेकंदांतच उपडते. नूतनीकरण केलेल्या संकेतस्थळावर नागरिकांना अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



सिटीजन पोर्टल लिंकद्वारे सोलापूर शहरासह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिक ऑनलाईन तक्रार नोंदवू शकतात. पोलीस आयुक्त, उप-आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त आणि सर्व पोलीस ठाण्यांची माहिती जसे की मोबाईल क्रमांक, पत्ता व जीपीएस लोकेशन संकेतस्थळावर पाहता येते. संकेतस्थळ फेसबुक व ट्विटरशी जोडलेले असून, नागरिकांना सोशल मीडियाद्वारे पोलिसांशी संपर्क साधता येईल. शहर नियंत्रण कक्षाचा व्हॉट्सप नंबर आणि क्यू आर कोड देण्यात आला असून, नागरिक तक्रारी व सूचना थेट पाठवू शकतात. याशिवाय, आपले सरकार' संकेतस्थळाची लिंक, वाहतूक नियम व दंडाची माहिती, महिला व नागरिक सुरक्षेसाठी सेफ्टी टिप्स, तसेच सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन या विभागांचाही समावेश करण्यात आला आहे.

नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून संकेतस्थळावर फरार व पाहिजे आरोपींची यादी, तसेच गुन्ह्यांची संख्या, प्रकार व पोलिसांची कामगिरी दर्शवणारा डॅशबोर्ड' उपलब्ध आहे. टेंडर विभागातून विविध निविदा डाउनलोड करता येतात, तर गहाळ व सापडलेल्या वस्तूंची माहिती देण्याची सोय नागरिकांसाठी खुली आहे.

या प्रकल्पाचे मार्गदर्शन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी केले. या प्रकल्पासाठी पोलीस उपनिरीक्षक प्रविण भोपळे, नागेश इंगळे, रतिकांत राजमाने, इब्राहिम शेख, तसेच पॉवरकोड टेक्नोलॉजीचे पंकज चव्हाण व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

# ‘जलसंपदा’च्या ५० एकरात अवघ्या ‘५० कोटी‘त आयटी पार्क शक्य

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनेनुसार सोलापुरातील आयटी पार्कसाठी जागा पाहणी काही दिवसापूर्वीच करण्यात आली. यात विविध ठिकाणच्या जागाही पाहण्यात आल्या आहेत. होटगी रोडवरील जलसंपदा विभागाच्या ५० एकर जागेत केवळ ५० कोटीच्या निधीतून आयटी पार्क उभारणे शक्य होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी दिली.

सोलापूरच्या आयटीपार्कसाठी सोलापुरातील जुनी मिल परिसराची जागा पाहणी करण्यात आली. मात्र ही जागा अपुरी असल्याचे आयटी पार्क मधील तज्ज्ञांनी सांगितले. हिरज येथील जागेचीही यासाठी पाहणी करण्यात आली. हिरज येथील जागा योग्य होती, मात्र ही जागा माळढोक क्षेत्रात येत असल्याने ही जागा अडचणीची ठरली आहे. त्यामुळे आयटी पार्कसाठी आयटी पार्कक्षेत्रातील मान्यवरांनी होटगी रोडवरील जागेस पसंती दिली आहे.

मात्र ही जागाही अजून निश्चित करण्यात आले नसल्याचेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट सांगितले. होटगी रोडवर उभारण्यात येणाऱ्या आयटी पार्कच्या इमारतीच्या उंचीस विमानसेवेचा कोणताही अडथळा येणार नाही, असा अहवाल विमानतळ प्राधिकरणाकडून देण्यात आला. एनटीपीसी किंवा साखर कारखान्यातून होत असलेल्या प्रदुषणावर नियंत्रण आणता येणार आहे. आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे काम हे वातानुकूलित कक्षात बसून असते, त्यामुळे बाहेरील उष्णतेचा कामावर फारसा परिणाम जाणवणार नाही. इतकेच नाहीतर विमानतळापासून हे स्थळ जवळ असल्याने त्यास तज्ज्ञ मंडळींचा होकार आला आहे. सोलापुरातील होटगी रोडवर आयटी पार्क झाल्यास याठिकाणी किमान ३० हजार कर्मचारी काम करतील, अशी इमारत रचना असणार आहे. गरज पडली तर आणखीन पुढे आयटी पार्कचे याठिकाणी विस्तार करणे प्रशासनास शक्य असल्याचीही भूमिका जिल्हाधिकारी यांनी घेतली आहे.

### जुनीच्या मिलच्या जागेसाठी मोजावे लागणार १०० कोटी

सोलापुरातील जुनी मिलमधील जागा आयटी पार्क उभारण्यासाठी पाहणी करण्यात आली. मात्र या जागेचा वाद न्यायालयात आहे. शिवाय येथील जागाही अपुरी आहे. न्यायालयातून वाद मागे घेण्यासाठी संबधितांना विनंती केल्यानंतर प्रशासनाकडे शंभर कोटीच्या मोबदल्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे ही जागा आयटी पार्कसाठी मृगजळ ठरली. यामुळे होटगी रोडवरील जागा शासनास स्वस्त, फायदेशीर ठरणार आहे.



**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी**

# वाहने नोंदणीमुळे सोलापूर प्रादेशिक परिवहन विभाग ‘मालामाल’





### शहरातील रस्ते झाले आणखी अरुंद

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

दसरा व दिवाळीच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करण्याचा नवा विक्रम सोलापूरकरांनी केला आहे. दसरा आणि दिवाळी हे दोन्ही महत्वाचे सण ऑक्टोबर महिन्यातच झाले. या महिन्यात वाहन विक्रीतून सोलापूर जिल्हा प्रादेशिक परिवहन विभाग मालामाल झाला आहे. दसरा मुहूर्तापक्षा दीवालीच्या मुहूर्तावर सर्वात जास्त वाहनांची विक्री झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील लोकांनी दसरा व दिवाळीच्या मुहूर्तावर वाहन खरेदीचा नवा विक्रम केला आहे. दुचाकी, तीनचाकी, चारचाकी गाड्यांचा समावेश आहे.

सोलापूर प्रादेशिक विभागाने सोलापूर आणि अकलूज या दोन्ही कार्यालयांमध्ये मिळून २५ हजार ६०० नविन वाहनांची नोंदणी केल्याने ३९ कोटी २४ लाख ९८ हजार ६५१ रुपये इतका महसूल शासकीय तिजोरीत जमा झाला आहे. दसरा व दिवाळीच्या मुहूर्तावर वाहन खरेदीचा नवा विक्रम केला आहे. दुचाकी, तीन चाकी व फोर चाकी गाड्यांची मोठी विक्री झाल्याची नोंद जिल्हा प्रादेशीक कार्यालयात करण्यात आली आहे. कमी झालेल्या जीएसटीमुळे वाहनाचे दर ही काही प्रमाणात कमी झाल्याने याचा फायदा ग्राहकांनी उचलला आहे. त्यामुळे दसरा आणि दिवाळीच्या मुहूर्तावर सोलापूरकरांनी वाहन खरेदीचा मोठा सपाटा लावला.

**१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत सोलापूर व अकलूज कार्यालयात नोंदणी झालेली वाहनांची संख्या**

| वाहनाचा प्रकार | सोलापूर | अकलूज |
|---|---|---|
| मोटारसायकल | ७९०० | ३१३५ |
| मोपेड | १२७ | २२ |
| मोटार कार | १२१९ | ६१५ |
| ट्रॅक्टर | ५१६ | ४२४ |
| ओमनी बस | १२ | ३ |
| ट्रेलर | २५ | ९५ |
| तीन चाकी (प्रवासी) | ८५ | ९ |
| तीन चाकी (माल) | ४३ | २ |
| मालवाहतूक | ४२२ | २६० |
| मोटार कॅब | ३६ | ५ |
| रुग्णवाहिका | २ | २ |
| डंपर | ४ | २ |

### जिल्ह्यात २५ हजारांवर नविन वाहनांची नोंदणी...

सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागाकडे तब्बल १७ हजार ८८६ वाहनांची नोंदणी करण्यात आली असून त्यातून २६ कोटी ६४ लाख ७७ हजार ७६९ रुपये शासकीय महसूल मिळाला आहे. तर अकलूज उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे ७ हजार ६८० वाहनांची नोंदणी करण्यात आली असून त्यातून १२ कोटी ६० लाख २६ हजार ८५५ रुपये शासकीय महसुल मिळाला आहे. नोंदणी शुल्क व करातून ३९ कोटी २१ लाख ३७ हजार रुपये शासकीय तिजोरीत जमा झाले आहेत. सोलापूरकरांनी दसऱ्याच्या मुहूर्तापेक्षा दिवाळीच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणात वाहनांची नोंदणी आरटीओ कार्यालयात केली आहे. त्यातून सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागाला कोट्यावधीचा महसूल मिळाल्याने हा विभाग मालमाल झाला आहे.

### ४० कोटींचा शासकीय महसूल जमा

वाहने वेळेत मिळण्यासाठी या विभागाने वाहन नोंदणीचे काम नियोजन पूर्वक केले आहे. वाहन नोंदणीतून सुमारे ४० कोटी रुपयांचा शासकीय महसूल जमा झाला आहे.



**- अमरसिंह गवारे, सहायक उपप्रादेशकि परिवहन अधिकारी**

### विविध चौक, रस्ते दुभाजक विकास देखभालीसाठी आवाहन

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध चौक आणि रस्ते दुभाजक यांच्या सौंदर्यवर्धन, विकास व नियमित देखभालीसाठी सामाजिक संस्था, संघटना, व्यापारी प्रतिष्ठाने, औद्योगिक कॉर्पोरेट कंपन्या, हॉटेल्स, कॉलेजेस, बँका आदी इच्छुक घटकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली सौंदर्य वाढविण्याचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या ‘‘सुंदर सोलापूर’’ या उपक्रमांतर्गत सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्य वाढविणे, पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देणे आणि शहराचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. इच्छुक संस्थांनी निवडलेल्या ठिकाणी फुलझाडे, गवत, सजावट, स्वच्छता व प्रकाशयोजना यांसह देखभाल करावी लागणार आहे. या ठिकाणी संस्थेचे नाव असलेले फलक बसविण्याची परवानगी दिली जाईल. हे कामकाज सोलापूर महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार पार पाडण्यात येईल. इच्छुकांनी सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.solapurcorporation.gov.in येथे पाहता येईल. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख ४ नोव्हेंबर २०२५ ते १८ नोव्हेंबर २०२५ अशी असून, प्रस्ताव महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडे सादर करावेत. सोलापूरकर नागरिक, उद्योगसंस्था, तसेच सामाजिक संस्था यांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# सत्याचे नवे प्रयोग...

सत्य आणि असत्य यांमध्ये एक अत्यंत धूसर अशी अदृश्य रेषा असते आणि तशीच रेषा सत्य आणि सत्ता यांमध्येही असते. सत्याची महती सांगणारे असंख्य दाखले समाजजीवनात पिढ्यान्‌पिढ्यांपासून दिले जात असतात आणि सत्याचे महत्त्व मनामनांवर बिंबविणाऱ्या कथाही सांगितल्या जातात. पण, सत्य पचविणे सोपे नसते. कदाचित त्यामुळेच सत्याची चाड असलेल्यांनाही असत्याचा आसरा घ्यावा लागला तर त्याची टोचणी लागून राहते. असे म्हणतात की, सत्याची झळाळी सातत्यपूर्ण असते. मात्र, राजकारणात असत्यच अधिक झळकवले जाते. एखाद्या असत्यावर कितीही प्रखर प्रकाशझोत टाकला तरी त्यामुळे त्याला सत्याची झळाळी येत नाही. पण, त्यामुळे उजळलेले असत्यदेखील सत्य भासू लागते. कोणत्याही असत्याचा लोकांच्या मनावर सातत्याने मारा केला, तर असत्यदेखील सत्य वाटू लागते, असे राजकारणात मानले जाते. किंबहुना, असत्य हेच राजकारणातले सत्य असते. कदाचित त्यामुळेच राजकारणी व्यक्तीच्या सत्यवचनावरही माणसे लगेचच विश्वास ठेवत नसावीत. राजकारणी लोक असत्य का बोलतात, यावर काही बुद्धिमंतांनी खूप सखोल विचारमंथनही केले आहे. राजकीय नेते अनेकदा त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठी किंवा अन्य काही कारणांसाठीदेखील जनतेशी खोटे बोलतात, असे सिद्धसुद्धा झालेले आहे. अर्थात, प्रतिस्पर्ध्यास गोंधळात टाकणे आणि जनतेस संभ्रमित करून त्याद्वारे राजकीय लाभ मिळविणे हाच त्यांचा उद्देश असतो. 'राजकीय नेत्यांचे खोटे बोलणे' या विषयावर जॉन मियरशेमर नावाच्या एका लेखकाने सुमारे दीड दशकांपूर्वी एक पुस्तक लिहिले. आंतरराष्ट्रीय राजकारणात खोटे बोलण्याच्या सवयींवर त्याने या पुस्तकात प्रकाशझोत टाकला आहे. त्याच्या अभ्यासानुसार, राजकीय नेते जनतेला खोटे सांगतात, खोटी माहिती देतात आणि अशी खोटी माहिती अधिकाधिक चर्चेत राहावी यासाठी ते खोट्यावर खोट्यांची मालिका रचत राहतात. सत्य आणि असत्य यांमध्ये हादेखील एक महत्त्वाचा भेद असतो. सत्यामध्ये सातत्य असते. एकदा ते सांगितले गेले की, ते शाश्वतपणे तसेच राहते. असत्यामध्ये मात्र असे सातत्य नसते. उलट एक असत्य सांगितले गेले की, तेच सत्य आहे, हे पटवून देण्यासाठी अनेक असत्य बाबींचा आश्रय घ्यावा लागतो. म्हणूनच सत्य चप्पल चढवून घराबाहेर पडेपर्यंत एखादे असत्य गावभर फिरूनदेखील आलेले असते, असे म्हणतात. चर्चेत खोटेपणाचे महत्त्व वाढविणे या नीतीला राजकारणातच मोठे महत्त्व असते. खोटे पसरविणे ही राजकीय रणनीती मानली जाते, त्यामुळे राजकारणात सत्यापेक्षा असत्याला अधिक महत्त्व आणि प्रतिष्ठा दिली जाते. एखादाच कोणीतरी आपल्या सत्याच्या प्रयोगांची निर्भीड कबुली देतो आणि सत्याचे शाश्वत महत्त्व जाणून घेण्यासाठी आयुष्यभर धडपडत राहतो. सर्वांना ते साधता येत नाहीच; उलट असत्याचा आश्रय घेतल्याने रणनीती अधिक यशस्वी ठरते, असेच राजकारणात मानले जाते. त्यामुळे 'सत्याचे प्रयोग' करणारा एखादाच कुणी महात्मा ठरतो आणि सातत्याने असत्याची रणनीती आखणारे राजकारण मात्र या माहात्म्याच्या सत्याच्या नावाने असत्याचा गवगवा करू लागते.

अलिकडे 'फॅक्ट चेक' नावाचे एक आभासी यंत्र आणि तंत्र उपलब्ध झाल्यापासून सत्य आणि असत्य यांतील भेदाचा छडा लावणे सोपे झाले असले, तरी त्यामुळे राजकारणातील असत्याचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट कोणते नेते आपल्या राजकीय कारकीर्दीत किती वेळा असत्य बोलले, याचा हिशेब ठेवणे सोपे झाले आणि त्यानुसार त्याच्या असत्यकथनाच्या राजकीय परिणामांची चर्चा होऊ लागली. 'राजकीय नेत्यांच्या असत्य बोलण्याच्या नीतीमागील सत्य' या नावाने प्रकाशित झालेल्या त्या बहुचर्चित पुस्तकात लेखक जॉन मियरशेमर यांनी तर नेत्यांच्या खोटे बोलण्याच्या नीतीचे अप्रत्यक्ष समर्थनही केले आहे. नेत्यांचे खोटे बोलणे हे अप्रत्यक्षपणे त्यांच्या राजकारणासाठी हिताचेच असते, असे हा लेखक मानतो. अमेरिकेने १९४० च्या दशकात ग्रीर नावाच्या एका युद्धनौकेबाबत असा प्रकार केल्याचे आढळते. ४ सप्टेंबर १९४१ रोजी एका जर्मन पाणबुडीने ग्रीरवर गोळीबार केला आणि बचावाचा बहाणा करून अमेरिकेने युद्धात उडी घेतली. या प्रकरणात अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी राष्ट्रहिताचा विचार करून खोट्याचा आश्रय घेतला, असे या लेखकास वाटते. कोणतेही खोटे बोलणे प्रभावी ठरविण्यासाठी लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो आणि त्यात यश मिळाले की खोटे बोलणे सोपे होते व तेच लोकांना खरे वाटू लागते. राजकारणातील असत्याला अनेक पैलू असतात. काही असत्यांचे परिणाम नकारात्मक होऊ शकतात आणि त्यातून फसवणुकीची संस्कृती फोफावू शकते. भीती निर्माण करणारे असत्य, धोरणात्मक बाबींच्या हितासाठी वापरले जाणारे असत्य, उदारमतवादी असत्य असे राजकारणातील असत्याचे वर्गीकरण अलिकडे उघड झालेले आहे. जे नेते असत्याचा आश्रय घेतात, त्यांच्या या कृतीचे विश्लेषण फॅक्ट चेकमुळे सोपे झाले आहे. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सन २०१६ ते २०२१ या पाच वर्षांच्या काळात ३० हजार ५७३ वेळा असत्य किंवा लोकांची दिशाभूल करणारे वक्तव्य अथवा वेगवेगळे दावे केल्याचा निष्कर्ष वॉशिंग्टन पोस्ट या वृत्तपत्राने फॅक्ट चेकच्या आधारे केला होता आणि ट्रुथओमीटर नावाच्या साधनाने त्यास पुष्टी दिली होती. ट्रम्प यांनी या काळात केलेल्या वक्तव्यांपैकी सुमारे ७० टक्के वक्तव्ये अर्धसत्य, असत्य, चुकीची किंवा पूर्णतः खोटी होती, असे या पडताळणीत आढळले होते. आपल्या देशातील काही नेतेदेखील असत्य वक्तव्यनीतीचा अनेकदा वापर करत असल्याचे दिसून आले. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या भयावह काळात तेराव्या बॉम्बस्फोटाविषयी शरद पवार यांनी केलेले वक्तव्य हा याच नीतीचा प्रकार होता. काही नेत्यांच्या असत्यनीतीला एका वैशिष्ट्याचा मुलामादेखील असतो. अलिकडे तर असत्याचा प्रभावी वापर करण्याची नीती व त्यालाच सत्य म्हणून लोकांच्या माथी मारण्याची धडपड हा राजकीय स्वार्थाचा प्रकार राजकारणात लोकप्रिय होताना दिसतो. काही नेत्यांची वक्तव्ये दिशाभूल करणारी असल्याचे स्पष्ट झाले असले, तरी ती खोटी असल्याचे मात्र सिद्ध होऊ शकत नाही, हा असत्याचा राजकारणातील महिमा. महाराष्ट्रात आणि देशातही आजकाल मतदार याद्या, मतदान यंत्रे यांबाबत प्रचंड राजकीय गदारोळ सुरू आहे आणि बनावटगिरीचे दाखले देताना दररोज त्यामध्ये नवनव्या आकड्यांची भर पडत आहे. महाराष्ट्रात ९६ लाख मतदार खोटे असल्याचा आरोप खरा असल्याचे सिद्ध झाले नसले, तरी तो खोटा असल्याचा निष्कर्षही निघालेला नाही. त्यामुळे नेमके काय समजायचे, हा प्रश्नच आहे. राजकारणात सत्ता हे उद्दिष्ट असते आणि साधनही. नेते अनेकदा आपली प्रतिमा उजळ करण्यासाठी, त्यावर लोकप्रियतेचा मुलामा चढविण्यासाठी आणि आपल्या कार्याचे किंवा यशाचे अतिशयोक्त वर्णन करण्यासाठी तसेच विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सत्याचा विकृत किंवा एकांगी उपयोग करतात, असे अनेक दाखले इतिहासात नोंदले गेले आहेत. लोक कोणती माहिती स्वीकारतात आणि कोणती माहिती नाकारतात, याचे नेमके विश्लेषण केल्यानंतर असत्याचा मारा किती प्रमाणात करावयाचा याचीही काही गणिते असतात. आपण जे बोलतो, ते लोकांना हवे आहे असे ठाऊक झाले की, लोकप्रिय ठरणाऱ्या असत्याचा भडीमार सुरू केला जातो. दुसरे असे की, आपल्या कृती आणि उक्तीमध्ये तफावत असल्याची जाणीव असली की अस्वस्थपणा येतो आणि असत्य कथनास योग्य व न्याय ठरविण्याचा आटापिटा सुरू केला जातो. कारण अशा प्रकरणांत सत्यापेक्षा भावनिकता अधिक महत्त्वाची मानली जात असते. निवडणुका, घोटाळे किंवा टीका यामध्ये जेव्हा त्वरित प्रतिक्रिया देण्याची गरज असते, तेव्हा आपली बाजू बळकट करणे एवढीच बाब महत्त्वाची ठरते, तेव्हा असत्याचाही ठोस आग्रही वापर केला जातो. कालांतराने ते असत्य उघडकीस आले, तरी लोकांची स्मृती अल्पकालीन असते, यावर राजकारण्यांचा विश्वास अधिक असतो. म्हणूनच सत्य आणि असत्याच्या या लपंडावात सत्य झाकण्यात यश येणाऱ्यालाच तात्कालिक विजय मिळण्याचा विश्वास असतो. सध्या तेच तर सुरू आहे!


## विशेष

# स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

**प्रा. सुखदेव बखळे**

केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि 'जनरेशन झेड' वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दरवर्षी ९-१० टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ७ टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढविण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे.

सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना, 'पीएम मित्र पार्क' आणि 'एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम' यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम 'सोशल मीडिया', राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त जीएसटी दरांमध्ये झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर-देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि 'जनरेशन झेड' पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपरिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबल असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघु आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्यास मदत करेल.



भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनविण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पाहात आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि 'ग्रीन थॉट'सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरामोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना जबाबदार खरेदी करण्यास प्रेरित करतो.

भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापड निर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'टेक्सटाईल पार्क'सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणीयदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करीत आहे. 'ग्रीन फॅशन'चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. आंतरराष्ट्रीय अहवाल आणि अभ्यासातून दिसून आले आहे की, लोक आता 'ब्रँडेड ग्लिट्झ'पासून दूर जात असून सभोवतालच्या साहित्यांसह फॅशनची व्याख्या नव्याने लिहीत आहेत. जुने कपडे, ज्यूट, बांबू, पाने, पुनर्वापर केलेले कापड आणि नैसर्गिक रंगाच्या वापरावर भर दिला जात आहे. हा ट्रेंड केवळ पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल नाही, तर रासायनिक कापड आणि मायक्रोप्लॅस्टिकने भरलेल्या कपड्यांना जागतिक प्रतिसाद बनत आहे.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) आणि 'ग्लोबल फॅशन अजेंडा' यांच्या 'द स्टेट ऑफ सर्क्युलर फॅशन' या संयुक्त अहवालानुसार स्वीडन, फ्रान्स, जपान, कॅनडा आणि भारत हे सर्वात वेगाने शाश्वत किंवा निसर्गानुकूल फॅशन स्वीकारणारे आघाडीचे पाच देश आहेत. 'फॅशन थिअरी: द जर्नल ऑफ ड्रेस, बॉडी अँड कल्चर'मध्ये प्रकाशित अहवालात म्हटले आहे, की, २०१४ ते २०२४ या कालावधीत या देशांमध्ये निसर्गावर आधारित कापडांची (हिरवे कपडे) मागणी सरासरी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात लक्षणीय बदल स्वीडनमध्ये दिसून आला. तेथील 'एलेन मॅकआर्थर फाऊंडेशन'च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ दरम्यान पुनर्नवीनीकरण केलेल्या किंवा सेंद्रिय कपड्यांच्या विक्रीत ६१ टक्के वाढ झाली. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ सस्टेनेबल फॅशन अँड टेक्सटाईल्स'मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अहवालानुसार, नैसर्गिक संसाधनांचे पुनर्नवीनीकरण आणि कापडांचा पुनर्वापर यावर आधारित 'रिजनरेटिव्ह फॅशन' या मॉडेलने गेल्या पाच वर्षांमध्ये जागतिक शहरी फॅशन बाजारपेठेत लक्षणीय स्थान मिळविले आहे. स्टॉकहोम, पॅरिस, टोकियो, न्यूयॉर्क, सेऊल, मुंबई, सिडनी, बर्लिन, ॲमस्टरडॅम, टोरंटो, सिंगापूर आणि मेलबर्न या १२ प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, अंदाजे ३८ टक्के ग्राहक आता फक्त पुनर्नवीनीकरण केलेले किंवा नैसर्गिक स्रोतांपासून बनवलेले कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देतात. जुन्या वस्तूंचा पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. अहवालानुसार अलिकडच्या काळात 'अपसायकलिंग', जुन्या किंवा टाकून दिलेल्या वस्तूंचे पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरून नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# जन्म-मृत्यू दाखल्यांच्या गोरखधंद्याला वेसण

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय प्रमाणपत्र व दाखले मिळविल्याची प्रकरणे नवीन नाहीत. पण, जन्म व मृत्यू दाखले मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे दिली जातील, याची कल्पनाही कोणी केली नव्हती. ज्या व्यक्तीची नोंदच कुठे सापडत नाही आहे, अशा व्यक्तीला जन्माचा दाखला पाहिजे असेल तर आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागत होता. संपूर्ण शहानिशा करून प्रक्रियेनंतर दाखला दिला जात होता. पूर्वीच्या प्रचलित नियमामध्ये शासनाने २०२३ मध्ये बदल केला. त्यानुसार तहसीलदारांकडे अर्ज करण्याची मुभा देण्यात आली. पुढे तहसीलदारांनी हे काम नायब तहसीलदारांकडे सोपविले. या सुधारणेचा फायदा घेऊन काही महाभागांनी २०२३ ते जानेवारी २०२५ या काळात मोठ्या प्रमाणात तहसील कार्यालयांमध्ये अर्ज करून दाखले मिळवून घेतले. यातील काही दाखले बनावट असल्याचे सर्वप्रथम मालेगाव, अमरावतीत लक्षात आले. शासनाला त्याची माहिती मिळाली. भाजपाचे नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या प्रकरणात काळजीपूर्वक लक्ष घातले. विदर्भातल्या अमरावती, यवतमाळ, अकोला या जिल्हास्थानांसह अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दारव्हा, अकोट या तालुकास्थानांवर त्यांनी दौरे केले. संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना जाब विचाण्याचे काम त्यांनी केले. राज्यातल्या अन्य भागात त्यांचे दौर झाले, काही ठिकाणी सुरू आहेत. त्यांचे परिणाम आता समोर येत आहे.

घोळ लक्षात आल्यावर २५ जानेवारी २०२५ रोजी शासनाने 'जीआर' काढून २०२३ ते २०२५ या काळात देण्यात आलेले सर्व जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द केले. त्याचाच आधार घेऊन किरीट सोमय्या दर महिन्यात अमरावतीत आले. अन्य ठिकाणीही गेले. प्रत्येक ठिकाणी ते पुरावे दाखवून अधिकाऱ्यांशी बोलतात. झालेल्या चर्चेची माहिती माध्यमांना देतात. त्यांचा दबावच इतका वाढला होता की, अधिकाऱ्यांकडे चौकशी करून कारवाई करण्यापलीकडे पर्यायच उरला नव्हता. किरीट सोमय्या हा माणूस मुळातच अभ्यासू आहे. जे काम आपल्याला वरिष्ठांनी दिले आहे, ते यशस्वी कसे करायचे, याचे उत्तम उदाहरण ते आहेत. जन्म व मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणात त्यांनी डोळ्यात तेल घालून काम केले. २०२३ ते जानेवारी २०२५ या काळात अमरावती तहसीलमधून जन्म-मृत्यू प्रमाणपत्राचे २ हजार ८९६ अर्ज मंजूर झाले होते. त्यापैकी सुमारे १८०० दाखले हे मनपाच्या हद्दीत देण्यात आले होते. ते रद्द करण्यात आल्यावर संबंधित यंत्रणेकडे प्रमाणपत्र परत करण्याचे आदेशसुद्धा देण्यात आले होते. मनपा हद्दीत या आदेशाचे पालन करून सुमारे ११०० जणांनी प्रमाणपत्रे परत केली. उर्वरित ७०० जणांनी अजूनही दाखले मनपाकडे परत केले नाही. त्यांचा शोध मनपाच्या पथकाने घेतला. त्यात १५५ जण दिलेल्या पत्त्यांवर मिळाले नाही तर ३४९ जणांचे पत्तेच बरोबर नाहीत. त्यामुळे मनपाने अशा ५०४ जणांविरुद्ध तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. यापूर्वी अंजनगाव सुर्जी, अमरावतीच्या गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहे. दारव्हा नगरपालिकेने ५७२ प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. मालेगावातील ९४६ प्रमाणपत्रे रद्द करण्याची मागणी जोरात होत आहे.

छत्रपती संभाजी नगर, मुंबईतल्या गोवंडी भागासह अन्य ठिकाणी तातडीने बैठका घेऊन चौकशी सुरू झाली आहे. उपरोक्त पद्धतीनेच या ठिकाणी कारवाई होऊन बनावट प्रमाणपत्रे रद्द होण्याची शक्यता वाढली आहे. राज्यात जी बनावट प्रमाणपत्रे तयार झाली, त्यात बांगलादेशी व रोहिंग्यांची संख्या जास्त असण्याचा अंदाज आहे. सोमय्या यांचेही ते म्हणणे आहे. आता गुन्हे दाखल होत असल्याने तपासात सर्व काही समोर येणार आहे. फडणवीस सरकारला हा गोरखधंदा वेळीच लक्षात आल्यामुळे आदेश काढून वेसण घालण्यात आली आणि कारवाईदेखील सुरू आहे. भविष्यात असे प्रकार घडणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावी लागणार आहे. बनावट कागदपत्रे तयार करून प्रमाणपत्रे मिळवून देणारी एखादी टोळी राज्यात सक्रिय असण्याचा संशय अनेकांना आहे. पोलिसांनी त्या दिशेने तपास करायला हवा. राज्याच्या व देशाच्या सुरक्षेसाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - दैवासुरसंपद्विभागयोग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा १६ वा अध्याय 'दैवासुरसंपद्विभागयोग' म्हणून परिचित आहे. या अध्यायात भगवंतांनी दैवी गुण आणि आसुरी गुण यांचा विचार केला असावा. विशेष म्हणजे या दोन्ही गुणांना संपत्ती म्हणून संबोधित केले आहे. दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती यावर विचार मांडला आहे. या अध्यायाय भगवंतांनी दैवी गुणांची आणि आसुरी गुणांची यादीच केली आहे. ती यादी वाचली की आपण कुठल्या श्रेणीत आहोत दैवी की आसुरी? हे आपले आपल्यालाच लक्षात येईल. त्यानुसार आपल्याला सुधारणा करता येईल.

'अचूक प्रयत्न तो देवो, चुकणे दैत्य मानिजे-' अचूक प्रयत्नांना दैवी गुण आणि चुकण्याला दैत्य म्हटले आहे. म्हणजे दैवी गुणांचे प्राबल्य ठेवणे आणि आसुरी गुणांचे दौर्बल्य आपल्याला प्रयत्नपूर्वक करणे शक्य आहे. ते आपण केले पाहिजे. त्यासाठी दैवी गुण कोणते आणि आसुरी गुण कोणते? हे माहीत असणे जरूरी आहे. म्हणून भगवंतांनी सुरुवातीलाच दैवी गुणांची यादीच आपल्याला दिली.

श्रीभगवानुवाच- 'अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥'

निर्भयता, शुद्ध अंतःकरण, ज्ञानी, योगी, दानी, इंद्रियदमन करू शकणारा, यज्ञानुष्ठानी, वेद अध्ययन करणारा, तपस्वी, सरळ स्वभावाचा म्हणजे दैवी संपत्ती असणारा मनुष्य होय.

'अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥'

अहिंसक, सत्यवादी, क्रोधावर नियंत्रण असणारा, त्यागी, कर्म संन्यस्त, शांत, कोणाचीही निंदा न करणारा, जीवदया करणारा, मार्दव असलेला, कोणाच्याही व्यर्थ उखाळ्यापाखाळ्या न करणारा म्हणजे दैवी गुणी मनुष्य होय.

'तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहोनातिमानिता ।
भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥'

तेजस्वी, क्षमाशील, धैर्यशील, अंतर्बाह्य शुचिर्भूत, शत्रुभाव नसणारा ही सर्व लक्षणे दैवी पुरुषाची आहेत. जवळ जवळ २६ लक्षणांची यादी भगवंताने पहिल्या तीन श्लोकात सांगितली आहे. आता आपण कसे वागू नये यासाठी आपल्याला आसुरी लक्षणांची यादीही भगवंत देतात.

'दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ॥'

भगवंत सांगतात आसुरी गुण असलेल्या माणसात दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोर वचनी आणि अज्ञान ठासून भरलेले असते.

'प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥'

असुरी स्वभावाचे लोक प्रवृत्ती, निवृत्ती जाणत नाहीत. शुचिर्भूतता, आचार-विचार त्यांच्या जवळ नसतो. ते सदैव असत्य भाषण करतात.

'असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥'

आसुरी संपत्ती धारक लोक अधिष्ठानरहित असतात. त्यांचा ईश्वरावर विश्वास नसतो. आपला जन्म स्त्री-पुरुष संयोगातून झाला हे त्यांच्या मनात सदैव असल्यामुळे कामवासना प्रबळ असते.

'एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥'

आसुरी वृत्तीचे लोक बुद्धिभ्रष्ट, अत्यल्प बुद्धी, क्रूरकर्मे, सर्वांचे अहित करणारे, इतरांच्या दुःखात आनंदी होणारे, विनाशकारी असतात. दंभ, मद आणि अहंकाराने युक्त असतात. अविवेकी आणि सदैव पापाचरण करणारे असतात. आसुरी वृत्तीचे लोक कायम चिंताग्रस्त आणि सदैव विषयात रममान असतात.

'आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥'

अनेक आशा पाश बनून बांधून ठेवतात. विषयभोगपूर्तीसाठी ते वाममार्गाने अर्थ कमावतात. मीच बलवान, मीच कर्ता, मीच भोगणारा आणि कर्ता-करविताही मीच त्यामुळे मीच फक्त सुखी अशी दृढधारणा त्याची असते. याच अज्ञानात तो पूर्ण लिप्त असतो. त्यामुळे त्याच्यात आसुरी गुणांचे प्राबल्य असते. भगवंत पुढे आसुरी वृत्तीच्या लोकांचे वर्णन करताना सांगतात की, ही माणसे मी आज हे कमावले, उद्या ते कमावणार, आज इतके धन कमावले, उद्या अजून कमावणार. आज याला मारले, उद्या त्याला मारणार हा भाव सतत ठेवतात.

'अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥'

अहंकार, बल, दर्प आणि क्रोधाच्या अधीन होतात आणि माझ्यासारखे कोणीच नाही, या घमेंडीत उन्मत्त होऊन शास्त्रविरोधी वर्तन करतात. भगवंत म्हणतात की, हे लोक माझा म्हणजे परमेश्वराचाही विरोध करतात.

'आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥'

त्यामुळे अर्जुना, अशा नराधमांना पुन्हा पुन्हा नरकप्राप्ती व्हावी म्हणून त्यांना मी पुन्हा पुन्हा आसुरी योनीत टाकतो.

'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥'

म्हणून मानवाने काम, क्रोध आणि लोभ ही नरकाची द्वारे आहेत, हे लक्षात घेऊन या तिन्हीचा त्याग केला पाहिजे. या तिन्हीचा त्याग म्हणजे आत्मकल्याण होय. याउलट जो या विषयात कामनेने प्रेरित होतो त्याला मोक्षप्राप्ती केवळ अशक्य आहे.

'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥'

अर्जुना! हे शास्त्र प्रमाण मानून शास्त्रविहित कर्म तू कर! हा भगवंताचा आदेश आहे. मला तर श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या सर्व अध्यायात १६ वा अध्याय मनुष्यनिर्माणाची गुरुकिल्ली वाटते. पुरुषोत्तम व्हायचे तर भगवंतांनी या अध्यायात सांगितलेली दैवी गुणांची यादी पाहावी. त्यातील कोणते गुण सहज अंगीकारू शकतो ते पाहून प्राधान्यक्रम ठरवावा. एकेक दैवी गुण अंगीकारत जावा.

भगवंतांनी आसुरी गुणांची यादीही दिली. त्या अवगुणांचा त्याग आपल्याला करायचा आहे. जे ताबडतोब त्यागता येतात ते प्रथम त्यागावे. अवगुणांचा त्याग करण्याचा प्राधान्यक्रम ठरवावा लागेल. हळूहळू सर्व अवगुणांचा त्याग करण्याचा अचूक प्रयत्न करावा. 'आपुली आपण करा सोडवणूक' हा मार्ग म्हणजे स्वयंअध्ययन आणि स्वयंमूल्यमापन होय. आपल्याला आपल्यातील गुणात्मक बदल समजतोच; पण माणूस म्हणून तुमच्यात झालेले बदल इतरांनाही उमगू लागतात. दैवी शक्तीची वाढ आणि आसुरी शक्ती खुंटविण्यासाठी भगवंताने या दोन संपत्ती अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत सांगितल्या आहेत. 'नर करणी करे तो नर का नारायण होये' यातील 'करणी' म्हणजे दैवीसंपत्तीचा अंगीकार आणि आसुरी संपत्तीचा त्याग होय. या अध्यायाचे सार हेच आहे. म्हणून हा दैवासुरसंपाद्विभाग योग म्हणून ओळखला जातो.

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-३३

बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५

### दिसू लागला जवळी मंगल देशाचा वैभवकाल

दिसू लागला जवळी मंगल देशाचा वैभवकाल ।
उत्साहाने एकत्वाच्या मार्गावर करिता चाल ॥धृ.॥

व्यक्तित्वाच्या उल्लंघुनिया साऱ्या आकुंचित सीमा
विशाल हृदयी स्थापन केली समाजपुरुषाची प्रतिमा
कर्तृत्वाचे चंदन झिजवुनि उटी चर्चिली प्रेमाने
फुले सुगंधित सद्‌भावांची वाहियली पदि नियमाने
भक्तीचा लाविला दीप हा हृदयमंदिरी तेजाळ ॥१॥

वैर न कोणाशीही धरिता वागु सदा अभिमानाने
कधी न वाकू शक्तीपुढती सौख्याने फुलवू सदने
जगू जगाला देउनि जगवू चिरवांछित ही माणुसकी
जिच्यापुढे नतमस्तक होतिल साम्राज्ये अवघी परकी
आकांक्षा ही स्फुरण देतसे तशीच देइल चिरकाल ॥२॥

कंटकमय जरि मार्ग असे हा अचूक जवळचा ऐक्याचा
असामान्य नेतृत्व लाभले ये संतत प्रत्यय याचा
दैन्य विघटना दिसे सभोती मनात सलते हे शल्य
ते काढाया यत्न करावे यातच जीवनसाफल्य
या निठेने पडता पाउल घालील विजयश्री माळ ॥३॥

### चटका लावणारी एक्झिट

अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून अंगीकारलेल्या भूमिकेला रसिक प्रेक्षकांच्या केवळ पसंतीसच नव्हे तर लक्षवेधी अशा भूमिका साकारून नाट्य, चित्रपटसृष्टी आणि मालिका यातून आनंद देणाऱ्या अभिनेत्री दयाताई डोंगरे यांचे अकस्मात जाणं मनाला चटका लावून गेलं. जीव ओतून काम करण्याची हातोटी, दमदार आवाजातील वैशिष्ट्यपूर्ण स्वच्छ, सुस्पष्ट, संवादफेक, सहज, सुंदर, नैसर्गिक मुद्राभिनय ही त्यांची खास आयुधे होती. त्यातूनच त्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाची छाप उमटवीत. करारी बाणा, खाष्ट सासू अशा विविधांगी भूमिकांसाठी त्या सुपरिचित होत्या. हिंदीतही आपल्या अभिनयाची छाप तेवढ्यात ताकतीने त्यांनी उमटवली. अनेक मालिका, नाटके, चित्रपटांमधून महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारत त्यांनी आपल्या अभिनयाचे विविधांगी कंगोरे पेश करून जो आनंद दिला तो कायम रसिक मनावर राहणार आहे. अनोखी अभिनय शैली आणि संवादफेकीच्या कौशल्यावर कलाक्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या दयाताई डोंगरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

## वाचक पत्रे

### एनएसईवरील सायबर हल्ले चिंताजनक

देशातील नॅशनल स्टॉक एक्सचेंज म्हणजे एनएसई हा सर्वांत मोठा शेअर बाजार आहे. परंतु, एनएसईवर दररोज अंदाजे सतरा कोटी सायबर हल्ले होतात. या सततच्या डिजिटल धोक्यांपासून बाजाराचे संरक्षण करण्यासाठी, एनएसईकडे सायबर योद्ध्यांची एक टीम आहे. अलिकडेच झालेल्या ऑपरेशन सिंदूर या डीडीओएस सिम्युलेशन चाचणीत एएनएसईवर एका दिवसात जवळपास चाळीस कोटी सायबर हल्ले झालेत. मात्र प्रगत तंत्रज्ञान, सुरक्षा प्रणाली आणि दक्ष कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे सायबर हल्लेखोरांना कोणतेही नुकसान करता आले नाही. एनएसईला दररोज असंख्य सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागतो. एनएसईच्या सायबर सुरक्षा टीमकडे अत्याधुनिक सॉफ्टवेअर, सतत मॉनिटरिंग सिस्टिम आणि दोन प्रमुख सुरक्षा केंद्राद्वारे सतत निरीक्षणाची व्यवस्था आहे. या केंद्रामधील तांत्रिक पथके वित्तीय बाजाराच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सतत सक्रिय असतात. त्यासाठी पेनिट्रेशन टेस्टिंग अनिवार्य केले आहे. तसेच सर्व ट्रेडिंग सदस्यांना नियमित सायबर सुरक्षा ऑडिट सादर करणे बंधनकारक असते. एनएसईने ई-मेल, बाह्य डेटा ट्रान्सफर, पेन ड्राईव्ह आणि डीडीओएस हल्ल्यांपासून संरक्षणासाठी विशेष प्रोटोकॉल लागू केले आहेत. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसताच त्वरित अलर्ट आणि पॉप -अप नोटिफिकेशन जारी केले जातात. डीडीओएस हल्ल्यांमुळे सर्व्हरवर एकाचवेळी अनेक स्रोतांकडून ट्रॅफिक वाढवला जातो. ज्यामुळे प्रणाली कोसळू शकते आणि कायदेशीर वापरकर्त्यांना सेवा मिळत नाही. अशा परिस्थितीमुळे शेअर बाजाराच्या अखंड कार्यक्षमतेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. सुरक्षा वाढवण्यासाठी एनएसईकडे चेन्नई येथे पूर्णपणे स्वयंचलित बॅकअप सिस्टिम आहे, जी मुख्य प्रणालीत बिघाड झाल्यास त्वरित सक्रिय केली जाऊ शकते. ही प्रणाली अत्यल्प मानवी हस्तक्षेपाने त्रुटी दुरुस्त करण्यास सक्षम आहे. वाढत्या जागतिक परस्परसंबंधामुळे सायबर हल्ल्यांचा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. तरीही एनएसईची सक्षम सायबर टीम भारतीय वित्तीय बाजाराचे डिजिटल शिल्ड म्हणून सज्ज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांची पदोन्नतीने बार्शी नगरपरिषदेकडे बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**



सोलापूर महापालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी यांची पदोन्नतीने बार्शी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदी बदली झाली आहे. सोलापूर महापालिकेत २० महिन्यांच्या कार्यकाळात त्यांनी विविध विभागाची जबाबदारी सांभाळत चांगले काम केले आहे. महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी सोलापूर महापालिकेत दि. २८ मार्च २०२४ रोजी पदभार घेतला होता. त्यांची आज सोलापूर जिल्ह्यातीलच बार्शी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी(अ वर्ग श्रेणी) पदी पदोन्नतीने बदली झाली आहे. शासनाने तसे आज आदेश काढले आहेत. सोलापूर महापालिकेतील विविध विभागाची जबाबदारी त्यांनी नेटक्या पद्धतीने पार पाडली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग, महापालिका परिवहन उपक्रम, शिक्षण विभाग, पर्यावरण, उद्यान विभाग, मुख्य लेखा परीक्षक आदी विभागांची जबाबदारी सांभाळली आहे. महापालिका परिवहन विभाग पहात असताना त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना वेतन तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांना जीपीएफ देण्यासाठी नेटके आर्थिक नियोजन केले होते. या कर्मचाऱ्यांची देणे देण्यासाठी चांगले प्रयत्न केले होते.

**सर्वांचे चांगले सहकार्य लाभले : मुलाणी**

सोलापूर महापालिकेमध्ये कर्मचारी, अधिकारी तसेच पत्रकार यांच्यासह सोलापूरकरांचेही चांगले सहकार्य लाभले. विविध विभागाची कामे चांगल्या पद्धतीने करता आली. एक चांगला ऋणानुबंध सोलापूरशी निर्माण झाला. यामुळे सोलापुरातील कार्यकाळ हा चिरस्मरणात राहील, अशी भावना उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी व्यक्त केली.

# आजपासून पक्षीसप्ताह; विविध कार्यक्रमांचे आयोजन


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

पक्षी सप्ताहानिमित्त सामाजिक वनीकरण विभाग, वन विभाग सोलापूर व एनटीपीसी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विभागीय वन अधिकारी लक्ष्मण आवारे यांनी दिली आहे.

पद्मश्री अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांची ५ नोव्हेंबर रोजी जयंती असते. तर १२ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ पक्षी तज्ज्ञ सलीम आली यांची जयंती असते. म्हणून ५ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत पक्षी सप्ताह साजरा केला जातो. या सप्ताहानिमित्त दि. ५ नाव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सिध्देश्वर वन विहार येथे पक्षी सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे. तर ६ नोव्हेंबर रोजी डॉ. सलीम अली व अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या जीवन चरित्रावर वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. ७ नोव्हेंबर रोजी पक्षांविषयी छायाचित्रे, चलचित्रे, लघुपट यावर खुल्या स्पर्धा होणार आहेत. ८ नोव्हेंबर रोजी पथनाट्य स्पर्धा, ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता हिप्परगा तलाव आणि गंगेवाडी परिसरात पक्षी निरीक्षण होईल.

**पक्षी सप्ताहाचा उद्देश काय?**

महाराष्ट्रामध्ये ५ ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षी सप्ताह साजरा केला जातो कारण हा काळ पक्षीमित्र मारुती चितमपल्ली (जन्म ५ नोव्हेंबर) आणि थोर पक्षीशास्त्रज्ञ डॉ. सलीम अली (जन्म १२ नोव्हेंबर) यांच्या जयंतीनिमित्त आहे. या सप्ताहाचा मुख्य उद्देश लोकांना पक्ष्यांचे महत्त्व समजावून देणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी जनजागृती करणे हा आहे.आधुनिक जीवनशैलीमुळे पक्ष्यांच्या जीवनातील त्यांचे महत्त्व कमी होत चालले आहे. या सप्ताहामुळे लोकांना पक्ष्यांचे निसर्गातील कार्य आणि जैवविविधतेसाठी त्यांचे योगदान समजावून दिले जाते.



१० नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता बोरामणी येथे विविध सामाजिक संस्थांचे सदस्य आणि पत्रकारांसाठी पक्षीनिरिक्षणाचा कार्यक्रम होणार आहे. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता 'जखमी पक्षांचे बचाव कार्य' याबाबत कार्यशाळा होणार आहे. तर १२ नोव्हेंबर रोजी स्मृती उद्यान येथे पक्षी सप्ताहाचा समारोप आणि विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. पक्ष्यांची संख्या कमी होत असताना, या सप्ताहामुळे त्यांच्या संवर्धनासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण होते. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली आणि डॉ. सलीम अली यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो, ज्यांनी पक्षी निरीक्षण आणि संवर्धनासाठी मोठे योगदान दिले आहे.

# भाजीचे पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

कामती खुर्द येथील बाजारात भाजीचे पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून महिलेस मारहाण करण्यात आली. सुरेखा दत्तात्रय पवार (वय ५२, रा. कामती बु, ता. मोहोळ) असे जखमी महिलेचे नाव आहे. ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास कामती खुर्द येथील बाजारात भाजीचे पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून रणजित शिंदे व इतर एकाने लाथाबुक्क्याने दगडाने मारहाण केली. यामध्ये सुरेखा पवार यांच्या सर्वांगास मुका मार लागला असून त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

MANODAYA NEUROPSYCHIATRIC CENTRE
Neuropsychiatry Hospital and De-Addiction Centre

मनोविकार तज्ज्ञ डॉ.दिलीप बुरटे व डॉ.निहार बुरटे यांचे दि. ०४/११/२०२५ या आधीचे बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) रेकॉर्ड नष्ट करण्यात येणार आहे.
यासंबंधी कोणास माहिती हवी असेल तर संबंधितांनी योग्य त्या कागदपत्राबरोबर खालील ठिकाणी मंगळवार दि. १८/११/२०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**मनोदय न्यूरोसायॅकट्रिक सेंटर**
७११४/२/३, घर नं. ९३६ बी,
उत्तर सदर बझार, रिमांड होम जवळ, सोलापूर, ४१३००३
**फोन नं. ०२१७-२३१४४३३ मो. ७०८३०६९४९६**

**Consultant Psychiatrists**
Dr.Dilip Burte and Dr.Nihar Burte have decided to destroy OPD (Case-Papers) Record dated 04/11/2025 and before.
If Concerned individuals want any information they have to contact with necesary documents before Tuesday 18/11/2025 on following address
**Manodaya Neuropsychiatric Centre**
7114/2/3 House No.936 B, North Sadar Bazar, Near Remand Home, Solapur 413003
**Phone : 0217-2314433 Mo7083069496**



# 'राष्ट्रीय एकता परेड'मध्ये सोलापूर ग्रामीण पोलीसचा डंका

**पोलीस मुख्यालयातील ४ अंमलदाराचा राष्ट्रीय एकता परेडमध्ये सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून ३१ ऑक्टोबर रोजी केवडिया (गुजरात) येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय एकता परेड' मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या एक पथकाने सहभाग नोंदवला. महाराष्ट्राच्या पथकामध्ये सोलापूर ग्रामीण पोलिसांचे चार कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

महाराष्ट्र पोलीस दलाच्या या पथकामध्ये पोलीस उपअधीक्षक सविता मारुती गर्जे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अंमलदारांनी सहभाग नोंदवला होता. या पथकामध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वाद्यवृंध पथकातील पोलिस हवादलार अतुल गुंडाप्पा सुरवसे, प्रशांत कर्णेश्वर जाधव, सागर सुधीर हळदे, पोलिस शिपाई स्वप्निल रेवणसिध्द सुरवसे यांची निवड झाली होती.

या अंमलदारांनी राष्ट्रीय एकता परोडसाठी सुमारे ५० दिवस स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे सराव केला असून ३१ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष राष्ट्रीय एकता परेडमध्ये सहभाग नोंदविला. या परेडमध्ये यशस्वीरीत्या सहभाग घेवून अंमलदार हे पोलीस मुख्यालयात हजर झाले असून सहभागी पोलीस अंमलदार यांचे पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

# शेळगी नाल्याच्या प्रवाहाचा १९१२ मधील मोजणी नकाशा मिळाला

**नकाशानुसार या नाल्याचा मूळ प्रवाह, त्याची दिशा निश्चित**

**नाले रुंदीकरण खोलीकरण, अतिक्रमण निष्कषण कार्यवाहीला मिळणार बळकटी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या झोन क्रमांक सहा मधील शेळगी नाल्याच्या प्रवाहाचा सन १९१२ मधील मोजणी नकाशा महानगरपालिकेकडे प्राप्त झाला आहे. या नकाशानुसार या नाल्याचा मूळ प्रवाह आणि त्याची दिशा निश्चित झाल्याने महानगरपालिकेच्या नाले रुंदीकरण खोलीकरण व अतिक्रमण निष्कषण कार्यवाहीला बळकटी मिळाली आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नाले रुंदीकरण खोलीकरण व अतिक्रमण निष्कषणाची मोहीम हाती घेण्यात आली होती अंतर्गत झोन क्रमांक ६ मध्ये शेळगी नाल्याचा मूळ प्रवाह कायम करण्याच्या मोहिमेला मोठे यश प्राप्त झाले आहे. दरम्यान, या नाल्याच्या प्रवाहाचा १९१२ मधील मोजणी नकाशा महानगरपालिकेकडे प्राप्त झाला आहे. या नकाशानुसार नाल्याचा मूळ प्रवाह आणि त्याची दिशा निश्चित झाल्याने महानगरपालिकेच्या कार्यवाहीला बळकटी मिळाली आहे.

महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागामार्फत संबंधित विभागीय अधिकारी व अभियंते नियमित स्थळ पाहणी करून कामाचा वेग व गुणवत्ता यावर लक्ष ठेवत आहेत. या कामामुळे परिसरातील पाणी साचणे, दुर्गंधी, तसेच पावसाळ्यातील जलनिस्सारणाच्या तक्रारी यावर प्रभावी नियंत्रण येणार आहे.

"शहरातील सर्व नाले आणि जलवाहिन्यांचा प्रवाह नैसर्गिक दिशेने रहावा व त्यात कोणतेही अडथळे राहू नयेत यासाठी महानगरपालिकेच्या पातळीवर सातत्याने काम सुरू आहे. नागरिकांनीही अशा कामात सहकार्य करून परिसर स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यास मदत करावी", असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**जलप्रवाह व्यवस्थापन अधिक सक्षम होईल : आयुक्त डॉ. ओम्बासे**

या शेळगी नाल्याचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित परिसरातील नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी तुंबणार नाही. घरात पाणी शिरण्यापासून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून जलप्रवाह व्यवस्थापन अधिक सक्षम होईल, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कूळविण्यात येते की, मौजे पिंपरी(पा.) बार्शी परिसरातील लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर व सब डि व ता. बार्शी पैकी मौजे पिंपरी (पा) येथील गट नं. २०९/१ पैकी क्षेत्र हे. ००-७९ पैसे, तसेच गट नं. २०५/३ यापैकी क्षेत्र हे. ००-३० आर, आकार रू, ००-४८ पैसे, येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व हक्कासह वर वर्णन केलेली मिळकत ही श्री. प्रफुल्ल मल्लिकार्जुन गावसाने यांची स्वकष्टार्जित मालकीची असून त्यांनी त्यांच्या कायदेशीर अडचणीपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर मिळकतीचा आमच्या अशिलासोबत खरेदीचा व्यवहार ठरलेला आहे. व आमचे अशिलाने सदर व्यवहारापोटी काही रक्कम इसारापोटी श्री. प्रफुल्ल मल्लिकार्जुन गावसाने यांना दिलेली आहे. व वर नमूद मिळकत आमचे अशिल रजि. खरेदी करणार आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने जर कोणाची काही हितसंबंध निर्माण झालेले असल्यास किंवा कोणाचे काही हितसंबंध होणार असल्यास तसेच वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने जर कोणी इसारपावती, साठेखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, कर्ज, बोजा, पोटगी इत्यादी स्वरूपाचा त्रयस्थाय हस्तांतरण होईल अशा प्रकारचा दस्त झालेला असल्यास संबंधीत व्यक्तिने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून खालील पत्त्यावर आपली लेखी तक्रार ७ दिवसाच्या आत नोंदवावी जर कोणाची काही हरकत आली नाही याची खात्री झालेनंतर आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे खरेदीखत करून घेतील, त्यानंतर कोणाचीही तक्रार आमचे अशिल ऐकून घेणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली असे

दि. ०४/११/२०२५

सही/-
**ॲड. पद्माकर बिभीषण काटमोरे,**
BA.(HON'S)LLB
अति. जिल्हा व सत्र न्यायलय बार्शी
**मो.नं. ९८२२७४३८३४** अशिलातर्फे ॲडव्होकेट

# पैशाच्या व्यवहारातून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर -**

पैशाच्या व्यवहारातून अजय राजा कोंगारी (वय ३५, रा. सात रस्ता, मुन्सिपल कॉलनी,सोलापूर) यास ३ नोंव्हेंबरला कुमठा नाका चौक येथे अंजन तुक्कुवाले व इतर दोन जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अजय कोंगारी याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिव्हील चौकीत नोंद करण्यात आली आहे.

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO : 2025_DOAWAB_1237373_1

**Supply, Istallation, Commissioning & Testing of Cleaning & Grading Machine (4-6 TPH) With Distoner**

The Goverment of Maharastra is implementing the World Bank-funded SMART Project Usturi Agro Producer Co. Ltd At Usturi Tq. Nilanga, Dist. Latur is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.**in for above mentioned Mechinery. The bid document iis also available on the 17 project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submissionof online bid is **18/10/2025 up to 03:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only

**District Implementation Unit, SMART Project Dist. Latur**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४**
**दुरध्वनी क्रमांक ०२१८६ / २२६९७५**
Web-www.mahapwd.gov.in & email ID-pandharpur.ee@mahapwd.gov.in

**ई - निविदा सुचना क्रमांक २५ सन २०२५-२०२६ (ऑनलाईन) प्रसिध्दी**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४ (दुरध्वनी क्रमांक ०२१८६/२२६९७५) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून या कार्यालयाचे ०३ कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा है निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा दिनांक ०६/११/२०२५ वेळ सकाळी ११.०० वा. पासून आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | कंत्राटदारचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | करकंब पोलीस ठाणे इमारतीवर मुद्देमाल रुम, मिटींग हॉल, महिला विश्रांती कक्ष, पुरुष विश्रांती कक्ष तयार करणे ता. पंढरपूर | बी-१ | रु. १८,८२,८५७/- (रु. अठरा लाख ब्याऐंशी हजार आठशे सत्तावन फक्त) | १९०००/- ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | १२ महिने (पावसाळ्यासह) | ६००/- (ना परतावा) ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | वर्ग ५ अ व त्यावरील |
| २ | कासेगाव ता. पंढरपुर येथे अ.जा. व नवबौध्द घटकाच्या वस्ती अंतर्गत भीमनगर (झेंडा चौक) येथे सभागृह (संविधान भवन) बांधणे जि. सोलापूर | बी-१ | रु. १६,९१,३७२/- (रु. सोळा लाख एक्याणव हजार तीनशे बहात्तर फक्त) | १७०००/- ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | १२ महिने (पावसाळ्यासह) | ६००/- (ना परतावा) ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | वर्ग ५ अ व त्यावरील |
| ३ | कौठाळी ता. पंढरपूर येथे अ.जा. व नवबौध्द घटकाच्या वस्ती अंतर्गत चौफ़ाळा वस्ती रमाई नगर (अंबाबाई मंदिर शेजारी मस्के वस्ती) येथे सभामंडप बांधणे जि. सोलापूर | बी-१ | रु. १२,६८,१६२/- (रु. बारा लाख अडूसष्ठ हजार एकशे बासष्ठ फक्त) | १३०००/- ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | १२ महिने (पावसाळ्यासह) | ६००/- (ना परतावा) ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे द्वारे | वर्ग ५ अ व त्यावरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक ०६/११/२०२५ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक १३/११/२०२५ वेळ सायं. १७.३० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन निविदामध्ये तांत्रिक मुद्दे उपस्थित करावयाचा अंतिम दिनांक व वेळ (निविदा पुर्व चर्चा बैठक) | ----------- निरंक ----------- |
| ३ | बिड सबमिशन कालावधी | दिनांक ०६/११/२०२५ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक १३/११/२०२५ वेळ सायं. १७.३० वाजेपर्यंत |
| ४ | तांत्रिक आणि आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पंढरपूर या कार्यालयात दिनांक १४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

**टिप :-**
१. वरील कामांची सर्व माहिती ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in and https://mahatenders.gov.in या इंटरनेटवरील वेबसाईटवर दिनांक ०६/११/२०२५ पासून उपलब्ध आहे. सादर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
२. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in da enrolled करणे आवश्यक आहे.
३. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
४. ई-निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत हार्ड कॉपी एका प्रतीत कंत्राटदारानी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिवार्य आहे..

सही/-
**(अमित निमकर)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर**

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नावः अ) SUR विभागातील DEN/LUR उपविभागांतर्गत KWV-SEI ब्लॉकमधील TWR काम किमी 384.0 ते किमी 390.6 सेक्शन. ब) SUR विभागातील DEN/LUR उपविभागांतर्गत KWV-SEI ब्लॉकमधील TWR काम. कामाची अंदाजे किंमतः 27843015.49. बयाणा रक्कमः 289200/-. काम पूर्ण करण्याचा कालावधीः 12 महिने. देखभाल कालावधीः 12 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोटेशन केलेले निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळः 10/11/2025 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 10/11/2025 15.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइटःwww.Ireps.gov.in

DRM (वर्क्स) सोलापूर
**ई-निविदा सूचना क्रमांकः** 36-2025-SrDENC
**अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे**
Sai/SUR/60

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**ई-टेंडर सूचना**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर्स आमंत्रित करत आहे. त्यांच्या परिसरातील कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात टिकेकरवाडी-प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपो फेज-१ शी संबंधित एस अँड टी काम. कामाची अंदाजे किंमतः 6,91,00,189.95. निविदा फॉर्मची किंमतः शून्य. जमा करायची बयाणा रक्कमः 4,95,500/-. काम पूर्ण करण्याचा कालावधीः 12 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 25/11/2025 दुपारी 3.30 नंतर. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा/शुद्धी असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**DRM(S&T)** सोलापूर
ई-निविदा सूचना क्रमांकः **SUR-N-T-2025-26-22** तारीखः **03/11/2025**
**अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे**
Sai/SUR/59

**KATARE SPINNING MILLS LIMITED**
REGD. OFFICE : 14/30 GROUND FLOOR, B WING, KATARE COMLEX, GANDHINAGAR, BL.NO.10 Solapur MH-413006
CIN: L17119PN198PLC022962
Email : katarelspinningmaills@gmail.com

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other appicable regulations of Securites and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Thursday, 13th November, 2025 at 04.00 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the un-audited financial results of the quarterand half year ended on Septmber 30,2025.

A copy of this notice is also posted on the website of the Company wwwkatarespinningmillslimited.com and also on the website of the stock exchange at www.bseindia.com

**FOR KATARE SPINNING MILLS LIMITED**

**SD/-**
**KISHORE KATARE**
**MANAGING DIRECTOR**
**(DIN-00645013)**

**Place : Solapur**
**Date : o4.11.2025**

**तहसिल कार्यालय बार्शी**
**(कुळ कायदा शाखा)**
दुरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ email-tahbarshi@gmail.com

क्र. कुळकायदा/क. १४,१५/एसआर-१२/२५ दिनांक ०३/११ /२०२५

**जाहिर समन्स/वृत्तपत्राद्वारे**

प्रति,
१. मोहन शहाजी सवने -- **अर्जदार**
रा, चिखर्डे ता.बार्शी

**विरूध्द**

१. गोविंद नरहरी जाधव -- **सामनेवाले**
२. यशवंत निवृत्ती कोंढारे
३. तुकाराम गोविंद कोंढारे
रा. चिखर्डे ता. बार्शी

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

**दावा जमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गटनंबर | क्षेत्र हे.आर. | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| चिखर्डे | २६५ | १.०२ | ०.०१ | २.७६ |

दावा जमीनीबाबत अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या इतर हक्कातील गोविंद नरहरी जाधव, यशवंत निवृत्ती कोंढारे, तुकाराम गोविंद कोंढारे स.सा.कुळ म्हणून असलेले नाव कमी करून मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेले आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये दि, ०९/१०/२०२५ रोजी चौकशीची तारीख ठेवण्यात आलेली होती. तथापी प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महसूल अधिकारी चिखर्डे ता. बार्शी यांनी यांनी प्रतिवादी हे गावी आढळून येत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येत की, वरील नमूद प्रतिवादी अथवा त्यांचे वारस हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदर जाहीर समन्स प्रसिद्धीपासून एक महिन्याचे आत हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**एफ.आर.शेख**
**तहसिलदार बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जयस्वालचे शतक, मुंबईला फक्त एक गुण



**जयपूर** : सलामीवीर यशस्वी जयस्वालने १६ वे प्रथम श्रेणी शतक झळकावले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी त्याची बाजू भक्कम झाली आहे. परंतु मुंबईने राजस्थानविरुद्धच्या रणजी ट्रॉफी ग्रुप डी सामन्यात फक्त एक गुण मिळवला. पहिल्या डावात ६१७ धावा करून राजस्थानने ३६३ धावांची आघाडी घेतली होती. दीपक हुडाने २४८ धावांची संस्मरणीय खेळी खेळली. पहिल्या डावात २५४ धावा करणाऱ्या मुंबईने तिसऱ्या दिवसअखेर ८९ धावा केल्या होत्या. शेवटच्या दिवशी जयस्वालने १७४ चेंडूत १५६ धावा केल्या. त्याच्या खेळाच्या बळावर मुंबईला तीन बाद २६९ धावा गाठता आल्या. राजस्थानने शेवटच्या दिवशी ६० षटके गोलंदाजी केली. जयस्वालने त्याच्या डावात १८ चौकार आणि एक षटकार मारला. त्याने मुशीर खान (११५ चेंडूत ६३) सोबत दुसऱ्या गड्यासाठी १४९ आणि सिद्धेश लाड (नाबाद १९) सोबत तिसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी केली.

### स्मृती मंधानाची दुसऱ्या स्थानावर घसरण

**दुबई** : भारताची सलामीवीर स्मृती मंधानाची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) महिला एकदिवसीय क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे, तर जेमिमा रॉड्रिग्ज नऊ स्थानांनी झेप घेऊन १० व्या स्थानावर पोहोचली आहे. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्डने ताज्या यादीत दोन स्थानांनी प्रगती केली आहे. उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत शतके झळकावणाऱ्या तिच्या अविश्वसनीय कामगिरीनंतर वोल्वार्डने मंधानाला मागे टाकले. वोल्वार्डने स्पर्धेत ५७१ धावा केल्या. तो एका विश्वचषकात सर्वाधिक धावांचा एक नवा विक्रम आहे. यामुळे तिला तिचे कारकीर्दीतील सर्वोच्च ८१४ रेटिंग गाठण्यास मदत झाली. नवी मुंबईतील उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयात भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या रॉड्रिग्जने तिच्या प्रभावी कामगिरीमुळे अव्वल १० मध्ये स्थान मिळवले. त्याच सामन्यातील शतकामुळे फोबी लिचफिल्डने १३ स्थानांनी झेप घेऊन कारकीर्दीतील सर्वोत्तम १३ व्या क्रमांकावर (६३७) पोहोचली. ऑस्ट्रेलियाची एलिस पेरी सातव्या स्थानावर पोहोचली आहे, न्यूझीलंडच्या सोफी डेव्हाईनसह ती सातव्या स्थानावर आहे. डेव्हाईनने आधीच एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर देखील चार स्थानांनी पुढे सरकून १४ व्या स्थानावर पोहोचली आहे.

### हायकोर्टाने कर्णबधिर खेळाडूंच्या पुरस्कारासाठी निकष मागितले

**नवी दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार २०२५ हा कर्णबधिर खेळाडूंना देण्यासाठी शक्य तितक्या लवकर योग्य निकष तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, सध्याचे निकष पॅरा-ॲथलिट्सच्या तुलनेत त्यांच्याशी भेदभाव करतात. न्यायाधीश सचिन दत्ता यांनी सोमवारी दिलेल्या आदेशात, कर्णबधिर खेळाडूंना पुरस्कारासाठी अर्ज सादर करता यावेत यासाठी निकष जलदगतीने तयार करण्याचे निर्देश दिले. अर्ज करण्याची अंतिम तारीख वाढविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पुरस्कारांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख २८ ऑक्टोबर होती.

### गुडघ्याच्या दुखापतीमुळे अश्विन बीबीएलमधून बाहेर

**नवी दिल्ली** : गुडघ्याच्या शस्त्रक्रियेमुळे आर. अश्विनला सिडनी थंडरसोबत बीबीएल पदार्पण रद्द करावे लागले. त्याने सांगितले की ही संधी गमावल्याने मी खूप निराशा आहे. या वर्षाच्या सुरुवातीला आयपीएलमधून निवृत्त झाल्यानंतर, अश्विन परदेशी लीगमध्ये खेळण्यास सज्ज होता. त्याने संपूर्ण बीबीएल हंगामासाठी थंडरसोबत करार केला होता. अश्विनने थंडरच्या निवेदनात म्हटले आहे की, बीबीएल १५ गमावल्याबद्दल मला खूप वाईट वाटते. माझे पूर्ण लक्ष आता तंदुरुस्त होण्यावर आहे. मी थंडर कुटुंब आणि चाहत्यांचा आभारी आहे, ज्यांनी आधीच खूप प्रेम दाखवले आहे.

### सूर्यकुमार यादवला दंड, रौफवर दोन सामन्यांची बंदी

**दुबई** : भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हरिस रौफ यांना युएईमध्ये झालेल्या आशिया कप दरम्यान आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळले आणि मंगळवारी दोघांनाही शिक्षा सुनावण्यात आली. भारताविरुद्धच्या दोन वेगवेगळ्या घटनांसाठी रौफला ३० टक्के दंड ठोठावण्यात आला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतही त्याच्यावर दोन सामन्यांची बंदी घालण्यात आली. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवला त्याच्या सामन्याच्या शुल्काच्या ३० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

# विदर्भ-तामिळनाडू सामना अनिर्णीत

**सामनावीर विदर्भाचा नचिकेत भुते ● रणजी करंडक क्रिकेट सामना**

◆ **कोईम्बतूर, ४ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत चौथ्या आणि शेवटच्या दिवशी तामिळनाडूच्या बाबा इंद्रजितने विदर्भाच्या गोलंदाजांचा चिकाटीने सामना करीत नाबाद ७७ धावा केल्या आणि सामना अनिर्णीत अवस्थेत संपवला. पहिल्या डावात तामिळनाडूने २९१ धावा केल्या. दुसऱ्या डावात ६ बाद २३३ धावा केल्या. विदर्भाने फलंदाजी करताना ५०१ धावा केल्या. विदर्भाचा नचिकेत भुते सामनावीर ठरला. त्याने नाबाद ५१ धावा केल्या आणि ६५ धावांत ५ गडी बाद केले.

चौथ्या दिवशी तामिळनाडूच्या आतिश एसआर आणि विमल कुमार यांनी डाव सुरू केला. पण संघाच्या १२ धावा असताना विमल कुमारला प्रफुल्ल हिंगेने बाद केले. त्यानंतर प्रदोश रंजन पॉल मैदानावर उतरला. तोही चमकदार कामगिरी करू शकला नाही. त्याने १४ धावा काढल्या. त्याला ललित यादवने बाद केले. त्यानंतर आलेला सी. आंद्रे सिद्धार्थ फाळ टिकला नाही.



फटका मारताना तामिळनाडूचा बाबा इंद्रजित



सामनावीर नचिकेत भुते

तामिळनाडूच्या ४७ धावा असताना सिद्धार्थला प्रफुल्ल हिंगेने बाद केले. त्याने ११ धावा केल्या. बाबा इंद्रजित आणि आतिश एसआर यांनी चांगली भागीदारी केली. पण अर्धशतकापासून ४ धावा दूर असता आतिशला पार्थ रेखाडेने बाद केले. आतिशने ४६ धावा केल्या. त्याची जागा घेणारा शाहरुख खानने ५६ चेंडूंत ४० धावा केल्या. इंद्रजित आणि शाहरुखने तामिळनाडूला शंभरी पार करून दिली. ४० धावांवर असताना प्रफुल्ल हिंगेने शाहरुख खानला बाद केले. मोहम्मद अलीने २५ धावा करून बाबा इंद्रजितला चांगली साथ दिली. त्यालाही प्रफुल्ल हिंगेने बाद केले. त्यानंतर सामन्याची केवळ औपचारिकता बाकी होती. बाबा इंद्रजित आणि साई किशोरने शेवटपर्यंत खेळत सामना अनिर्णीत अवस्थेत संपवला आणि ६ बाद २३३ धावांवर खेळ थांबला. सामना थांबला तेव्हा साई किशोर ४ धावांवर नाबाद होता. बाबा इंद्रजितने पहिल्या डावात ९६ धावा केल्या होत्या. विदर्भाकडून पार्थ रेखाने ६४ धावांत १, प्रफुल्ल हिंगेने ६० धावांत ४ आणि ललित यादवने ४६ धावांत १ गडी बाद केला. आता विदर्भ संघ गुणतालिकेत १३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. (वृत्तसंस्था)

# आयसीसी महिला विश्वचषक संघात मंधाना, जेमिमा, दीप्तीचा समावेश

◆ **दुबई, ४ नोव्हेंबर**

महिला एकदिवसीय विवचषक स्पर्धेत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि दीप्ती शर्मा यांचा मंगळवारी जाहीर झालेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) स्पर्धेतील सर्वोत्तम संघात समावेश करण्यात आला.

रविवारी नवी मुंबईत झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला. स्पर्धेतील सर्वोत्तम संघात दक्षिण आफ्रिकेच्या तीन खेळाडूंचाही समावेश करण्यात आला. यामध्ये कर्णधार लॉरा वोल्वार्डचा समावेश आहे. तिला स्पर्धेतील सर्वोत्तम संघाची कर्णधार म्हणून निवडण्यात आले. एका विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिच्या नावावर आहे, तिने ७१.३७ च्या सरासरीने ५७१ धावा केल्या.

आयसीसीच्या निवेदनानुसार, उपांत्य फेरीत पोहोचलेल्या ऑस्ट्रेलियन संघातील तीन खेळाडू ॲनाबेल सदरलँड, ॲश गार्डनर आणि लेग-स्पिनर अलाना किंग



यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. पाकिस्तानची यष्टिरक्षक सिद्रा नवाज हिचाची आयसीसी संघात समावेश करण्यात आला आहे.

इंग्लंडची सोफी एक्लेस्टोनलाही संघात स्थान देण्यात आले आहे. तिच्याच देशाची नॅट सायव्हर-ब्रंटला १२ वी खेळाडू म्हणून स्थान देण्यात आले आहे.

सलामीवीर फलंदाज मंधानाने ५४.२५ च्या सरासरीने ४३४ धावा केल्या. यात एक शतक आणि दोन अर्धशतके होती. स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ती दुसऱ्या क्रमांकावर राहिली.

रॉड्रिग्जने ५८.४० च्या सरासरीने २९२ धावा केल्या. यामध्ये एक शतक आणि एक अर्धशतक होते. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत तिने नाबाद १२७ धावा करून भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला क्रिकेट संघ दिल्लीत दाखल

**पंतप्रधान नरेंद्र मोदींची घेणार भेट**

◆ **नवी दिल्ली, ४ नोव्हेंबर**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील विश्वचषक विजेता भारतीय महिला क्रिकेट संघ बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी दिल्लीत दाखल झाला.

रविवारी नवी मुंबई येथे झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी हरवून भारताने पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला. मुंबई विमानतळावर मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्यासह संघातील सदस्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. सुरक्षा प्रोटोकॉलमुळे सामान्य नागरिकांना प्रवेश देण्यात आला नसल्याने, दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विशेष विमान टर्मिनल येथे केवळ पत्रकार उपस्थित होते. विशेष विमानाने भारतीय संघ मुंबईहून दिल्लीत



पोहोचला. दिल्लीत आगमन झाल्यानंतर, भारतीय संघातील सदस्य त्यांच्या हॉटेलकडे रवाना झाले. बुधवारी संध्याकाळी पंतप्रधान मोदींना भेटल्यानंतर ते आपापल्या शहरात परततील. शेफाली वर्मा नागालँडमध्ये होणाऱ्या आंतरर-विभागीयटी-२० स्पर्धेत उत्तर विभागाचे नेतृत्व करण्यासाठी जाईल. पंतप्रधान मोदी विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचा सन्मान करतील. हा समारंभ त्यांच्या निवासस्थानी होणार आहे. (वृत्तसंस्था)

# स्वप्न पाहणे थांबवू नका, यश निश्चित

**कर्णधार हरमनप्रीतचा विश्वास**

◆ **नवी दिल्ली, ४ नोव्हेंबर**

लहानपणी वडिलांची मोठी बॅट धरून क्रिकेटचे मूलभूत ज्ञान मिळवलेल्या हरमनप्रीत कौरने कधीही स्वप्न पाहणे थांबवले नाही आणि तिने भारताला पहिला महिला विश्वचषक मिळवून दिला. रविवारी नवी मुंबईत झालेल्या महिला एकदिवसीय विश्वचषक अंतिम फेरीत भारताच्या ५२ धावांनी विजयात महत्त्वाची भूमिका तिने बजावली. भारतीय कर्णधार हरमनप्रीत म्हणाली, स्वप्न पाहणे कधीही थांबवू नका. तुमचे नशीब तुम्हाला कुठे घेऊन जाईल हे तुम्हाला कधीच माहिती नाही.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओमध्ये हरमनप्रीत म्हणाली, मी लहानपणी माझ्या आवडीनिवडी ओळखायला सुरुवात केल्यापासून माझ्या हातात नेहमीच बॅट असे. मला अजूनही माझ्या वडिलांच्या किट बॅगमधील बॅटने खेळल्याचे आठवते. ती खूप मोठी बॅट होती.

एक दिवस माझ्या वडिलांनी त्यांची जुनी बॅट कापली आणि माझ्यासाठी लहान करून दिली. आम्ही त्याने खेळत होतो. जेव्हा जेव्हा आम्ही टीव्हीवर सामने पाहायचो, भारताचा खेळ पाहायचो किंवा विवचषक पाहायचो, तेव्हा मला वाटायचे की मलाही अशीच संधी मिळावी. त्यावेळी मला महिला क्रिकेटबद्दल माहितीही नव्हती. बालपणापासून सुरू झालेल्या या प्रवासामुळे विश्वचषक जिंकला. परंतु वाटेत मला कठीण संघर्ष आणि हृदयद्रावक पराभवांचा सामना करावा लागला.

हरमनप्रीत म्हणाली, मी ही निळी जर्सी घालण्याचे स्वप्न पाहिले होते. हे माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे. एक तरुण मुलगी म्हणून जिला महिला क्रिकेटबद्दल माहिती नव्हती, तरीही ती एक दिवस तिच्या देशात बदल घडवण्याचे स्वप्न पाहत होती. तुम्ही कधीही स्वप्न पाहणे थांबवू नका. तुमचे नशीब तुम्हाला कुठे घेऊन जाईल हे तुम्हाला कधीच माहीत नाही. ते कधी घडेल किंवा ते कसे घडेल याचा तुम्ही कधीही विचार करत नाही. तिचे बालपणीचे स्वप्न पूर्ण झाल्यामुळे आनंद व्यक्त केला.

हा माझ्यासाठी खूपच भावनिक



क्षण आहे. कारण लहानपणापासूनच ते माझे स्वप्न आहे. मी खेळायला सुरुवात केल्यापासून, एक दिवस विवचषक जिंकण्याचे माझे स्वप्न आहे. जर मला माझ्या संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली तर मी ते गमावू इच्छित नाही. (वृत्तसंस्था)

# पुणे शहरातील शाळांचे वर्चस्व

**पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धा : सोलापूरच्या केएलई स्कूलला तृतीय स्थान**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ नोव्हेंबर -**

पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात पुणे शहरातील शाळांनी वर्चस्व प्राप्त केले. मुलांच्या गटात सोलापूरच्या केएलई स्कूलने तृतीय स्थान संपादिले.

सांगोला विद्यामंदिर येथे सुरू झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते झाले. यावेळी संस्था सचिव म. शं. घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे,



उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, निवड समिती सदस्य व शिवछत्रपती पुरस्कार विजेते संघटक हाजीमलंग नदाफ, राष्ट्रीय खेळाडू महेश ढेंबरे, खेळाडू संघटक प्रशांत मस्के, पुणे जिल्हा बास्केटबॉल असो.चे उपाध्यक्ष सुरेश शेलार उपस्थित होते. या स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडाशिक्षक सुनील भोरे, प्रा.डी.के. पाटील, नरेंद्र होनराव, अजित मोरे यांचे सहकार्य लाभत आहे. सोलापूर जिल्हा असोसिएशनचे पंच माजिद पठाण खान, राजेंद्र नारायणकर, जकी लोकापल्ली, सुफियान पठाण, संतोष खाडे, श्रीधर गायकवाड या पंचांची नियुक्ती केली आहे.

**अंतिम प्रथम तीन संघ**

**१७ वर्षांखालील मुले** : अमनोरा स्कूल हडपसर (पुणे शहर), इंदिरा नॅशनल स्कूल (पिंपरी चिंचवड), केएलई स्कूल (सोलापूर शहर).

**मुली** : सरदार दस्तूर खान गर्ल्स हायस्कूल (पुणे शहर), विस्डम वर्ल्ड स्कूल (पिंपरी चिंचवड), ब्ल्यू रिड्ज पब्लिक स्कूल (पुणे ग्रामीण)

**शासनाच्या सहकार्यामुळे भव्य इनडोअर ग्राऊंड साकारले**

सां.ता.शि.प्र.मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृतिदिनानिमित्त सांगोला सारख्या ग्रामीण भागामध्ये सांगोला विद्यामंदिर येथे गेली ४३ वर्षे राज्यस्तरीय व या वर्षी राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्या. दरवर्षी पावसामुळे सामन्यामधे व्यत्यय निर्माण होत होता. त्यामुळे माजी क्रीडामंत्री संजयजी बनसोडे यांनी १.२० कोटी रु. निधी मंजूर केल्यामुळे भव्य इनडोअर ग्राऊंड साकार झाले. त्यामुळेच आज विभागीय बास्केटबॉल स्पर्धा या ठिकाणी संपन्न होत आहेत. **-प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उद्घाटक**



# बेसबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजला विजेतेपद

**शालेय शहर स्पर्धा : सॉफ्टबॉल स्पर्धेत उपविजयी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.४ नोव्हेंबर-**

शालेय शहर बेसबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने विजेतेपद तर सॉफ्टबॉल स्पर्धेत उपविजेतेपद संपादिले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले

**विजेता संघ** : महेश तेली (कर्णधार), सौरभ लोखंडे, अभिषेक नागणसूरे, वीरेश कुंभार, मल्लिकार्जुन जमादार, रामानंद बोरगावकर, प्रथम मिस्कीन, भागोदय कोटे, धीरज रायकोटी, आकाश वाघमारे, बसवराज काळे, साबीर सुगुर, सुजल धनगर, सिद्धेश्वर लादे, अथर्व गायकवाड, राजकुमार गालुरगी.

## गांधी नाथा रंगजीची कादंबरी लोकरे जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत प्रथम

**धंगेकर, देशपांडे व पौळ यांचीही विविध स्पर्धेत कामगिरी**

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शहर जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत गांधी नाथा रंगजी कॉमर्स ॲन्ड सायन्स ज्युनियर कॉलेजच्या कादंबरी लोकरे हिने जिम्नॅस्टिक्स रिदमिक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. स्नेहा धंगेकर हिने रिदमिक प्रकारात चौथे स्थान मिळविले. दोघींची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच अनुराधा देशपांडे हिने कराटे स्पर्धेत द्वितीय तर राधिका पौळ हिने रोल बॉल स्पर्धेत स्थान संपादिले. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राचार्या स्मिता रणदिवे, अमोल कांबळे यांनी अभिनंदन केले.



# बोरामणीत शुक्रवारी आमदार केसरी २०२५ कुस्ती स्पर्धा

**केसरीसाठी दोन लाख व चांदीची गदा : एकूण सात लाखांची बक्षिसे**

**निमित्त आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसाचे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

अक्कलकोट आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित बोरामणी येथे सोमनाथ पटणे मित्र परिवार व समस्त बोरामणी ग्रामस्थ याच्या वतीने आमदार केसरी २०२५ या मैदानी कुस्ती स्पर्धेचे आयोजन एस.व्ही.सी.एस. हायस्कूल बोरामणी येथे शुक्रवार ७ नोव्हेंबर दुपारी ४ वाजता आयोजित केल्याची माहिती सोमनाथ पटणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या स्पर्धेसाठी पहिले बक्षीस २ लाख रुपये रोख, चांदीची गदा व आमदार केसरी असे बक्षीस आहे. एकूण ७ लाख ५० हजार रुपयाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधिश्वर श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी काशीपीठ वाराणसी आणि आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

या कार्यक्रमास राज्य कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, आयआरएस अधिकारी मल्लिनाथ जेऊरे, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे, अक्कलकोटवे नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, सहाय्यक वनसंरक्षक मंगळुर शशिकांत विभुते, उद्योजक सागर कते. श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती सुनिल कळके, चन्नवीर बिराजदार, कुस्ती मल्ल सम्राट पै. अस्लम काझी आदी मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अधिक अधिक मल्लांनी या कुस्ती स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सोमनाथ पटणे मित्र परिवार व समस्त बोरामणी ग्रामस्थ यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस भगवान चव्हाण, केदारनाथ साखरे, प्रवीण कासार, महादेव पाटील, मनोज गुंड आदी उपस्थित होते.



# जागृती विद्यामंदीरची साक्षी राठोड सोलापूर जिल्हा किशोरी कबड्डी संघाची कर्णधार

**जिल्हा संघात ९ खेळाडूंचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

नेहरूनगर येथील जागृती विद्यामंदीरची व रुक्माई स्पोर्ट्स क्लबची अष्टपैलू खेळाडूसाक्षी राठोडची सोलापूर जिल्हा किशोरी कबड्डी संघाची कर्णधारपदी निवड झाली.

पाच ते नऊ नोव्हेंबर दरम्यान बोपखेल खर्डी (पुणे) येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी संघाची निवड जिल्हा कबड्डी संघटनेचे सचिव मदन गायकवाड यांनी जाहीर केले. त्यात तिच्यासह मोनिका चव्हाण, पवित्र पुजारी, आदिती गायकवाड, श्रावणी उंबरजे, तेजस्वी राठोड, ज्योती चव्हाण, धोंडावा कोळी यांची तर मुलांच्या गटात राजेश नाईकनवरे अशा ९ खेळाडूंचा समावेश आहे. या स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ निवडला जाणार आहे सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक संतोष जाधव, रफिक गारे, मेघा गवळी व पूजा जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, प्राचार्य विजारत्न चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, सचिव किरण चव्हाण, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल जाधव सचिव मदन गायकवाड यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### माण नदीत उडी घेऊन एकाचा मृत्यू; कोपटेवस्ती पुलावरील घटना

**सांगोला,दि.४ नोव्हेंबर -**

सांगोला शहरालगत असलेल्या कोपटेवस्ती येथील माण नदी पुलावरून उडी घेऊन एकाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवार दि.४ नोव्हेंबर रोजी घडली. याबाबत अधिक माहिती अशी, सावे (ता. सांगोला) येथील अंकुश गावडे व बंडु गावडे हे दोघे बंधू मंगळवार दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास मोटर सायकलवर सांगोल्यातून कोपटेवस्ती मार्गे सावे येथे जात असताना बंडु गावडे यांनी लघवी करायची आहे म्हणुन मोटारसायकल थांबवण्यास सांगितली तेव्हा अंकुश गावडे यांनी पुलावर सायकल थांबवली. तेव्हा बंडु गावडे यांनी मोटारसायकल वरुन खाली उतरुन पुलाच्या कठड्यावरुन माण नदीच्या पाण्याच्या पात्रात दारूच्या नशेत उडी घेतली. यावेळी अंकुश गावडे यांनी आरडाओरडा केला असता लोक जमा झाले परंतु बंडु गावडे थोडा वेळ पोहत गेल्यानंतर माण नदीचे पाण्याचे पात्रात बुडला होता. दरम्यान साडेबाराच्या सुमारास श्रीकांत कोळवले यांनी बंडु गावडे यांना पाण्यातून बाहेर काढले व ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथे नेले असता उपचारापुर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत अंकुश आत्माराम गावडे, रा.गावडे वस्ती, सावे, ता.सांगोला यांनी बंडु आत्माराम गावडे (वय-३५), रा.गावडे वस्ती, सावे, ता.सांगोला हे पाण्यात बुडून उपचारापुर्वी मयत झाल्याची खबर सांगोला पोलीस ठाणे येथे दिली. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.



### करमाळा तालुका योगमय झाला पाहिजे; योग समितीचे प्रीतेश लाड यांचे प्रतिपादन

**करमाळा, दि.४ नोव्हेंबर -**

करमाळा तालुक्यातील १०८ गावांपर्यंत योगाद्वारे जात संपूर्ण तालुका योगमय झाला पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र युवा राज्य प्रभारी प्रितेश लाड यांनी केले. परमपूज्य संदेश स्वामी जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पतंजली योग समिती सोलापूर आणि करमाळा समितीच्या वतीने प्रत्येक गावात योग शिबिर, आसन, प्राणायाम, ध्यान, नशामुक्ति, स्वदेशी चिकित्सा, वृक्षारोपणाचा निर्णय झाला. यावेळी पतंजली योग समितीचे जिल्हा भारत प्रभारी सुरेंद्र पिसे आणि संतोष दुधाळ, जिल्हा संवाद प्रभारी मधुकर सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष रघुनंदन भुतडा, किसान सेवा समिती जिल्हा प्रभारी भगवान बनसोडे, जिल्हा संघटन मंत्री प्रकाश जाधव, मोहोळ तालुका प्रभारी विजय कांबळे उपस्थित होते. कमला भवानी बहुउद्देशीय संस्थेतर्फे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अशोक बरडे, चंद्रकांत वीर, संध्या बिले, रेशमा जाधव, संध्या थोरे, संतोष पोतदार, निशिगंधा शेंडे, प्रदीप नलावडे यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी तालुक्याची निवड समिती जाहीर करण्यात आली. यामध्ये प्राचार्य बाळासाहेब नरारे यांची भारत स्वाभिमान न्यास तालुका प्रभारी, हनुमान सिंग परदेशी पतंजली योग समिती तालुका प्रभारी, प्राचार्य जयप्रकाश बिले किसन सेवा समिती तालुका प्रभारी, अशोक बरडे किसन सेवा सहप्रभारी, संकेत खाटेर युवा भारत तालुका प्रभारी, प्रवीण देवी युवा भारत सह प्रभारी, अजित नरसाळे सोशल मीडिया तालुका प्रभारी आणि संतोष पोतदार यांची सोशल मीडिया सह प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. चंद्रकांत वीर, प्रवीण देवी, ललित अग्रवाल, डॉ श्रीराम परदेशी, रंदवे गुरुजी, राजेंद्र परदेशी इत्यादींची उप समित्यावर नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी आजी-माजी पदाधिकारी आणि सर्व योगसाधक योगसाधक , आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. श्री उपाध्याय यांनी सूत्रसंचालन तर आभार महिला महामंत्री माधुरीताई साखरे यांनी मानले.

### दादासो बाबर यांचे निधन

**सांगोला, दि. ४ नोव्हेंबर -**



चोपडी (ता.सांगोला) येथील ह.भ.प.दादासो शंकर बाबर (वय-९३) यांचे सोमवारी सायंकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चोपडी गावात होणाऱ्या विविध धार्मिक व संप्रदाय कार्यक्रमात त्यांचा नेहमी सहभाग असायचा.

# बार्शीत अनैतिक संबंधातून विवाहितेचा गळा चिरून हत्या; मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह पूनम रोडे-निरफळ हिचा खून

### आरोपी केतन जैन पोलिसांच्या स्वाधीन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ नोव्हेंबर-**

बार्शी शहरातील उपळाई रोडवरील शेंडगे प्लॉट येथे सोमवारी (दि. ३ नोव्हेंबर) सायंकाळी घडलेली महिला खुनाची घटना संपूर्ण शहर हादरवून टाकणारी ठरली. वैद्यकीय क्षेत्रात मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून कार्यरत पूनम बालाजी रोडे-निरफळ (वय-३७) हिचा घरातील किचनमध्ये तीक्ष्ण हत्याराने गळा चिरुन निर्घृण खून करण्यात आला.

या प्रकरणात संशयित केतन जैन (वय ३४, रा. बार्शी) याने स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन होत गुन्ह्याची कबुली दिल्याचे समजते. सोमवारी सायंकाळी उघडकीस आलेले भीषण दृश्य फिर्यादी बालाजी विठ्ठलराव निरफळ (रा. शेंडगे प्लॉट, उपळाई रोड) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीप्रमाणे ते रोजच्या कामानिमित्त धाराशिवला जात असतात. दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ते धाराशिव येथे गेले होते. दुपारी पत्नी पूनम हिने फोनवर बोलून तुळशी विवाहासाठी साहित्य घेऊन या, असे सांगितले. बालाजी हे सायंकाळी साडेपाच वाजता घरी पोहोचले असता, घराचे मुख्य गेट कुलूपबंद आढळले. १२ वर्षीय मुलगा ओमसाई शाळेतून परत आला होता. पूनम बाहेर गेली असे वाटून काही काळ थांबले. मात्र तिच्या मोबाईलवर कॉल केल्यावर घरातूनच फोनची रिंग ऐकू आली. संशय आल्याने बालाजी यांनी चालक लालासाहेब याला गेटवरुन आत पाहण्यास सांगितले. त्याने आत डोकावून




पाहिले असता, किचनमध्ये पूनम रक्ताच्या थारोळ्यात पडलेली असल्याचे दिसून आले. मुख्य गेट व किचनचे कुलूप तोडून आत गेल्यावर घरातील दृश्य पाहून सर्वांचे डोळे पाणावले. पूनम मृतावस्थेत, गळ्यावर धारदार वार, अंगावर केसरी रंगाचा टॉवेल आणि गळ्याभोवती ओढणी!

**सीसीटीव्ही फुटेजमध्ये उघड झाला आरोपीचा चेहरा**

घटनेनंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घरातील सीसीटीव्ही प्रणालीचा प्रवेश मयत पूनमच्या भावाकडे प्रसाद रोडे याच्या मोबाईलमध्ये होता. त्यातून मिळालेल्या फुटेजमध्ये संशयित केतन जैन हा किचनमधून बाहेर येताना स्पष्ट दिसून आला. याच क्षणी खुनाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले. मुलगा ओमसाईने खळबळजनक माहिती दिली. केतन काका वारंवार घरी येत होते. ते आईला शिवीगाळ व मारहाण करायचे. आई म्हणायची की, हे कोणाला सांगायचं नाही, नाहीतर मी रागावेन. त्यामुळे मी आजवर सांगितलं नाही.

**अनैतिक संबंधातून पेटला वाद, शेवट खुनात**

फिर्यादीने पुढे सांगितले की, काही वर्षांपूर्वी पूनमच्या मोबाईलमध्ये केतन जैन आणि तिच्यातील मेसेजेस पाहिल्याने त्यांच्यातील अनैतिक संबंध उघड झाले होते. या संबंधातून वाद निर्माण होऊनच केतन जैनने पूनमचा खून केल्याचा ठोस संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**पोलीस तपास सुरु, आरोपीची चौकशी**

बार्शी शहरातील उपळाई रोडवरील शेंडगे प्लॉट येथे सोमवारी (दि. ३ नोव्हेंबर) सायंकाळी घडलेली महिला खुनाची घटना संपूर्ण शहर हादरवून टाकणारी ठरली. घटनेनंतर काही तासांतच केतन जैन याने स्वतः पोलिसांकडे आत्मसमर्पण केले. बार्शी शहर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन पूनमच्या मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी पाठविला असून, आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीसीटीव्ही पुरावे आणि आरोपीचे विधान यावरुन पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

## पिकअपच्या धडकेने एक ठार
### महुद-सांगोला रस्त्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ नोव्हेंबर -**

पिकपच्या धडकेने एक जण ठार झाल्याची घटना रविवार दि.२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास महुद ते सांगोला रस्त्यावर घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, रविवार दि.२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास वाकी (शिवणे) (ता.सांगोला) गावच्या हद्दीत महुद ते सांगोला रोडवर धाराशिव सहकारी साखर कारखान्याचे समोर पिकअप नं.एमएच.१३ डीक्यु.१६०६ च्या अनोळखी चालकाने त्याच्या ताब्यातील पिकअप ही भरधाव वेगाने निष्काळजीपणे रोडचे परस्थितीचा विचार न करता चालवुन हरीदास दामोदर जाधव (वय-५२) रा.वाकी (शिवणे) ता.सांगोला यांचे पॅशन मोटर सायकल नं.एमएच.४५ के ५४४७ यास समोरून जोराची धडक दिल्याने ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

याबाबत सचिन बाळासो जाधव, रा.वाकी(शिवणे), ता.सांगोला यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे.

## रिटेवाडी उपसा सिंचन योजना तत्काळ मार्गी लावा
### 'मकाई' चे संचालक सतीश नीळ यांची मागणी

**करमाळा, दि.४ नोव्हेंबर-**

करमाळा तालुक्याला वरदायिनी ठरणाऱ्या रिटेवाडी उपसा सिंचन योजनेला तात्काळ मार्गी लावण्यात यावे अशी मागणी श्री मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक सतीश निळ यांनी केली. येथे भारतीय जनता पक्षातर्फे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी ही मागणी केली. यावेळी महीला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी दिदी बागल व जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी यासंदर्भात आम्ही प्रयत्नशील असून लवकरच अशी बैठक लावण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे. यावेळी बोलताना नीळ म्हणाले की, आमच्या नेत्या रश्मी दिदी बागल यांनी ज्यावेळी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला त्यावेळी रिटेवाडी उपसा सिंचन योजना मार्गी लावण्याची एकमेव मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे केली होती. याची आठवण करून देऊन या योजने संदर्भात मंत्री स्तरावर तातडीने बैठक आयोजित करून ही योजना मार्गी लावण्यात यावी अशी मागणी या बैठकीत केली आहे. यावेळी करमाळा तालुक्यातील विविध भागातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## रड्डे परिसरातून १९ वर्षीय नवविवाहिता बेपत्ता

**मंगळवेढा दि.४ नोव्हेंबर-**

रड्डे परिसरातून एक १९ वर्षीय नवविवाहिता बेपत्ता झाली असल्याची तक्रार तिच्या पतीने पोलीसात केली असून पोलीस त्या बेपत्ता महिलेचा कसून शोध घेत आहेत. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, दि.१ रोजी रात्री ९ वाजता पती-पत्नी व मुले जेवणखाण करुन रात्री खोलीमध्ये झोपी गेले होते. मध्यरात्री १२ च्या सुमारास विवाहितेच्या पतीस जाग आली असता पतीला त्याची पत्नी झोपलेल्या ठिकाणी दिसून आली नाही, म्हणून तिचा घरा शेजारी व गावात नातेवाईकाकडे सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याने पोलीसात पतीने तक्रार दाखल केली आहे.

## आदर्श शिक्षक दोन महिन्यांपासून पुरस्कारांच्या प्रतिक्षेत

### जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाची उदासीनता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून ५ सप्टेंबर शिक्षकदिनी जिल्ह्यातील ४५ शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदा मात्र शिक्षण विभागाच्या उदासिनतेमुळे पुरस्कारांचे वितरणच झाले नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून ऑगस्ट महिन्यात पुरस्कारांसाठी शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले.

११ तालुक्यातून ४५ शिक्षकांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर केले. प्रस्तावांची उलट तपासणी करून अहवालही तयार करण्यात आला. पण प्रस्तावाची छाननी करून आदर्श शिक्षकांची निवड, वितरण सोहळ्यासाठी जिल्हा परिषदेला मुहूर्त मिळत नसल्याने विद्यार्थ्यांसह शिक्षकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षकांचा गौरव व सन्मान करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. पाच सप्टेंबरला राज्यशासन, विविध संस्था, संघटनांकडून पुरस्कार देऊन शिक्षकांचा गौरव केला जातो. शिक्षक दिनादिवशी शिक्षकांचा यथोचित सन्मान केल्यास घेतलेल्या कष्टाचे सार्थक होते. प्राथमिक शिक्षण विभागाने ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातील सर्व २७०० शाळांमधील शिक्षक, मुख्याध्यापकांकडून ३० ऑगस्टपर्यंत प्रस्ताव मागविले होते. तब्बल ४५ शिक्षकांनी प्रशासनाच्या निकष व अटींनुसार प्रस्ताव तयार करून शिक्षण विभागाकडे दाखल केले आहेत. त्यामधून प्रत्येक तालुक्यातून एक आदर्श शिक्षक, शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल उत्कृष्ट लागलेले प्रत्येक तालुक्यातील एक शिक्षक असे ११ तालुक्यातून एकूण २२ आदर्श शिक्षकांची निवड होईल. तसेच, कला व क्रीडा क्षेत्रामध्ये चांगले योगदान असणाऱ्या दोन शिक्षकांचा विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. शिक्षक दिनास दोन महिन्यांचा कालावधी लोटला असून पुरस्कारार्थींची निवड, वितरणाचा विसर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाला पडला आहे. शिक्षक दिनाच्या दिवशी अनंत चतुर्दशी, त्यानंतर रमजानची सुटी, त्यानंतर ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून पुरस्कार वितरणासाठी तारीख मिळायची आहे, अशी कारणं शिक्षण विभागातर्फे पुढे करण्यात येत आहेत. प्रत्यक्षात, पालकमंत्री गोरे सातत्याने जिल्हा परिषदेत कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पण, दप्तर दिरंगाईची सवय लागलेल्या प्राथमिक शिक्षण विभागास व शिक्षणाधिकारी यांना कर्मचाऱ्यांना गौरव करण्यासाठी वेळ नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> **लवकरच पुरस्कार वितरण**
> शिक्षक पुरस्कारांचे प्रस्ताव दाखल आहेत. पण मध्यंतरी अतिवृष्टी, महापुरामुळे अनेक शाळांचे मोठे नुकसान झाले होते. परिस्थिती आता पूर्वपदावर येत आहे. लवकरच पुरस्कार वितरण सोहळा करण्यात येईल.
> **- कादर शेख,**
> प्राथमिक शिक्षणाधिकारी,

## बिटरगाव येथे विचारवेध संमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.४ नोव्हेंबर-**

करमाळा येथील जिव्हाळा ग्रुपतर्फे स्व. विनायकराव पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त बिटरगाव (ता.करमाळा) येथील उजनी धरण काठावरील पाटील वस्तीत विचारवेध संमेलन घेण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक ॲड. बाबुराव हिरडे, डॉ. सुभाष सुराणा, प्रा . संजय चौधरी यांनी उपस्थितांना वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले.



यावेळी ॲड. हिरडे यांनी एकत्र कुटुंब पद्धती टिकवण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करत एकत्र कुटुंब पद्धतीचे फार मोठे फायदे असून प्रत्येकाला एकमेकांच्या मनभावनेचा विचार करावा लागतो. यामध्ये कुटुंबातील महिलांची भूमिका महत्त्वाची ठरत असते. त्यामुळे घराचं घर पण टिकवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. डॉ सुराणा यांनी लोकांमध्ये रक्तदाब, मधुमेह यासारख्या वाढत्या आजारामुळे प्रत्येकांनी आपली जीवनशैली बदलण्याची गरज व्यक्त करत दररोज चाळीस मिनिटे चालण्याचे आवाहन केले. प्रा. संजय चौधरी यांनी सुखी जीवनासाठी आपापसातील मतभेद विसरून एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. संदेश पाटील, श्रुती पाटील यांनी स्वागत केले. यावेळी कवी प्रकाश लावंड यांनी कविता, गजेंद्र पोळ यांनी चारोळ्या, वात्रटिका सादर केल्या. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अनिल माने यांनी अंधश्रद्धेचे प्रयोग सादर केले. प्राचार्य अभिमन्यू माने, प्रा. एन.डी. सुरवसे, राजेंद्र रणसिंग, श्रेणिक खाटेर, भारत रोकडे, डॉ. सोमनाथ खराडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला आदिनाथ साखर कारखान्याचे उपाध्यक्ष महेंद्र पाटील, संचालक ॲड. राहूल सावंत, हरिदास केवारी, लोकविकास डेअरीचे चेअरमन दीपक देशमुख, माजी संचालक भारत साळुंके, भूषण लुंकड, विलास लबडे, नानासाहेब साळुंके, गंगाधर पोळ, दिगंबर साळुंके, यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. अर्जुन तकिक यांनी सूत्रसंचालन केले. महेंद्र पाटील यांनी आभार मानले.

# पक्ष्यांच्या स्थलांतरात बदलः हवामान बदलामुळे परिणाम

५ ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षी सप्ताह साजरा केला जातो. राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने निसर्गातील प्रत्येकाचे महत्त्व विशद व्हावे, लोकजागृती व्हावी हा याम ागचा उद्देश्य आहे.

पक्षी सप्ताह निमित्ताने पक्ष्यांच्या दुनियेवर हवामान बदल अभ्यासणे देखील महत्त्वाचं आहे. हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या अधिवासांवर परिणाम होतो, त्यांच्या स्थलांतराच्या आणि प्रजननाच्या पद्धती बदलतात आणि अन्न स्रोतांवरही परिणाम होतो. तापमान वाढ, पूर आणि वाळवंटीकरणामुळे पक्ष्यांचे अधिवास नष्ट होत आहेत, ज्यामुळे त्यांना घरटे बांधण्यासाठी आणि चारा शोधण्यासाठी जागा कमी पडते. बदलत्या हवामानामुळे काही प्रजाती उच्च उंचीवर किंवा उत्तरेकडे स्थलांतर करत आहेत, तर काही नामशेष होण्याचा धोका पत्करत आहेत. प्रजातींचे वितरण बदलणे: हवामानाशी जुळवून घेण्यासाठी पक्षी जास्त उंचीवर किंवा उत्तरेकडे सरकत आहेत. भारतातील अनेक पक्षी प्रजातींच्या वितरणात आणि स्थलांतर पद्धतींमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. अस्तित्वावर धोका: नवीन परजीवी आणि भक्षक यांच्याकडून येणारे धोके, अन्नटंचाई आणि अधिवास नष्ट होणे यामुळे अनेक पक्ष्यांच्या प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शारीरिक बदल: काही पक्ष्यांच्या प्रजातींमध्ये शरीराच्या आकारातही बदल होत असल्याचे दिसून आले आहे. पक्ष्यांचे स्थलांतर हा एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये पक्षी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जातात. हा प्रवास अनेक कारणांमुळे केला जातो, जसे की हवामानातील बदल, अन्नाच्या स्रोतांचा शोध, प्रजननासाठी अनुकूल वातावरण, इत्यादी. परंतु, सध्या शास्त्रज्ञांनी निरीक्षण केले आहे की हवामान बदलामुळे या पक्ष्यांच्या स्थलांतरातील पॅटर्न आणि त्यांचे वर्तन मोठ्या प्रमाणावर बदलले आहेत. या बदलामुळे न केवळ पक्ष्यांच्या जीवनचक्रावर परिणाम होतो, तर पर्यावरणीय समतोलही प्रभावित होतो.

**हवामान बदल आणि पक्ष्यांचे स्थलांतर**

हवामान बदलामुळे पृथ्वीवरील अनेक जैविक प्रक्रियांवर परिणाम झाला आहे. तापमानाच्या वृद्धीसोबत काही पक्षी आपल्या पारंपारिक स्थलांतर मार्गांवर न जाता, नव्या मार्गांचा अवलंब करत आहेत. शास्त्रज्ञांनी यासंदर्भात अनेक तपासणी व अभ्यास केले असून, त्यांचा निष्कर्ष असा आहे की वाढते तापमान आणि बदललेली हवामान परिस्थिती पक्ष्यांच्या स्थलांतराच्या वेळा आणि गंतव्यस्थळांवर प्रभाव टाकत आहेत.

**पक्ष्यांचं स्थलांतर**

पक्ष्यांचे स्थलांतर साधारणपणे हिवाळ्याच्या वेळी थंड प्रदेशातून उष्ण प्रदेशात जात असतात, पण आता शास्त्रज्ञांनी पाहिलं आहे की काही पक्षी आपल्या पारंपारिक मार्गांवर न जाता वेगवेगळ्या गंतव्यस्थळांवर जात आहेत. याचा परिणाम म्हणजे, काही पक्ष्यांचे स्थलांतर आधीच्या मानक वेळेच्या तुलनेत लांबणीवर पडत आहे, तर काही पक्षी यावर्षी नवा मार्ग निवडत आहेत.

**शास्त्रज्ञांच्या निरीक्षणाचे महत्त्व**



यूरोपियन पक्षी संरक्षण संघटनाच्या (*European Birdlife Conservation Organization*) शास्त्रज्ञांनी या बदलावर सखोल संशोधन केले आहे. त्यांनी असे निदर्शनास आणले की, उष्ण प्रदेशांतील पक्ष्यांचे स्थलांतर उशिराने सुरू होणं किंवा शरद ऋतूच्या आधीच थांबणं सामान्य होऊ लागलं आहे. शास्त्रज्ञांच्या मते, तापमानाचा वाढलेला स्तर, हवामानातील असंतुलन, आणि वेळेपूर्वी होणारे हिवाळा अनुकूल वातावरण हे या बदलांसाठी कारणीभूत आहेत. आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे, काही पक्ष्यांनी अत्यंत उष्ण प्रदेशांची दिशा निवडली आहे, ज्यामुळे पर्यावरणीय बदलांची गती वाढत आहे. पक्ष्यांच्या स्थलांतरासाठी अवलंबले जाणारे पारंपरिक मार्ग आता सोडले जात आहेत आणि त्याच्यामुळे पर्यावरणातील जैवविविधता आणि स्थानिक परिसंस्था यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**तांत्रिक उपकरणांचा वापर आणि पक्षी निरीक्षण**

तंत्रज्ञानाच्या वापराने पक्ष्यांच्या स्थलांतरात होणाऱ्या बदलांना अधिक सुस्पष्टपणे समजून घेता येते. रेडिओ ट्रॅकिंग आणि सॅटेलाइट ट्रॅकिंगच्या साहाय्याने पक्ष्यांच्या हालचालींचे निरीक्षण करणे शक्य झाले आहे. या साधनांद्वारे शास्त्रज्ञांना पक्ष्यांच्या स्थलांतराचे सर्वसमावेशक आणि सुस्पष्ट डेटा प्राप्त होतो. यामुळे त्यांना हवामान बदलांच्या प्रभावाचा अभ्यास अधिक प्रभावीपणे करण्याची संधी मिळाली आहे. उदाहरणार्थ, यूरोपातील काही पक्ष्यांच्या स्थानिक रहिवाशांच्या वर्तनाचा अभ्यास करण्यात आलेल्या संशोधनातून असे समजले आहे की, पक्ष्यांच्या स्थलांतराच्या वेळांमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. तसंच, एका निश्चित ठिकाणी पोहोचण्याचे वेळापत्रकही बदलले आहे. या बदलांमुळे, त्या प्रदेशातील पारंपारिक पर्यावरणीय स्थितीवर आणि स्थानिक खाद्यसाखळीसुद्धा परिणाम होतो.

**पर्यावरणावर होणारे परिणाम**

पक्ष्यांच्या स्थलांतरातील बदल हे पर्यावरणीय संतुलनावर मोठा प्रभाव टाकतात. हे पक्षी विविध प्रजातींचे आहार घेतात, त्यामुळे त्यांच्या स्थलांतरात बदल होणे म्हणजे खाद्य साखळीतील महत्वाच्या घटकांवर परिणाम होणे होय. तसेच, काही पक्षी आपल्या पारंपारिक ठिकाणी पाणी शोधत असतात, मात्र आता ते ठिकाणे वाळवंट बनत आहेत, किंवा त्या भागात पाणी कमी होत आहे. हवामान बदलामुळे काही पक्ष्यांची संख्या कमी होऊ शकते, तर काही नवीन ठिकाणी स्थलांतर करून त्यांच्या प्रजाती वाढवू शकतात. यामुळे पर्यावरणाच्या समतोलावर आणि विविध प्रजातींच्या अस्तित्वावर ताण येतो. हवामान बदलाच्या प्रभावामुळे पक्ष्यांच्या स्थलांतरातील बदल एक गंभीर विषय ठरला आहे. या बदलांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तपासून, शास्त्रज्ञांनी इतर पर्यावरणीय बदलांची माहिती मिळविण्यास सुरुवात केली आहे. यामुळे पर्यावरण व जैवविविधतेच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना घेण्याची वेळ आली आहे. जर या बदलांचा वेळीच अभ्यास केला आणि योग्य पावले उचलली, तर पक्ष्यांच्या स्थलांतरासारख्या नैसर्गिक प्रक्रिया कायम ठेवता येतील आणि पर्यावरणीय संतुलन राखता येईल.

**- प्रा. रेश्मा माने, युगंधर फाऊंडेशन सोलापूर.**

> **तापमान वाढ आणि पूर यांसारख्या हवामान बदलांच्या परिणामांमुळे पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास बदलतात किंवा नष्ट होतात. स्थलांतरित पक्ष्यांसाठी किनारी पाणथळ प्रदेश हे याचे एक उदाहरण आहे. स्थलांतर आणि प्रजननाच्या पद्धतींमध्ये बदल: हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या स्थलांतराच्या वेळा आणि प्रजननाच्या ऋतूंमध्ये बदल होत आहेत. अनेक प्रजाती दर दशकात सरासरी ६.६ दिवस आधी अंडी घालत असल्याचे दिसून आले आहे. अन्नाच्या स्रोतांमध्ये घट: हवामानातील बदलांमुळे कीटक, बिया आणि मासे यांसारख्या अन्न स्रोतांवर परिणाम होतो, ज्यामुळे पक्ष्यांसमोर अन्नटंचाई निर्माण होते. महाराष्ट्रात अवेळी पाऊस आणि पूर परिस्थिती मुळे नियमित येणारे रोहित (फ्लेमिंगो) पक्षी आणि त्यासोबत येणारे इतर स्थलांतरित पक्षी यांचे उजनी धरण परिसर तसेच सोलापूर जिल्ह्यात आगमन लांबले.**

# ‘एक कॉल प्रॉब्लेम सॉल’ तुळजाई नगरील रोचकरी जुळ्या बांधवांची लोकप्रियता वाढतेय!

## रामचंद्र आबा अन् निलेश भैय्याच्या जनहित कामांमुळे नागरिकांतून समाधान व्यक्त

सोलापूर तरुण भारत विशेष...

**तभा वृत्तसेवा । अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

तीर्थक्षेत्र तुळजाई नगरीतील रोचकरी जुळे बंधू रामचंद्र आबा अन निलेश भैय्या रोचकरी मागील ८ वर्षांपासून शहरातील सर्वात मोठ्या प्रभागात पायाला भिंगरी लागल्यागत नागरिकांना हाकेला तात्काळ धावून जात निर्माण समस्यांवर उपाययोजना करत असलेल्या कामांमुळे लोकप्रियतेत वाढ होत आहे.

नागरिकांचा एकच कॉल प्रॉब्लेम सॉल असा काही फंडा रूढ झालेला दिसून येतो आहे. प्रभाग ११ हा वाढीव लोकवस्ती असणारा अन शहरातील सर्वात मोठा वार्ड म्हणून पाहिले जाते. इथे शहर मतदार जरी कमी प्रमाणात असले तरी नौकरदार आणि तुळजापूर तीर्थक्षेत्र नगरीत हक्काच घर असावं हा अध्यात्मिक विचार घेऊन निवाशी वर्ग खुप मोठ्या प्रमाणात आहे.

शहर म्हंटल की समस्या तर असणारच रामचंद्र रोचकरी आणि निलेश रोचकरी या जुळ्या बांधवांनी बस स्थानकाच्या शेजारील आणि प्रभाग ११ ची प्रवेशद्वार समजले जाणारी गोलाई येथील एका सर्व सामान्य (गवळी) हॉटेल हेच आपले खुले संपर्क कार्यालय बनवल्याचे दिसून येते. शहरात सहज उपलब्ध होणे आणि येणाऱ्या सर्व नागरिकांसह मित्र परिवारास प्रथम प्रेम ाचा गोड चहा देत समस्या ऐकून घेतात अन लागलीच स्वतः उपस्थित राहून तात्काळ कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

अबाल वृद्ध असो की तरुण युवक वर्ग किंवा महिला भगिनी कुणाचा कॉल येवो किंवा भेटून वार्डातील समस्या समोर आली की सामाजिक सेवाभावाची जपणूक करत जनहिताच्या कामांमुळे रोचकरी बंधुच्या लोकप्रियतेत वाढ होते आहे. नळदुर्ग रोड हद्दवाड भागातील कच्च्या रस्त्यावर स्वखर्चाने मुरम टाकून रोलर दबाई केली गेली असून मागील पाच वर्षांपासून लाईट डीपी व्यवस्था बाबत सातत्याने पाठपुरावा करून सर्व पथदिवे स्वखर्चित सेवा देण्यात येत आहे. गरजू पेशन्टला हॉस्पिटल क्षेत्रात मदतीसाठी धावून जात असतात, दुष्काळ सदृश्यकाळात तीन महिने अखंडीत पाणी वितरण सेवा पुरवली.



कोरोना काळात लसीकरण मोहिमत सक्रिय सहभाग दिला. मकर संक्रांतीनिमित्त हळदी कुंकू कार्यक्रम १००० महिलांसाठी ७ वर्षा पासुन कार्यक्रमाचे आयोजित केले जातात, तसेच होम मिनिस्टरचा मनोरंजनात्मक उपक्रम ही घेण्यात आले. शहरातील अबाल वृद्धाशी प्रेमाचा संवाद साधल्याने विविध सामाजिक समस्या समोर येत गेल्या अन त्यावर उपाययोजना करण्याची ताकत मिळाली. त्या पूर्ण करण्यासाठी ताकतीने प्रयत्न सोडवल्या जातात, वृद्ध नागरिकांसाठी बाक (बैठक व्यवस्था) उपलब्ध करून दिले असून प्रति वर्षी गुणवंत विद्यार्थी सत्कार करण्यात येतो. आपला प्रभाग व्यसन असावा यासाठी युवकांचे समुपदेशनही केले जात आहे.

तुळजापूर शहरात गोलाई ग्रुप परिचित नाही अशी एकही व्यक्ती नाही. मागील १३ वर्षांपासून हा ग्रुप वर्गणीमुक्त सार्वजनिक शिवजयंती, गणेशोत्सव, साजरा करत असतात.

शहरातील सर्व बांधवांचे वाढदिवस उत्साहात करतात. मुस्लिम बांधवाना दिवाळी फराळ वाटप असो शहरातील सर्व सार्वजनिक उपक्रमात सक्रिय सहभागी आणि अर्थिक योगदान कायम स्वरूपी देत राहतात.

गोलाई ग्रुप, आईसाहेब ग्रुप, एसटी कॉलनी ग्रुपच्या माध्यमातून जनसेवा करण्यासाठी बळ मिळाले.



यासर्व सेवा कार्यात बंधू निलेश यांचे महत्वपूर्ण साथ, सोबत, भक्कम आधार, पाठबळ पूर्ण ताकतीने मागे उभा राहत ऊर्जा देत राहतो. मी काम करतो पण जनसेवक म्हणजे निलेश खऱ्या अर्थाने सामोरे, मित्र परिवार व नातलग यांची मार्गदर्शनासह खंबीर साथ लाभते म्हणून सेवा कार्यासाठी बळ मिळते.

**- रामचंद्र (आबा) रोचकरी**



आम्ही जेव्हा जनहिताने काम करतो आणि ज्यावेळी अशक्य बाबी समोर येतात त्यावेळी विकासरत्न आमदार राणाजगजितसिंह पाटील, सुनील मालक चव्हाण, युवा नेते विनोद पिटू गंगणे, विशाल भैय्या रोचकरी, सचिन भैय्या रोचकरी, अमर दाजी हंगरगेकर यांची साथ आणि मार्गदर्शन लाभते किंवा मिळते.

**- निलेश (भैय्या) रोचकरी**

---

महात्मा फुले योजना

# गंभीर आजारांसाठी मिळणार १० लाख

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

◆ **मुंबई, ४ नोव्हेंबर**

महात्मा फुले जनआरोग्य योजनेत विविध प्रकारच्या २४०० आजारांसाठी मान्यता देण्याचा तसेच २३९९ आजारांसाठी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि जास्त उपचार खर्च येणाऱ्या काही गंभीर आजारांसाठी १० लाख रुपये देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसोबत चर्चा करताना दिली.

शीख धर्माचे नववे गुरू आणि हिंद-की-चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समागम वर्षानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या भव्य राज्यस्तरीय महोत्सवासाठी ९५ कोटी ३५ लाख ६४ हजार रुपये उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. श्री गुरू तेग बहादूर यांनी १७ व्या शतकात धर्मरक्षा, मानवी हक्क आणि अन्यायाविरुद्ध निर्भीड आवाज उठवून बलिदान दिले. त्यांच्या या कार्याला अभिवादन म्हणून राज्यभरात नांदेड, नागपूर आणि खारघर या तीन प्रमुख केंद्रांतर्गत विविध जिल्ह्यांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

**वर्धेतील भूखंड मालकी हक्काने देण्यास मंजुरी**

वर्धा नगरपरिषदेच्या मालकीचे रामनगरमधील भाडेपट्ट्याने दिलेले भूखंड कायमस्वरूपी मालकी हक्काने (फ्री होल्ड) करून देण्यास मान्यता देण्यात आली.

वर्धा नगरपरिषदेच्या हद्दीतील नगरपरिषदेच्या मालकीचे भूखंड सुमारे १०५६ नागरिकांना १९३१ मध्ये ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात



आले होते. या भाडेपट्ट्यांना दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली.

**वाशीममधील वाईगौळ ग्रामपंचायतीला विनामूल्य जमीन**

वाशीम जिल्ह्यातील वाईगौळ ग्रामपंचायतीस भक्त निवास आणि यात्रेकरूंसाठी सोयी सुविधा उभारण्यासाठी १.५२ हे. आर. जमीन ग्रामविकास विभागामार्फत विनामूल्य उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**मूल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन उभारणार**

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या संस्थेमुळे स्थानिक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहे. या तंत्रनिकेतनसाठी टप्प्याटप्प्याने ३९ शिक्षक आणि ४२ शिक्षकेतर पदे मंजूर करण्यात आली.

**राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी बंद करण्याचा निर्णय**

केंद्र शासनाच्या नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीच्या धर्तीवर महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेली राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी बंद करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. रिझर्व्ह बँकेने राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनीस परवाना नाकारला आहे. त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या कंपनीचे कामकाज करणे अशक्य होणार आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

---



# डॉ. संपदा मुंडे आत्महत्येची उच्चस्तरीय चौकशी करा

**उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर..**

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. संपदा मुंडे यांच्या संशयास्पद आत्महत्येची उच्चस्तरीय चौकशी करून आरोपींवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन शिवसेना उबाठाकडून पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना देण्यात आले.

पोलीस निरीक्षकाकडून लैंगिक अत्याचार, मानसिक व शारीरिक छळ, तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष व राजकीय हस्तक्षेपाद्वारे आरोपींना संरक्षण यामुळे डॉ. मुंडे यांच्या आत्महत्येविषयी संशय व्यक्त करण्यात येत आहे.

याउलट पिडीतेला न्याय मिळण्या ऐवजी तिच्याच चरित्रहननाचे प्रयत्न केले जात आहे. म्हणून स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी यंत्रणेद्वारे सखोल तपास करून आरोपी अधिकाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अजय दासरी, महिला जिल्हा संघाटिका अमिता जगदाळे, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, भारती मुनोली, शशिकांत बिराजदार, रवींद्र नागणकेरी, रवी म्हेत्रे, रामसिंग धनिवाले, अशोक बोकेवाले, सुरेश शिंदे, नाना मोरे, मीनाक्षी जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

---

पान १ वरुन

# नगरपरिषदा-नगरपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजला

*(पान १ वरून)* ▸

महिला अशा ८ नगरपालिका व नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी महिला विराजमान होणार आहेत.

**गोंदिया** : जिल्ह्यात गोंदिया व तिरोडा नगर परिषद तसेच सालेकसा व गोरेगाव नगर पंचायतचा समावेश आहे. नगर परिषद व नगर पंचायतचे नगराध्यक्षपद हे थेट जनतेतून निवडले जाणार आहे.

**यवतमाळ** : जिल्ह्यातील १० नगरपालिका तर एक नगरपंचायत निवडणूक पार पडणार आहे. ढाणकी नगरपंचायत तर उमरखेड, यवतमाळ, दिग्रस, दारव्हा, पुसद, नेर, वणी, घाटंजी, आर्णी, पांढरकवडा या नगरपालिकेचा समावेश आहे.

**अमरावती** : जिल्ह्यात १० नगरपरिषदा व २ नगरपंचायतच्या निवडणुका होणार आहे. अन्य दोन नगरपंचायतच्या निवडणुका अडीच वर्षांपूर्वी झाल्या. २ डिसेंबरला अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, चिखलदरा, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, मोर्शी, शेंदूरजनाघाट, वरुड या नगरपरिषदांची व धारणी आणि नांदगाव खंडेश्वर येथील नगरपंचायतची निवडणुक होणार आहे.

**गडचिरोली** : जिल्ह्यातील गडचिरोली, आरमोरी आणि देसाईगंज येथे निवडणुका होणार आहेत. विशेष म्हणजे, यावेळी तिन्ही ठिकाणी नगराध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित असल्याने या निवडणुकीत ‘महिलाराज’ पाहायला मिळणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

---

# गीता नगर येथे कॉंक्रीट रस्त्याचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ नोव्हेंबर-**

शहराच्या हद्दवाढ भागातील प्रभाग क्रमांक २६ मधील गीता नगर येथे अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली विकासकामे अखेर पूर्णत्वास गेली आहेत. पाण्याची पाईपलाईन, अंतर्गत रस्ते ड्रेनेज लाईन नसल्यामुळे नागरिकांना असंख्य त्रासाला सामोरे जावे लागत होते. मात्र येथील माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोस्थान योजनेतून अंतर्गत ड्रेनेज लाईन करण्यासाठी सोलापूर महापालिका आयुक्त यांना निवेदन दिले होते. त्याची दखल घेऊन आयुक्त डॉ.सचिन ओंबसे यांनी ड्रेनेज लाईन कामकाजासाठी निधी उपलब्ध करून दिला.



त्यानंतर येथील बाधित नगरात सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचे उद्घाटन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. दरम्यान प्रभागाच्या माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी शासन दरबारी व सोलापूर महापालिका येथे पाठपुरावा करून प्रथम पिण्यासाठी पाण्याची पाईपलाईन त्यानंतर ड्रेनेज लाईनचे काम झाले. आता सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम प्रत्यक्ष चालू केलेले आहे. त्यामुळे समस्यांचे निराकरण झाल्याचे मनोगत येथील नागरिकांनी व्यक्त केले. यावेळी संग्रामसिंह चव्हाण, दिगंबर पुकाळे, जगन्नाथ काळे, प्रशांत काळे, मीरा म ोकाशी, पार्वती गायकवाड, प्रभा क्षीरसागर, शोभा सोलापुरे, सरस्वती काळे, तसेच भाजपाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण, ठेकेदार प्रसन्न जाधव, आदी उपस्थित होते.

---




---

# वाचलेली ऐकलेली माणसे गेली कुठे...

## गझल महोत्सवात गझलनवाज भीमराव पांचाळे यांनी सजवली शब्द सुरांची भावयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ नोव्हेंबर-**

वाचलेली ऐकलेली माणसे गेली कुठे, पुस्तकातून भेटलेली माणसे गेली कुठे अशी गझल सादर करून गझलनवाज भीमराव पांचाळे यांनी हुतात्मा स्मृती मंदिरच्या रंग मंचावर शब्द सुरांची भावयात्रा सजवली. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित तीन दिवशीय गझल महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गझल नवाज भीमराव पांचाळे आणि त्यांची कन्या डॉ. भाग्यश्री पांचाळे- गायकवाड यांनी गझल सादर करून रसिक श्रोत्यांची वाहवा मिळवली.

हे का कुणी फुलांना सांगायला हवे, स्वच्छंद वादळात कागदाची नाव आहे. ही गझल भीमराव पांचाळ यांनी तर आसवांचे जरी हसे झाले ही गझल सादर करून डॉ. भाग्यश्री पांचाळे यांनी रसिक श्रोत्यांची चांगलीच दाद



मिळवली. गानसम्राज्ञी लतादीदी यांच्या नावाचा पुरस्कार नुकताच गझलनवाज भीमराव पांचाळे यांना मिळाला आहे तसेच त्यांची कन्या डॉ. भाग्यश्री पांचाळे यांनी लहानपणापासूनच गझल आणि गायनाचा सराव करीत चार म हान गायकांवर त्यांनी पीएचडी मिळवली. या दोन्ही पिता पुत्रीकडून सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरच्या रंगमंचावर गझल मैफल चांगलीच रंगवली त्यांना तबलावर साथ संगत केली होती गिरीश पाठक तर हार्मोनियम ओंकार सोनवणे, संतूर प्रशांत अग्निहोत्री यांनी वादन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत नेटके आणि हलके फुलके वातावरण करीत निवेदन केले होते किशोर बळी यांनी. ही शब्द सुरांची भावयात्रा सादर होत असताना त्याला रसिकांनी मोठी दाद दिली.

मध्यांतरानंतर सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्या हस्ते सर्व कलावंताचे स्वागत आणि सत्कार करण्यात आले.यावेळी सांस्कृतिक विभागाच्या अधिक्षक जानव्ही जानकर, समन्वयक अमोल धाबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. म हाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि संचालक विभिषण चवरे यांच्या प्रयत्नातून हा तीन दिवशीय गझल महोत्सव सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरात सुरू झाला. रसिक श्रोत्यांनी या आजच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाला चांगलीच गर्दी केली होती.

**आज कवी जोशी व गायक रानडे यांचा कार्यक्रम**

बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी सोबतीचा करार या कार्यक्रमात कवी वैभव जोशी, गायक दत्तप्रसाद रानडे यांचा कार्यक्रम होऊन समारोप होणार आहे.

CMYK
धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बसस्थानकात पर्स चोरी, ८४ हजारांचा ऐवज लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

फिर्यादी शामल लक्ष्मण खैरे (वय ४०, रा. हिंगळजवाडी, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२७ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारास १०.३० वा. धाराशिव बसस्थानक येथे धाराशिव-बार्शी बसमध्ये



चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील बटव्यातील २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ९,००० रुपये असा एकूण ८४,००० रुपयांचा ऐवज चोरीला नेला.

या प्रकरणी फिर्यादीने दि.३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या 'अंकुर' दिवाळी अंकाचे प्रकाशन

धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या अंकुर या दिवाळी अंकातील बालसाहित्य विशेषांकाचे प्रकाशन सन्माननीय तहसीलदार मृणाल जाधव यांच्या हस्ते मुक्तांगण शाळेच्या प्रांगणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. कमल नलावडे होत्या. जाधव मॅडमनी साहित्य, वाचन व सकारात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करत आत्मोन्नतीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. मंडळाच्या सामाजिक उपक्रमांचे तसेच साहित्यिक कार्याचे त्यांनी कौतुक करून आगामी अंकासाठी अर्थसहाय्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक अध्यक्षा डॉ. सुलभा देशमुख यांनी केले. कार्यक्रमात ज्योती कावरे, जना फासे, सारिका देशमुख आणि सविता गुंड यांच्या साहित्यकृतींचे प्रकाशन होऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सुनीता गुंजाळ यांनी केले तर आभार प्रा. वैशाली बोबडे यांनी मानले.

### अमन शेख यांची वंचित बहुजन आघाडी कळंब शहराध्यक्षपदी निवड

कळंब, दि.४ नोव्हेंबर -

येथील सामान्य कुटुंबातील, प्रामाणिक व समाजाभिमुख कार्यासाठी ओळख असलेले अमन (अमान भाई)



शेख यांची कळंब वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर बोलताना त्यांनी म्हटले की, येणाऱ्या काळात पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आणि समाजाच्या प्रश्नांवर ठोस पातळीवर काम करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. वंचित समाजाला नवी दिशा देणे हेच आमचे उद्दिष्ट असेल. त्यांच्या या निवडीबद्दल मित्रपरिवार, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला आहे.

### नगराध्यक्ष पदासाठी सुनिल उकंडे यांची भाजपकडे उमेदवारीची मागणी

नळदुर्ग, दि.४ नोव्हेंबर -

नळदुर्ग नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून उमेदवारी दिल्यास निवडणूक पूर्ण ताकदीने लढवून नगरपालिकेवर



भाजपचा झेंडा फडकविण्याचा निर्धार सामाजिक कार्यकर्ते व भोई समाजाचे शहराध्यक्ष सुनिल उकंडे यांनी व्यक्त केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, शहराचा सर्वांगीण विकास हा माझा एकमेव हेतू असून राजकारणातून पैसे कमविण्यासाठी नव्हे तर विकासासाठी मी निवडणूक लढविणार आहे. गेल्या ३७ वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले आणि १५ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या उकंडे यांनी नगरपालिकेत भ्रष्टाचारमुक्त, स्वच्छ व पारदर्शक प्रशासन उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. सध्या आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरात सुरू असलेला विकास पुढे नेण्यासाठीच आपली उमेदवारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### गोळाफेक स्पर्धेत दीक्षा बोनेचे घवघवीत यश

अणदूर, दि.४ नोव्हेंबर -

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित श्री बाळेश्वर विद्यालय, बारुळ येथील विद्यार्थिनी दीक्षा शिवमूर्ती बोने



हिने विभागीय स्तरावरील गोळाफेक स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर दीक्षा हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दीक्षाच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र (दादा) आलुरे, मार्गदर्शक प्रा. भालचंद्र बिराजदार, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. लक्ष्मीकांत पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक मंगेश अणदुरकर, तसेच विद्यार्थिनीचे वडील शिवमूर्ती बोने यांनी अभिनंदन केले. दीक्षाला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक विठ्ठल नाईक यांच्या कार्याचेही विशेष कौतुक करण्यात आले असून, विद्यालय परिवाराकडून तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### अतिवृष्टीत नुकसानग्रस्त वीजवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी द्यावा

धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे वीज वाहिन्या, रोहित्र आणि पोलचे मोठे नुकसान झाले असून, दुरुस्तीकरिता विशेष निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी भारतीय किसान संघ, धाराशिव यांनी ऊर्जाराज्यमंत्री मेघनाताई बोर्डिकर यांच्याकडे केली. जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी मंत्र्यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. या निवेदनात जळालेल्या डीपी, वाहून गेलेल्या वीजतारा, रोहित्रातील तेल भरणे तसेच RDSS योजनेत नवीन कामांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

# धाराशिव जिल्ह्यात हजार उद्योजक घडवण्याचे स्वप्न : आ. सुभाष देशमुख

## लोकमंगल बँक व मल्टीस्टेटतर्फे कर्ज मेळावा व दिवाळी स्नेहफराळ कार्यक्रम...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -

शासनाच्या अनेक लाभदायक योजना उपलब्ध आहेत. नोकरी मिळेलच याची वाट पाहण्यापेक्षा उद्योजक बनून स्वतःचा व्यवसाय सुरू करा. धाराशिव जिल्ह्यातून किमान एक हजार उद्योजक घडवण्याचे माझे स्वप्न आहे, त्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे प्रतिपादन लोकमंगलचे संस्थापक अध्यक्ष व आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

लोकमंगल बँक आणि लोकमंगल मल्टीस्टेट यांच्या वतीने





धाराशिव येथे कर्ज विषयक मेळावा व दिवाळी स्नेहफराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले, केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजना उपलब्ध आहेत. सावकाराच्या जाळ्यात अडकण्याऐवजी या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक सक्षम व्हा. स्वतःबरोबर आपले गाव आणि जिल्हाही आर्थिकदृष्ट्या सक्षम करा. रोहन देशमुख म्हणाले, प्रत्येक कार्यकर्त्याने किमान पाच उद्योजक तयार केले, तर धाराशिव जिल्हा 'उद्योजकांचा जिल्हा' म्हणून ओळखला जाईल.

यावेळी सुभाष देशमुख यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, आपण सोलापूरात गेलो असलो तरी उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्याशी आपली नाळ तुटलेली नाही.

या कार्यक्रमात विविध महामंडळांकडून पाच कोटी रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास चेअरमन पंडित लोमटे, बालाजी शिंदे, सचिन आडगळे, राजेंद्र पाटील, अजय ढोणे, पांडुरंग डोलारे, तसेच लोकमंगल मल्टीस्टेटचे सीईओ सचिन जाधव, रामदास कोळगे, विक्रम (मालक) देशमुख, संतोष बोबडे, ॲड. दीपक आलूरे, सचिन पाटील सभापती, सज्जन साळुंखे, प्रभाकर मुळे, आनंद कंदले यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व लोकमंगल मल्टीस्टेटचे सल्लागार, कर्जदार, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यातील ८ नगरपालिका, २ नगर पंचायतींचे अखेर बिगुल वाजले

### २ डिसेंबरला मतदान ३ तारखेला मतमोजणी...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या असून धाराशिव जिल्ह्यातील ८ नगरपालिका आणि २ नगर पंचायतींमध्ये होणार निवडणुका पार पडणार आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर,परंडा, कळंब,भूम, उमरगा, मुरूम आणि नळदुर्ग या आठ नगरपालिकासह लोहारा आणि वाशी दोन नगर पंचायतींमध्ये या निवडणुका पार पडणार आहेत. महाराष्ट्र राज्यभरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार नामांकन अर्ज १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत दाखल करता येतील. अर्जाची छाननी१८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर तर मतमोजणी ३ डिसेंबर होणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार





परिषदेत सांगितले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील सर्व नगरपालिका नगरपंचायत क्षेत्रातील आजी-माजी नगरसेवक तसेच भावी नगरसेवकांची भाऊ गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून येत असून सर्वच शहरातील वातावरण नगरपालिकांसाठी तयार झालेले दिसून येते आहे.

दीपावलीमध्ये मोठ्या प्रमाणात दिवाळी फराळ यासह विविध सांस्कृतिक उपक्रम राबवत अनेक इच्छुकांनी निवडणूक लढण्याची आपापली इच्छा व्यक्त केली आहे.

## शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळालाच पाहिजे : पालकमंत्री सरनाईक

### पवनचक्की उभारणीतील 'मध्यस्थ दलाल' सुळसुळाट थांबवण्याचे जिल्हा प्रशासनाला आदेश...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की उद्योगाचा वेगाने विस्तार होत असून, या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना त्यांना योग्य मोबदला मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र, कंपनी आणि शेतकरी यांच्यामध्ये 'मध्यस्थ' या नावाखाली दलालांचा वाढलेला सुळसुळाट तात्काळ बंद करावा, असे स्पष्ट आदेश परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.



मंत्रालयातील आपल्या दालनातून आयोजित ऑनलाईन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, संबंधित विभागांचे अधिकारी, पवनचक्की कंपन्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते. पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, पवनचक्की उभारणीसाठी शेतकऱ्यांची जमीन घेताना संबंधित कंपनीकडून त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. यासाठी प्रशासनानेच मध्यस्थाची भूमिका बजावावी. दलालांकडून गुंडगिरी, धमक्या आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी मिळाल्या असून, पोलिसांनी तक्रारीची वाट न पाहता 'सुओ मोटू' गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच, शेतकऱ्यांचे हित जपत जिल्ह्यातील पवनचक्की उद्योगाला आवश्यक सहकार्य प्रशासनाने करावे, असेही त्यांनी सांगितले. या उद्योगातून धाराशिव जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधता येईल. मात्र, त्यात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे गरजेचे आहे, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## ॲड. आशिष शेलार यांचे श्री तुळजाभवानी देवी दर्शन

### तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांची केली पाहणी

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -

राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज तुळजापूर येथे आगमन करून श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली.



यावेळी तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चना पाटील, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, सहायक संचालक जया वहाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश देशमुख, पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## वरुड्यात १.११ लाखांचा अवैध दारू साठा जप्त

धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

वरुडा येथे पोलिसांनी कारवाई करून १ लाख ११ हजार ६१० रुपयांचा अवैध दारू साठा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अलंकार रोहीदास (वय ४०) व मकबुल आब्बु मुलानी (वय ५५, रा. तेर) यांनी दि.३ नोव्हेंबर रोजी सायं. ७.४५ वा. वरुडा ते तेर रस्त्यालगत जिल्हा परिषद शाळेजवळ अल्टो कारमधून देशी-विदेशी दारूचा एकूण १.११ लाख रुपये किंमतीचा १३० बाटल्यांचा साठा विक्रीसाठी ठेवला होता.

## उमरगा व धाराशिव तालुक्यात दोन बालविवाह रोखण्यात चाईल्ड हेल्पलाईन टीमचे यश

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -

जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध मोहिमेअंतर्गत चाईल्ड हेल्पलाईन (CHILD HELPLINE १०९८) टीमने तत्परतेने कार्यवाही करत उमरगा तालुक्यातील एकुरगा आणि धाराशिव तालुक्यातील जहागीरदार वाडी येथे होणारे दोन बालविवाह रोखण्यात यश मिळवले.



एकुरगा येथील १७ वर्षीय व जहागीरदार वाडी येथील १६ वर्षीय अल्पवयीन बालिकांचे विवाह होणार असल्याची माहिती हेल्पलाईनला मिळाल्यानंतर तातडीने दोन्ही ठिकाणी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली. तपासणीत दोन्ही बालिकांचे वय विवाहासाठी अपुरे असल्याचे स्पष्ट झाले.

सदर कारवाई किशोर गोरे, प्रभारी महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, अमोल कोवे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी आणि विकास चव्हाण, जिल्हा प्रकल्प समन्वयक (CHL) यांच्या आदेशानुसार पार पडली. या मोहिमेत अशोक चव्हाण, अभयसिंह काळे, पल्लवी पाटील, अमर भोसले तसेच ग्रामसेवक दयानंद कोळी (एकुरगा), ए.बी. माने (जहागीरदार वाडी) आणि दोन्ही गावांतील ग्राम बाल संरक्षण समित्यांचे सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## सरमकुंडीत युवकाकडे विनापरवाना तलवार

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.४ नोव्हेंबर -

सरमकुंडी (ता. वाशी, जि. धाराशिव) येथील दशरथ लाला काळे (वय २५) हा युवक आपल्या राहत्या घरात पितळी मुठ असलेली अंदाजे १,५०० रुपये किंमतीची तलवार विनापरवाना व बेकायदेशीर रित्या जवळ बाळगून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दि.३ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे १.५० वाजता पोलिस पथकाने ठिकाणी धाड टाकून संबंधित तलवार जप्त केली.

## शेतकरी कन्या पल्लवी डाकवाले यांची सहाय्यक राज्यकर आयुक्त पदावर निवड

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.४ नोव्हेंबर -

मोठे स्वप्न पाहण्याची जिद्द आणि त्यासाठी मेहनतीची तयारी असेल, तर यश नक्की मिळते, हे सिद्ध केले आहे परंडा तालुक्यातील आवार पिंपरी येथील आल्पभूधारक शेतकरी दांपत्याच्या कन्या पल्लवी डाकवाले-मारकड यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएससी परीक्षेच्या निकालात पल्लवी डाकवाले / मारकड यांची सहाय्यक राज्यकर आयुक्त (ssistant Commissioner of State Tax), वर्ग-१ अधिकारी म्हणून निवड झाली आहे. पल्लवी यांच्या



घरची परिस्थिती साधी असून, आई-वडिलांनी शेतात काबाडकष्ट करून त्यांना शिक्षण दिले.

जिद्द, चिकाटी, अभ्यासात सातत्य आणि पती गणेश मारकड (State Tax Inspector) यांचा पाठिंबा या बळावर त्यांनी यशाची शिखरकेली आहेत.

## उमरगा-लोहारा तालुक्यातील ४५ हजार शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदान रखडले

### सात नोव्हेंबरला लोहारा तहसीलसमोर धरणे आंदोलन...
### शेतकरी नेते अनिल जगताप यांची घोषणा...



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.४ नोव्हेंबर -

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीनंतर शासनाने उमरगा व लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत म्हणून मोठ्या प्रमाणात अनुदान जाहीर केले होते. मात्र तीन महिन्यांनंतरही सुमारे ४५ हजार शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले असल्याने, येत्या सात नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिली.

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीनंतर दुसऱ्या टप्प्यात उमरगा-लोहारा तालुक्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. विविध आंदोलने आणि पाठपुराव्यानंतर राज्य शासनाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय (जीआर) काढून या दोन्ही तालुक्यांसाठी एकूण ८६ कोटी ४६ लाख ३४ हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. त्यापैकी उमरगा तालुक्यातील ४९,२२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख रुपये, तर लोहारा तालुक्यातील ३०,६५२ शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख रुपये मंजूर करण्यात आले. परंतु शासन निर्णयाला तीन महिने उलटूनही अद्यापपर्यंत उमरगा व लोहारा तालुक्यातील ४४ हजार शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत. आत्तापर्यंत उमरगा तालुक्यातील २०,७४३ शेतकऱ्यांना २२ कोटी ५० लाख रुपये, तर लोहारा तालुक्यातील १६,२२७ शेतकऱ्यांना १८ कोटी ४९ लाख रुपये वाटप झाले आहे.

शेतकरी नेते जगताप यांनी सांगितले की, शासन व प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान वितरित झालेले नाही. त्यामुळे आम्ही ७ नोव्हेंबर रोजी लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार आहोत.

या संदर्भात उपविभागीय अधिकारी उमरगा, तहसीलदार लोहारा आणि पोलिस ठाणे लोहारा यांना निवेदन देण्यात आले आहे. तसेच १ ऑक्टोबरपासून राज्य शासनाने ई-केवायसी पोर्टल बंद केल्याने शेतकऱ्यांमध्ये गोंधळ व अस्वस्थता निर्माण झाली आहे. शासनाकडून याबाबत कोणतीही स्पष्टता न दिल्याने आंदोलनाची वेळ आली असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

अनुदानापासून वंचित असलेल्या उमरगा आणि लोहारा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# आरळी सर्कल हे माझे कुटुंब

## खा. डॉ .अजित गोपछडे यांची भावनिक साद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ नोव्हेंबर-**

तालुक्यातील आरळी सर्कल हे माझे कुटुंब आहे आणि माझ्या कुटुंबाचा सर्वांगीण विकास करणे ही माझी जबाबदारी आहे. त्यामुळे आगामी काळात आरळी सर्कलमधील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न असतील अशी ग्वाही देत खा. डॉ अजित गोपछडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या तब्बल ३७ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे काल सामान्य नागरिकांचे हस्ते भूमिपूजन करण्यात आले .याचवेळी कुंभारगाव येथे पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. खा. डॉ. अजित गोपछडे यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला आहे. या भूमिपूजन आणि नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.



यावेळी खा. डॉ अजित गोपछडे यांच्यासह , राजेश देशमुख कुंटुरकर, उमाकांत पाटील गोपछडे, गणेशराव पाटील शिंपाळकर, अरविंद ठक्करवाड,हावगीराव गोपछडे, डॉ.हणमंतराव लखमपुरे, शिवराज बोधने,मारोती राहिरे,धोंडू सावकार, डॉ.कहाळेकर,विजय कुंचनवार, दिनेश दाचावार, हाजप्पा पाटील, वैभव खांडेकर, राजकुमार गादगे,राजेंद्र रेड्डी, हणमंतराव खरबाळे, शिवलिंग पाटील धावंडे, शिवाजी पांडागळे,संभाजी शेळके, आदित्य पाटील चोंडीकर,बालाजी कदम,अभिजीत धरमुरे, संदीप रामपुरे, राजेश खरबाळे, देविदास खेडे, रुपेश पाटील भोकसखेडकर,दत्तराम पिल्लेवाड,बाबू पाटील तोरणा,लक्ष्मण पाटील कोळगाव, साईनाथ पाटील कोळगाव,राजु शिळेकर, अशोक पाटील भाले, दत्ताहरी नरवाडे,भाऊ पाटील कोळगाव,अविनाश स्वामी, लालबा दुमटकर,साहेबराव कांबळे, साहेबराव जिंके, यांच्यासह गावातील सर्व प्रमुख मंडळी गावकरी व आरळी भागातील व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते,या कार्यक्रमाचे आयोजन व्यंकट शंकरराव पाटील नरवाडे यांनी केले होते,तर सुत्रसंचलन भाऊसाहेब बनबरे यांनी केले.

पुढे बोलताना खा. डॉ. अजित गोपछडे म्हणाले की , पंतप्रधान नरेंद्र मोदी , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देशात आणि राज्यात विकासाची गंगा सुरू आहे . प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार काम करत आहेत मी अगदी सामान्य शेतकरी कुटुंबातला सर्वसामान्य कार्यकर्ता असतानाही केवळ तुमच्या पाठबळावर मला खासदारकी मिळाली आहे. त्यामुळे मिळालेल्या खासदारकीचा माझ्या भागातील प्रत्येक नागरिकाला लाभ झाला पाहिजे यासाठी माझा सततचा प्रयत्न आहे. जात धर्माच्या पलीकडे जाऊन आपल्या भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी माझा प्रयत्न आहे . आरळी सर्कल मध्ये दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे यासाठी या भागात एक महाविद्यालय सुरू करण्याचाही आपला मानस आहे. शिक्षण ,पाणी ,आरोग्य , रस्ते , रोजगार या बाबींची पूर्तता करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असेल. या भागातला शेतकरी , शेतमजूर आणि प्रत्येक माणूस हा स्वाभिमानी आहे . त्याचा स्वाभिमान कायम राहिला पाहिजे यासाठी त्याच्या हाताला रोजगार देण्यासाठी माझा प्रयत्न राहील असा विश्वास खा. डॉ . अजित गोपछडे यांनी यावेळी दिला .

आरळी सर्कलच्या विकासासाठी आपला कृती आराखडा तयार आहे. भविष्यात तो कृती आराखडा अंमलात आणण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असतील. कुंभारगाव- आरळी- कुंडलवाडी -नागनी या रस्त्यासाठी राज्य सरकारकडून २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे या भागात दळणवळणाची साधने आता मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतील . भविष्यातही या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीचे सरकार कटिबद्ध आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपल्या भागातील विकासासाठी सदैव तत्पर असणाऱ्या भाजपाच्याच उमेदवारांना पाठबळ द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**बॅकवॉटरमुळे होणाऱ्या नुकसानीवर तोडगा काढू**

आरळी सर्कलमध्ये ज्या बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्या बॅकवॉटरच्या प्रश्नावरही लवकरच तोडगा काढला जाईल .बिलोली , धर्माबाद, देगलूर आणि नायगाव या तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांना या बॅकवॉटरचा फटका बसतो. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांची एक संयुक्त बैठक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नंतर घेतली जाईल . त्या बैठकीत या बाधित शेतकऱ्यांना कायमस्वरूपी उपाययोजना केली जाईल, पांदन रस्ते विकासासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला असून याही बाबीचा फायदा आपल्या भागातील शेतकऱ्यांना होणार आहे. बारुळ तळ्याचे पाणी पूर्वी आरळी पर्यंत येत होते परंतु दरम्यानच्या काळात कालवा नादुरुस्त झाल्याने हे पाणी आरळी पर्यंत येत नाही. आता बारूळ तळ्याचा कालवा दुरुस्त करून पाणी आरळी पर्यंत आणण्यात येईल आणि याभागीतल कृषी सिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यात येईल असा विश्वास त्यांनी दिला. मी आपल्या कायम ऋणात राहील अशी भावनिक सादही खा. डॉ . अजित गोपछडे यांनी घातली.

## श्रावण भिलवंडे यांच्या उमेदवारीने लोहगांव सर्कलमध्ये राजकीय खळबळ!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ नोव्हेंबर-**

लोहगांव जिल्हा परिषद सर्कलमध्ये राजकीय समी करणांचा पट पुन्हा एकदा हलला आहे. भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत माजी जिल्हा सरचिटणीस तथा नरसी येथील श्री .तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेश नचे नूतन चेअरमन श्रावण भिलवंडे यांनी नुकताच जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उमेदवारीचा अर्ज दाखल केल्यानंतर भाजपामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.



भिलवंडे यांच्या अर्जाची चर्चा होताच लोहगांव सर्कलमध्ये राजकीय तापमान चढले असून विरोधी पक्षातील नवखे उमेदवार आणि त्यांचे समर्थक यांच्यात स्पष्ट अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष जिल्ह्यातील मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेवर सत्ताप्रस्थापित करण्यासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपाने सुरुवाती पासूनच अचूक रणनीती आखत विरोधकांना चकवण्याचे संकेत दिले आहेत.

नायगांव, बिलोली, धर्माबाद भागातून प्रबळ उमेदवारांची नावे अंतिम टप्प्यात असल्याची चर्चा सुरू असतानाच, लोहगाव सर्कलमधून श्रावण भिलवंडे यांच्या अर्जाने भाजपाच्या गोटात नवउमेद भरली आहे. श्रावण भिलवंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ राहून लोहगांव, कासराळी, तळणी, भोसी, चिंचाळा, डोणगाव खुर्द-बुद्रुक आणि रामपूर आदी गावांमध्ये पक्षकार्यकर्त्यांची मजबूत नाळ जोडून ठेवलेली आहे. त्यांच्या संघटनशैलीमुळे आणि जनसंपर्कामुळे भाजपाचे मुळ कार्यकर्ते पुन्हा एकदा एकवटलेले दिसत आहेत.

दुसरीकडे, माजी मंत्री तथा खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचे पुतणे रवी पाटील खतगांवकर (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) आणि सध्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांचे खंदे समर्थक शिवाजी पाटील पाचपिपळीकर (आ.भा. कॉ.) हे दोघेही उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत. मात्र, भिलवंडे यांच्या नावाच्या चर्चेमुळे त्यांच्या समर्थकांमध्ये गोंधळ आणि अस्वस्थता निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. राजकारणातील अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या श्रावण भिलवंडे यांनी लोहगाव सर्कलमध्ये आपली पकड मजबूत केली आहे. त्यांच्या राजकीय अनुभवासमोर नवखे उमेदवार उभे राहू शकतील का, हा प्रश्न आता सगळ्यांच्या चर्चेचा विषय बनला आहे. भाजपामध्ये उमेदवारी अर्ज सादर करताच भिलवंडे यांच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला असून लोहगाव सर्कलमध्ये भगव्या विजयाची चाहूल लागल्याची भावना व्यक्त केली जात आहे. आगामी काही दिवसांत या सर्कलमधील राजकीय घडामोडींना वेग येणार हे निश्चित असून श्रावण भिलवंडे विरोधकांना धोबीपछाड देऊन विजयाची पताका फडकवतात का, हे पाहण्यासाठी संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता लोहगांवकडे लागले आहे.

## सम्राट आढाव यांचा वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश

**नवीन नांदेड** -आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी हाडको येथील स्वाभिमानी निर्धार मेळावा कार्यक्रम प्रसंगी युवकांचे आयकॉन सुजात आंबेडकर यांच्या उपस्थितीत वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केला. हडको येथे आयोजित स्वाभिमानी निर्धार मेळाव्या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी दिनांक १ नोव्हेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला. आगामी स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्वाभिमानी निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास संबोधित करण्यासाठी युवकाचे आयकॉन सुजाता आंबेडकर हे उपस्थित होते. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद या निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडी सक्षम असल्याचे सांगून निष्ठा म्हणताना तिकीट दिल्या जाईल असेही सांगितले. यावेळी युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांचा पक्षप्रवेश झाल्याने सिडको हडको परिसरातुन वंचित बहुजन आघाडीस सक्षम होण्यास मदत होईल. पक्षप्रवेश कार्यक्रम यावेळी प्रदेश प्रवक्ते फारूक अहमद, युवा प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे, शिवा नरंगले, प्रशांत इंगोले, श्याम कांबळे, विठ्ठल गायकवाड, विनायक गजभारे, सुखा सिंग टाक, सिद्धोधन कापसे आदी युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.





## शिवाजीराव जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**नांदेड** -जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी तालुका मुखेड जिल्हा नांदेड चे अध्यक्ष तथा मुखेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शिवाजी नागोराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शिवरायनगर मालेगाव रोड तरोडा खुर्द येथील त्यांच्या निवासस्थानी मित्रमंडळीसह राजकीय पक्षातील नेते पदाधिकारी, पत्रकारांनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रभावी आणि आदर्श अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले शिवाजीराव जाधव उमरदरीकर, सर्व परिचित असल्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आदी सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून व व्हाट्सअप, च्या माध्यमातून शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, माजी आ.मोहन अण्णा हंबर्डे, एकनाथराव कल्याणकर, नांदेड अभिवक्ता संघाचे माजी अध्यक्ष अँड. सतीशराव पुंड,अँड. विजयकुमार भोपी,किसनराव कल्याणकर, माधव पावडे, पप्पू जाधव,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, प्रा.डी.बी जांभरुणकर, नेताजीराव भोसले,प्रा. मजरोद्दीन, माधवराव कल्याणकर, नारायणराव गायकवाड, सुभाषराव रावणगावकर, शिवसेनेचे शंकरराव लुटे बालासाहेब मादसवाड,प्रा.सौ. प्रांजली रावणगावकर, अँड. बाळासाहेब मोरे, शकुंतला पब्लिक स्कूलचे अध्यक्ष गिरीषराव जाधव, प्रा.यशवंत कांबळे, पांपटवार, चंद्रकांत घाटे,अँड. लक्ष्मण सोमवारे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे, मुखेड विधानसभा अध्यक्ष शंकरराव इंगळे, स. रणबीरसिंग खोकर, स.टहेलसिंग शाहू, स.नानसिंग घडीसाज, स.नारायणसिंग तबलेवाले,स.प्रेम्जितसिंग टेलर, स.गरूबचनसिंग बंड, स.अजितसिंग मंचरियालवाले,शिवकुमार देवकते, सुरेश चंदावाड, शादुल होणवडजकर, कैलास मादसवाड, प्रा.डॉ. गणेश जोशी, डॉ.अभय दांडगे, रमेश पांडे, रमेश चित्ते, प्रशांत गवळे,विजय मंगरुळे, श्रीधरराव कदम, योगगुरू सिताराम सोनटक्के, किशोर पसलवाड, मंगेश खंडागळे, आर.आर.यवतीकर, अबास काझी, विकास गजभारे,जीवन वडजे पाटील यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



## माजी पोलीस पाटील भीमराव कांबळे यांचे निधन

**मुदखेड** -मुदखेड शहरातील भीमनगर येथील माजी पोलिस पाटिल तथा बौद्ध उपासक का.भिमराव संभाजी कांबळे यांचे दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी ३:३० वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७१ वर्ष होते त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवार दि.४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४:३० वाजता भिमनगर येथील बौध्द स्मशान भूमी येथे करण्यात आला आहे. सचिन भिमराव कांबळे, सुमेध भिमराव कांबळे, दै.मराठवाडा केसरी तालूका प्रतिनिधी धम्मदाता भिमराव कांबळे यांचे ते वडील होत.



## हरवलेली बॅग महिलेस परत केली; हेअर ड्रेसर शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ४ नोव्हेंबर-**

माहूर बसस्थानकाजवळील एका हेअर कटिंग सलूनच्या दुकानासमोरील बाकड्यावर अज्ञातांची विसरलेली बॅग हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांना आज मंगळवार रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास दिसून येताच त्यांनी तातडीने माहूर पोलीस ठाण्याला माहिती देत जमा केली असता ह्या बॅगेचा शोध घेत आलेल्या नातेवाईक व्यक्तींना पोलिसांनी ती बॅग परत केली. या घटनेमुळे हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचे व माहूर पोलीसांच्या कर्तव्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक होत असून, बॅगेच्या मुळ मालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.



गीताताई कैलास राठोड रा.टेंडोळी ता.आर्णी जिल्हा यवतमाळ ह्या आपले पतीराज कैलास लक्ष्मण राठोड यांच्यासह खाजगी प्रवासी ट्रॅव्हल्सने पूणे येथून माहूर तालुक्यातील वाई बाजार या आपल्या माहेरी जात होत्या. माहूर येथे ट्रॅव्हल्समधून उतरल्यावर सदरील दांपत्यापैकी गीताताई या महिलेची बॅग ही प्रदीप हेअर सलूनच्या बाहेरच्या बाकड्यावर विसरली.

दरम्यान दुकानात मालक प्रदीप शेरकुरवार यांना सदरील बॅग निदर्शनास येताच त्यांनी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्याशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली. पोलीस नायक प्रकाश गेडाम यांनी तात्काळ जाय मोक्याच्या ठिकाणी भेट दिली असता व पोना गेडाम यांचे सोबत जात प्रदीप शेरकुरवार यांनी ती बॅग पोलीस ठाण्यात जमा केली. दरम्यान,वाई बाजार येथे माहेरी गेल्यावर गीताताई यांनी आपली बॅग हरवल्याचे अर्थात माहूर येथे सदरील दुकानाच्या बाकड्यावर विसरल्या चे लक्षात आले. त्यांचे नातेवाईक पतीराज कैलास राठोड व भाऊ मिथुन जाधव यांनी माहिती मिळाल्याप्रमाने माहूर पोलीस ठाणे गाठले व हरवलेल्या बॅगेसंदर्भात सविस्तर माहिती दिली, असता पोना प्रकाश गेडाम, हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांनी सदरील बॅग त्यांच्या सुपुर्द केली.

गत आठवड्यातच याच परिसरात भाविकाची ३ लाख ६० हजार रुपयांच्या मुद्देमालची हरवलेली बॅग येथील सायकल स्टोअर चे मालक यांनी मुद्देमालासह पोलीसांच्या व तेथून मुळ मालकास जशीच्या तशी परत केली होती, ही घटना ताजी असतानाच आजच्या या दुसऱ्या घटनेने माहूर शहरातील व्यापारी, व्यावसायिक हे किती प्रामाणिक आहेत याचे आणखी एक ज्वलंत उदाहरण पुढे आले असून,प्रवास करताना वा थांब्यावर उतरल्यावर प्रवाशांनी आपली व आपल्या सामानाची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर येथे देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विनंतीवजा सूचना केली असून, माहूरकरांनी रोशन भाई व शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भाविकांना अशीच सहकार्याची भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी मंगेश पाटील जाधव यांची नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ४ नोव्हेंबर-**

संभाजी ब्रिगेड पार्टी माहूर तालुका अध्यक्षपदी मंगेश पाटिल जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ०३ नोव्हेंबर रोजी या संदर्भातील नियुक्तीपत्र संभाजी ब्रिगेड पार्टी,जिल्हा अध्यक्ष नांदेड उत्तर कमलेश पाटील कदम यांनी त्यांना दिले आहे.



संभाजी ब्रिगेड या वैचारीक, सामाजिक व राजकीय चळवळीसाठी श्रम, वेळ, बुध्दी, कौशल्य व पैसा हे पंचदान देऊन पक्ष संघटनेत सातत्याने कार्यरत असल्याचे नियुक्तीपत्रात मंगेश पाटील जाधव यांच्या विषयी म्हटले असून,त्यांच्या या कार्याची विशेष दखल घेऊन जिल्हा अध्यक्ष कमलेश पाटील कदम यांनी त्यांची संभाजी ब्रिगेड पार्टी माहूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. आपल्या विचारकार्यातून पक्ष संघटन व समाज संघटन बळकट होईल.महामानवांच्या विचारांची समतावादी व्यवस्था निर्माण होण्यासाठी आपले योगदान महत्वाचे ठरणार असल्याचा विश्वास जिल्हाध्यक्षांनी व्यक्त केला आहे.

अटी व शर्तीच्या अधिन असलेली ही नियुक्ती केवळ सहा महिन्याच्या कालावधीसाठी असून या काळातील कामगिरीचा आढावा घेऊन पुढील काळासाठी ही नियुक्ती कायम करण्यात येणार आहे. संभाजी ब्रिगेड पार्टीचे नवनियुक्त माहूर तालुका अध्यक्ष मंगेश पाटील जाधव यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा,कमलेश पाटील कदम जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, नांदेड़ उत्तरयांनी दिल्या आहेत. तर या नियुक्ती बद्दल माहूर/किनवटसह परिसरातील स्नेहांकितांकडून मंगेश पाटील जाधव यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## किनवट शिक्षण संस्था कार्यकारीणी मंडळाची सभा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ नोव्हेंबर-**

किनवट शिक्षण संस्था किनवट यांची कार्यकारिणी मंडळाची महत्वाची सभा संस्थेच्या बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा येथे संपन्न झाली. या सभेत विविध प्रशासकीय व निवडणुकीसंबंधी महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.



सभेअंती धर्मदाय उपायुक्त, नांदेड यांच्या आदेशानुसार चौकशी क्रमांक ८४८/२५ प्रमाणे निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर विद्यमान कार्यकारिणीचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नव्या कार्यकारिणी मंडळाच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण सभेचे आयोजन दिनांक २३ नोव्हेंबर, रविवार या दिवशी घेण्यात येईल, असा ठराव सभेत सर्वसंमतीने मंजूर करण्यात आला.

सभा, नारायणराव सिडाम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी संस्थेचे सचिव शंकरराव चाडावार, इसा खान सरदार खान, अल्लाबक्ष अबदुल रझ्झाक, दिनकरराव चाडावार, ठाकुर नारायण जाधव, जसवंतसिंग सोखी यांची उपस्थिती होती. सभेचे संचालन सचिवांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या सदस्यांनी केले. या सभेमुळे आगामी कार्यकारिणी निवडणुकीसाठी संस्थेमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सगरोळी पं. स. गणातून भारतीय जनता पक्षाकडून मुतेपोड रवी सायन्ना इच्छुक

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ४ नोव्हेंबर-**

आगामी होत असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे लवकरच बिघून वाजणार असून बिलोली तालुक्यातील सगरोळी मतदार संघातून विविध पक्षाचे कार्यकर्ते निवडणुकीसाठी समोर येत आहेत सगरोळी पंचायत समिती गण हा अनूसुचित जमातीसाठी राखीव झाला असून या गणातून सगरोळी येथील मुतेपोड रवी सायन्ना यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा भारतीय जनता पक्षाकडे व्यक्त केले आहे.

मुतेपोड रवी सायन्ना हे कार्यकर्ते व लक्ष्मणराव ठक्करवाड यांचे कट्टर समर्थक असून ते सगरोळी पंचायत समिती गणातून आनुसुचित जमातीसाठी राखीव झालेल्या जागेवर निवडणूक लढवण्यासाठी तयारी दर्शविली आहे.दिवंगत आमदार गंगाराम ठक्करवाड यांचे कट्टर समर्थक समजल्या जातात मुतेपोड रवी सायन्ना हे भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते असून त्यांनी पक्षाची ताकद ग्रामीण भागात मजबूत केले असून त्यांचा सामाजिक कार्यात मोठा अग्रेसर असतो सगरोळी पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाकडून तिकीट मागणी करीत आहे व ग्रामीण भागातील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य यांच्याशी त्यांचा दांडगा संपर्क असल्यामुळे ते लोहगाव पंचायत समिती गणा मधून इच्छुक उमेदवार म्हणून जनसामान्यातून त्यांना पसंती मिळत असल्याचे बोलले जात आहे.



## श्रीदत्त प्रभूच्या ४१ किलो चांदीच्या मूर्तीची हादगाव शहरातून शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ नोव्हेंबर-**

हदगाव शहरातून ४१ किलो चांदीच्या श्री दत्तप्रभू च्या मूर्तीची शोभायात्रा बँड पथक भजनी मंडळ २१ घोडे व हदगाव तालुक्यातील महंत - संत भगव्या पताका व ध्वज अशी भव्य दिव्य मिरवणूक हदगाव शहरातून सकाळी ११ वाजता शिव पार्वती मंगल कार्यालयातून निघून पूर्ण हदगाव शहरातून शोभा यात्रेचे दत्तबर्डी देवस्थान येथे विसर्जन झाले.

या शोभायात्रीत हदगाव तालुक्यातील आ. बाबुराव कोहळीकर, माजी खा. सुभाष वानखेडे यांच्यासह हदगाव तालुक्यातील हजारोचा जनसमुदाय या शोभायात्रेत होता.

या शोभायात्रेत आर्य समाजाच्या वतीने पाणी व फळाचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्याचे दैवत असलेल्या श्री दत्तात्रय संस्थान दत्तबर्डी येथील प्रसिद्ध मंदिरात श्री श्री १००८ महंत श्रीगोपाळगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली दत्त मूर्तीचा जिर्णोद्धार सोहळा ५ नोव्हेंबर रोजी होणार असून त्यानिमित्त दिनांक २९ ऑक्टोबर रोजी बुधवारपासून दत्तनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे.



हदगाव शहरालगत दत्तबर्डीच्या टेकडीवर श्री दत्तात्रयाचे पुरातन मंदिर आहे. या मंदिराला शेकडो वर्षाची परंपरा आहे. दत्तात्रयांचे हे मोठे घर म्हणून ओळखले जाते. या मंदिरात अनेक वर्षांपूर्वी बनवलेली मूर्ती आहे या मूर्तीला बदलण्याची गरज असल्याचे सर्व भक्त गणांच्या आणि खुद्द श्री श्री १००८ महंत महाराजांच्या लक्षात आले. त्यासाठी दत्त भक्तांची बैठक घेऊन सर्वांच्या सहयोगाने महंत श्रीगोपाळगिरी महाराजांनी ४१ किलो चांदीची मूर्ती बसवण्याचा संकल्प केला. त्यासाठी सर्व दत्त भक्तांनी सढळ हस्ताने देणगी सुद्धा दिली. एक दत्त भक्त श्री सुभाष शुगर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी मूर्तीसाठी मोलाचा हातभार लावला. दत्त भक्तांनी गावागावातून वर्गणी करून या मूर्तीसाठी देणगी दिली तर काही दत्तभक्तांनी पाच हजार, अकरा हजार, एकेविस हजार ते एक लाख, सव्वा लाख रुपये पर्यंत देणगी दिली. सर्व दत्त भक्तांच्या देणगीतून ही ४१ किलो चांदीची मूर्ती बनवण्यात आली असून जुन्या मुर्तीच्या ठिकाणी तिची स्थापना आणि प्राणप्रतिष्ठा येत्या ०५ नोव्हेंबर रोजी बुधवारी करण्यात येणार आहे. या दत्त मूर्तीच्या जिर्णोद्धार कार्यक्रमानिमित्त दि. २९ ऑक्टोबर रोजी बुधवार पासून दत्त नाम सप्ताहास सुरुवात करण्यात आली आहे. बुधवारपासूनच हदगांव शहराजवळ दत्तबर्डी संस्थान येथे भाविकांची मोठी गर्दी होत आहे. यामध्ये दुरवरून येणारे दत्तभक्त या सप्ताह निमित्त सात दिवस हदगावांत दत्तभक्तीत लिन होतांना दिसत आहेत या सप्ताह निमित्त येणाऱ्या दत्त भक्तांच्या राहण्याची व महाप्रसाद रुपाने भोजनाची सर्व व्यवस्था सातही दिवस हदगांव परिसरातील वेगवेगळ्या गावच्या भक्तमंडळी कडून करण्यात येत आहे. तर हडसणी येथील गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे. मुर्ती स्थापनेच्या दिवशी श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख रा. ढोकी ता. जिल्हा धाराशिव आणि कार्यकारी संचालक सुशिलकुमार देशमुख यांच्याकडून महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**ऐतिहासिक क्षणाचे आपण साक्षीदार व्हा**

दत्त बर्डीच्या टेकडीवर असलेल्या दत्तात्रयाचे जागृत देवस्थान असून पुरातन मंदिर आहे या मंदिराला शेकडो वर्षाची परंपरा लाभली असून याच ठिकाणी ४१ किलो चांदीच्या श्री दत्तप्रभू च्या मूर्तीचा जीर्णोद्धार सोहळा आयोजित केला असून हा क्षण ऐतिहासिक असून या क्षणाचे आपण साक्षीदार व्हा असे अवाहन माजी खासदार सुभाष वानखेडे व आमदार कोहळीकर यांनी दत्तभक्तांना केले आहे.

# तुळजापूर शहर स्वच्छतेच्या ठेक्यात लाखोंचा अपहार; मुख्याधिकारी व ठेकेदार कंपनीवर आरोप

## ▸▸ सुनील घाडगे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, चौकशी व फौजदारी गुन्ह्यांची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -** नगर परिषदेच्या शहर स्वच्छतेसाठी देण्यात आलेल्या ठेक्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप समाजसेवक सुनील घाडगे यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात मुख्याधिकारी व स्वच्छता ठेकेदार कंपनी यांच्यावर संगनमत करून दरमहा लाखो रुपयांचा अपहार केल्याचा ठपका ठेवला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगर परिषद तुळजापूर व शासनाची दिशाभूल करून दरमहा २५ लाख २८ हजार ४०० रुपये इतक्या रकमेचा अपहार केला जात असून, याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंदवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहर स्वच्छतेच्या नावाखाली मुख्याधिकारी यांनी त्यांच्या मर्जीतील मे. समृद्धी फॅसिलीटी प्रा. लि. या कंपनीला दरमहा २५ लाख २८ हजार ४०० रुपये रकमेचा ठेका दिला आहे. या ठेक्यासाठी केवळ ५०० रुपये स्टॅम्प पेपरवर करार करण्यात आला असून त्यात ५६ अटी नमूद आहेत. मात्र, त्या केवळ कागदोपत्री राहिल्या असून कंपनीने कोणत्याही अटींचे पालन केलेले नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

घाडगे यांच्या मते, मुख्याधिकारी आणि ठेकेदार कंपनी यांच्यात मिलीभगत असून, दरमहा लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करून नगर परिषदेच्या निधीची लूट केली जात आहे. शहरातील परिस्थितीही अतिशय दयनीय असल्याचे घाडगे यांनी नमूद केले. शहरातील नाल्या तुंबलेल्या आहेत, रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग पडलेले असून त्यातून दुर्गंधी येत आहे. किटकनाशक फवारणी होत नाही, आणि भाविकांना अस्वच्छ वातावरणातूनच मंदिरात जावे लागत आहे.

या संदर्भात नागरिकांनी व सोशल मीडियाद्वारे अनेकदा तक्रारी केल्या असूनही मुख्याधिकारी कोणतीही कारवाई करत नाहीत. त्यांना ठेकेदार कंपनीकडून आर्थिक फायदा होत असल्याने ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, असा आरोप घाडगे यांनी केला आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालून सखोल चौकशी करावी, मुख्याधिकारी व ठेकेदार कंपनीवर फौजदारी गुन्हे नोंदवावेत आणि अपहार केलेली रक्कम वसूल करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी तातडीने कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही घाडगे यांनी दिला आहे.

# गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहिदी समागमाची तयारी

## ▸▸ तुळजापूर येथे कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे शीख पंथाचे नववे गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन मुंबई, नागपूर आणि नांदेड येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित कार्यशाळा नुकतीच तुळजापूर येथे शनिवारी संपन्न झाली.

या कार्यशाळेला आमदार बाबूसिंहजी महाराज (धर्मगुरू पोहरादेवी), सुनील महाराज, जितेंद्र महाराज, क्षेत्रीय प्रांत प्रमुख महेंद्र रायचुरा, रामेश्वर नाईक (कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष) आणि राज्यस्तरीय समन्वय समिती सदस्य किसन राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या प्रेरणादायी भाषणात प.पू. बाबूसिंहजी महाराज म्हणाले, मुगल आक्रमण काळात अत्याचाराविरुद्ध उभे राहत ✻✻गुरु तेग बहादूरजींनी भारतीय संस्कृतीचे संरक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळेच त्यांना 'हिंद की चादर' म्हणून ओळखले जाते.

त्याचप्रमाणे रामेश्वरजी नाईक यांनी सांगितले की, धर्म व मानवतेच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणारे गुरु तेग बहादूर साहिब हे भारतीय इतिहासातील महान बलिदानी संत होते. त्यांच्या शिकवणी समाजाला एकतेचा व सहिष्णुतेचा संदेश देते.

सूत्रसंचालन संतोष चव्हाण यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रवीण पवार यांनी मानले. या कार्यशाळेला लातूर, बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील आयोजन समिती सदस्य उपस्थित होते.

# येरमाळ्याची शरयू पाटील सीए इंटरमीडिएट परीक्षेत उत्तीर्ण

## पंचक्रोशीतील पहिली विद्यार्थिनी ठरली...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ नोव्हेंबर -** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICI) मार्फत घेतल्या जाणाऱ्या सप्टेंबर २०२५ मधील इंटरमीडिएट सीए परीक्षेत येरमाळ्याच्या शरयू पाटील हिने घवघवीत यश संपादन केले आहे.

सप्टेंबर २०२४ मधील सीए फाउंडेशन परीक्षेत यश मिळाल्यानंतर तिने इंटरमीडिएट परीक्षेची तयारी सुरू केली होती. सातत्यपूर्ण अभ्यास, विषयाचे सखोल ज्ञान, आत्मविश्वास आणि नियमित सराव हे यशाचे गमक ठरले असल्याचे शरयूने सिद्ध केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शरयू पाटील ही येरमाळा पंचक्रोशीतील सीए इंटरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण होणारी पहिली विद्यार्थिनी ठरली आहे.

तिचे शालेय शिक्षण बारामती येथील विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मिडियम स्कूल (CBSE) येथे झाले असून सध्या ती पुणे येथील बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बी.एम.सी.सी.) या प्रथितयश महाविद्यालयात उच्च शिक्षण घेत आहे.



एक उत्तम चार्टर्ड अकाउंटंट बनून आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्याचे तिचे स्वप्न आहे. आई-वडील आणि शिक्षकांच्या प्रोत्साहनासह सातत्यपूर्ण अभ्यासामुळे हे यश संपादन झाल्याचे शरयूने सांगितले.

ती येरमाळा येथील प्रा.डॉ. सुधीर पाटील यांची कन्या आहे.

# उद्धव ठाकरे यांचा मराठवाडा दौरा; शेतकऱ्यांशी साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -** शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे मराठवाड्याच्या नियोजित दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात ते शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

दि.५ नोव्हेंबर रोजी ठाकरे खाजगी वाहनाने भूम तालुक्यातील पाथ्रुड येथे दुपारी २ वा., परंडा तालुक्यातील शिरसाव येथे दुपारी ३.३० वा., तसेच घारी (ता. बार्शी) येथे सायं. ५ वा. भेट देतील. सायं. ७ वा. ते धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात पोहोचून धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करतील.

दि.६ नोव्हेंबर रोजी ठाकरे धाराशिव येथून करजखेडा येथे प्रस्थान करून दुपारी १२ वा. भुसनी येथे भेट देतील.

त्यानंतर पुढील नियोजित दौऱ्याकरिता प्रयाण करतील, अशी माहिती शिवसेना कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# धाराशिवमध्ये गोवंश तस्कर पकडला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -** धाराशिव शहर पोलिसांनी गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस अटक केली आहे.

आरोपी साबेर बुर्हान कुरेशी (वय १९, रा. बुधवार पेठ, मोहोळ, जि. सोलापूर) हा बोलेरो (क्र. एमएच १४ एम ७५५९) वाहनात दोन जर्शी गायी व एक कालवड अशी सुमारे ७ लाख ५५ हजार रुपये किंमतीची जनावरे कत्तलीसाठी निर्दयपणे वाहतूक करताना अहिल्यादेवी होळकर चौकातील पुलाखाली पोलिसांच्या हाती लागला.

# तुळजापूर गुन्ह्यातील आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेची गजाआड; मोबाईल हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -** ३१ ऑक्टोबर रोजी तुळजापूर येथील गंभीर गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. अमोल मोरे यांच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. तुळजापूर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गु.र.नं. ४०६/२०२५, कलम ३०४, ३(५)(बीएनएस) या गुन्ह्यातील आरोपी आणि चोरीस गेलेला मुद्देमाल शोधण्याचे काम सुरु असताना, पथकाने तुळजापूर येथून आरोपी मनोज उर्फ पापा महादेव घोत्रे (वय ३०, रा. वेताळ नगर, तुळजापूर,) यास ताब्यात घेतले.



चौकशीदरम्यान आरोपीने नमूद गुन्हा आपल्या साथीदारासह केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यातील रेडमी कंपनीचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून, आरोपीस पुढील तपासासाठी तुळजापूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. अमोल मोरे, राहुल नाईकवाडी, समाधान वाघमारे, बळीराम शिंदे, अशोक ढगारे, विनायक दहिहंडे, योगेश कोळी तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पो.अं. सुर्यवंशी व भोसले यांनी सहभाग घेतला.

# खेर्डा शिवारातून ११० क्विंटल सोयाबीन चोरी

## ▸▸ भाऊंनीच केली शिवीगाळ व जीव घेण्याची धमकी... ▸▸ कळंब पोलिसात तक्रार...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ नोव्हेंबर -** कळंब तालुक्यातील खेर्डा शिवारात एका शेतकऱ्याचे ११० क्विंटल सोयाबीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी फिर्यादीच्या नातेवाईकांविरोधात कळंब पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी बिभीषण सुखदेव लोकरे (वय ४० वर्षे, रा. खेर्डा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांचे खेर्डा शिवारातील गट क्र.४९, ७८, १०६, व १११ मधील एकूण १७ एकर शेतीतून ११० क्विंटल सोयाबीन, किंमत सुमारे ४ लाख १८ हजार रुपये आरोपींनी चोरून नेले.





या प्रकरणी भास्कर प्रल्हाद लोकरे, सुधाकर प्रल्हाद लोकरे, बबन प्रल्हाद लोकरे, कालीदास प्रल्हाद लोकरे, सुशांत भास्कर लोकरे, प्रमोद सुधाकर लोकरे व इतर (सर्व रा. खेर्डा, ता. कळंब) या आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी देत चोरी केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दि.२ नोव्हेंबर रोजी बिभीषण लोकरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भा.दं. सं. कलम ३७९, ३५२, ५०६ सह महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# रविंद्र बारकुल यांची महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिक बोर्ड स्टाफ क्रेडिट सोसायटीच्या सचिवपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ नोव्हेंबर -** कळंब तालुक्यातील येरमाळा येथील रविंद्र बारकुल यांची महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिक बोर्ड स्टाफ क्रेडिट सोसायटीच्या सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली असून, त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महावितरण कंपनीतील कर्मचारी बांधवांची महाराष्ट्रातील सर्वात मोठी सहकारी पतसंस्था म्हणून या सोसायटीची ओळख आहे. मराठवाडा कार्यक्षेत्र असलेल्या या संस्थेची बैठक दि.१ रोजी पार पडली. या बैठकीस सोसायटीचे सर्वेसर्वा व संस्थापक अध्यक्ष मारुती खामकर, चेअरमन देवानंद सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ उपस्थित होते.

या बैठकीत सोसायटीचे संचालक म्हणून कार्यरत असलेले रविंद्र बारकुल यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीनंतर संस्थेचे सर्वेसर्वा मारुती खामकर, चेअरमन देवानंद सुरवसे, नामदेव माळी, सत्यवान शिंदे, बालाजी आबा जावळे, नवनाथ काकडे, नामदेव कुंभार, बापू जगदे, सुनील कुचकर, बालाजी क्षीरसागर, राजेंद्र चव्हाण आदींनी त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सर्व संचालक मंडळ सदस्य, सोसायटीचे कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविंद्र बारकुल यांच्या निवडीनंतर येरमाळा परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जेवळी जि.प. गटात प्रणाली पाटील यांचे नाव चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ नोव्हेंबर -** लोहारा तालुक्यातील जेवळी जिल्हा परिषद गटात सध्या सर्वत्र चर्चेत असलेले नाव म्हणजे प्रणाली राजेंद्र पाटील. समाजकारण म्हणजे लोकसेवा हा विचार प्रत्यक्षात उतरवणारे त्यांचे पती व भाजप तालुकाध्यक्ष राजेंद्र अमृतराव पाटील हे जनसामान्यांशी थेट संवाद साधणारे आणि प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. या पार्श्वभूमिवर प्रणाली पाटील यांचे नाव जेवळी जिल्हा परिषद सदस्यपदाच्या प्रबळ दावेदारांमध्ये पुढे येत आहे. कर्तृत्व, समाजसेवा आणि नेतृत्वाचा संगम असलेल्या प्रणाली पाटील यांच्या रूपाने जेवळी गटाला एक कार्यक्षम, लोकाभिमुख आणि जनतेच्या मनातील जिल्हा परिषद सदस्य मिळणार, अशी चर्चा सध्या लोहारा तालुक्यात रंगत आहे.



# नाना-नानी पार्क व नगर पंचायत इमारत कामे ठप्प; राष्ट्रवादीकडून १५ दिवसांत काम सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ नोव्हेंबर -** लोहारा शहरातील जुने तलाव परिसरातील नाना-नानी पार्क तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नगर पंचायत इमारतीचे बांधकाम मागील दीड ते दोन वर्षांपासून बंद अवस्थेत पडून आहे. संबंधित कंत्राटदाराकडून शासनाने घालून दिलेल्या नियम, अटी व शर्तींचे पालन न करता मनमर्जीने कामकाज सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम केले का याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नगर पंचायतचे अधिकारी व पदाधिकारी यांनी या कामांना पुन्हा सुरू करण्यासाठी कोणतीही ठोस हालचाल केली नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली. उलट संबंधित कंत्राटदाराला मुदतवाढ देऊन नगर पंचायतीकडून त्याला अभय दिल्याचा आरोप करण्यात आला.

मुदतवाढ मिळून दोन महिने उलटले असतानाही कंत्राटदाराने काम सुरू केलेले नाही. त्यामुळे यापुढे कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देऊ नये तसेच शासनाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



तसेच, पुढील १५ दिवसांत नाना-नानी पार्क व नगर पंचायत इमारतीचे काम सुरू न केल्यास संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, लोहारा शहर यांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा नगर पंचायत उपाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आयुब हबीब शेख यांनी दिला आहे.

# विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये भव्य प्रवेश; पक्षाची संघटनात्मक ताकद वाढली

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ नोव्हेंबर -** उमरगा शहरातील काँग्रेस कार्यालयात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांतील पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात भव्य जाहीर प्रवेश सोहळा व पदनियुक्ती समारंभ उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव व उमरगा-लोहारा विधानसभा प्रभारी कल्याणजी पाटील, धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अॅड. धीरज पाटील, तसेच जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष व युवा नेते अशलेष मोरे प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच इतर विविध पक्ष आणि सामाजिक संघटनांतील माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून पक्षाच्या ताकदीत भर घातली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा तालुका काँग्रेस अध्यक्ष अर्जुन बिराजदार होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस विजय वाघमारे, तालुका कार्याध्यक्ष एम. ओ. पाटील, नाना भाऊ भोसले, मधुकर यादव, जिल्हा सचिव संजय सरवदे, शहराध्यक्ष विजय दळगडे, लोहारा तालुका अध्यक्ष शामसुंदर तोरकडे, ज्येष्ठ नेते अॅड. दिलीप सगर, अॅड. पोतदार, कार्याध्यक्ष अभिषेक औरादे, तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते ख्वाजा मुजावर, माजी नगरसेवक जयश्री संजय चव्हाण (शिंदे गट), संभाजी ब्रिगेड प्रवक्त्या रेखा सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती रजपूत, सचिन सुतके, महेश गायकवाड, योगेश माने यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# डिकसळ येथे रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या पादुका पूजन व प्रवचन सोहळ्याला उत्साह

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ नोव्हेंबर -** डिकसळ (ता. कळंब) येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिण पीठ, नाणीजधाम) यांच्या सिद्ध पादुका पूजन व प्रवचन सोहळ्याचे आयोजन दि.९ नोव्हेंबर रोजी, रविवार सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी भगवा ध्वज फडकवून व मंडपाचे भूमिपूजन दिगंबर कुंभार दांपत्याच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सरपंच पुष्पा धाकतोडे, नानासाहेब धाकतोडे,



शीतल चोंदे, राहुल चव्हाण, विकास कदम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जिल्हा निरीक्षक दत्ता घरत, संतोष केसकर, कल्याण बोराडे, विठ्ठल काटे आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

सकाळी ८ वाजता कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य शोभायात्रेला सुरुवात होणार असून, त्यात कलशधारी महिला, ध्वजधारी पुरुष, भजनी मंडळे व विविध पथके सहभागी होतील.

शोभायात्रेनंतर पादुका पूजन, प्रवचन व सामाजिक उपक्रम राबवले जाणार असून, जिल्ह्यातून ३० ते ४० हजार भाविक उपस्थित राहणार आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या पूर्व भागात गुन्हेगारी वाढीमुळे नागरिकांमध्ये भीती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४, नोव्हेंबर -**

लातूर शहराच्या पूर्व भागात वाढत्या गुन्हेगारी घटना आणि वाहतूक विस्कळीततेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीने गरुड चौक ते पिंटू हॉटेल परिसरात कायमस्वरूपी पोलीस मदत केंद्र उभारणीसह वाहतूक पोलीस तैनात करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अलिकडेच या परिसरात धारदार शस्त्रासह युवकांमध्ये झालेल्या मारामारीनंतर नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. तसेच ३६१ क्रमांकाच्या महामार्गावर वाढलेल्या वाहनांच्या वर्दळीमुळे सिग्नल बंद असल्याने वाहतूक गोंधळ आणि अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी समितीने केली असून निवेदनावर अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे, कमलाकर कांबळे, भगवेश्वर धनगर, दत्ता मामडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### दैठणा येथे व्यंकटराव बिरादार यांचा रामराव पाटील विद्यालयात सत्कार

**दैठणा, दि.४ नोव्हेंबर -**

दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूरचे संचालक व्यंकटराव बिरादार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. सहकार क्षेत्रातील अर्थकारणाचा अभ्यास करण्यासाठी काही दिवसांपूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, लक्झमबर्ग, बेल्जियम, नेदरलँड, आयर्लंड, स्वित्झर्लंड आणि इटली अशा ११ देशांचा १३ दिवसांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. या महत्त्वपूर्ण सहकार अभ्यासदौऱ्यात व्यंकटराव बिरादार यांनी अग्रस्थानी सहभाग नोंदवत सहकार क्षेत्रातील जागतिक अनुभव आत्मसात केला. त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात व्यंकटराव बिरादार यांचा शाल, श्रीफळ, फेटा आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन राजीव गुडे यांनी केले. कार्यक्रमाला प्रकाश पाटील, संदिपान पाटील, गणपत पाटील, स्वप्निल रेड्डी, विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक व्यंकटराव मुळे, विश्वजीत सांगवे, बनसोडे, गोविंद पेंटम, शेटे तसेच शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विधानसभेचे काँग्रेस नेते अशोक निलंगेकर यांची पाटील परिवारास भेट

**डिगोळ, दि.४ नोव्हेंबर -**

निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मा. अशोकभैय्या शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी डिगोळ येथील पाटील परिवारास भेट देऊन सांत्वनपर दिलासा दिला. डिगोळ सोसायटीचे चेअरमन आणि ग्रामपंचायतीचे उपसरपंच स्व. बाबासाहेब पाटील यांच्या काही दिवसांपूर्वी झालेल्या निधनाबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला आणि पाटील कुटुंबियांचे दुःखात धैर्य वाढविले. स्व. बाबासाहेब पाटील हे निलंगेकर परिवाराचे जवळचे स्नेही व काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते होते. त्यांच्या अकाली निधनाने डिगोळ परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी सरपंच काशिनाथ बिराजदार, उत्तम बिरादार, सुरेंद्र धुमाळ, सुधीर लखनगावे, व्यंकटराव शिंदे, शंकर वाघमारे, जर्नाधन पाटील सुमठाणकर, रमेश मोगरगे, प्रा.डॉ. दयानेश्वर दाताळ, गोरख अंबुलगे तसेच काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




### 'संघ गंगा के तीन भगीरथ' नाटकाचा प्रभावी प्रयोग

**लातूर, दि.४ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय व हिंदी साहित्य अकादमीच्या वतीने 'संघ गंगा के तीन भगीरथ' या नाटकाचा प्रभावी प्रयोग लातूरच्या दयानंद सभागृहात संपन्न झाला. राधिका क्रिएशन्स नागपूर/पुणे निर्मित या नाटकात २८ कलाकारांनी ४६ भूमिका साकारल्या. कार्यक्रमास मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार व हिंदी साहित्य अकादमीचे सचिव सचिन निंबाळकर उपस्थित होते. परम पूजनीय डा. हेडगेवार, श्री गुरुजी व बाळासाहेब देवरस यांच्या राष्ट्रकार्यावरील प्रेरणादायी जीवनपटावर आधारित हे नाटक सर्वत्र कौतुकास पात्र ठरले.

# औसा किल्ल्याच्या संवर्धनाला गती; पर्यटनासाठी नवे आकर्षण केंद्र बनेल : मंत्री शेलार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.४, नोव्हेंबर -**

ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेल्या औसा येथील किल्ल्याच्या संवर्धनाच्या कामांना आता गती देण्यात येणार असून, हे काम पूर्ण झाल्यानंतर औसा किल्ला पर्यटकांसाठी एक नवे आकर्षणकेंद्र ठरणार असल्याची ग्वाही राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

मंत्री शेलार यांनी औसा किल्ल्याची पाहणी करून परिसरातील विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी आ. अभिमन्यू पवार, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, सहायक संचालक अमोल गोटे, औसा नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री शेलार म्हणाले की, औसा किल्ल्याच्या डागडुजी आणि संरक्षणासाठी आवश्यक कामांचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा. मंजूर झालेल्या कामांना गती देऊन मंजुरी प्रक्रिया लवकर पूर्ण केली जाईल. किल्ल्यातील अतिक्रमण हटवताना येथील नागरिकांना पर्यायी घरे देण्यासाठी आवास योजनेचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, पर्यटकांसाठी 'साऊंड अँड लाईट शो'च्या माध्यमातून औसा किल्ल्याचा गौरवशाली इतिहास सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, किल्ल्याच्या परिसरात काही घरांचे अतिक्रमण असल्याने संवर्धनाच्या कामांना अडथळा येत आहे. संबंधित कुटुंबांना आवास योजनेतून घरे देऊन जागा मोकळी केल्यास संवर्धनाला गती मिळेल. त्याचबरोबर त्यांनी खरोसा येथील प्राचीन लेण्यांचेही संवर्धन करण्यात यावे, अशी मागणी केली.



पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे व सहायक संचालक अमोल गोटे यांनी औसा किल्ल्याच्या दुरुस्तीच्या कामांची सद्यस्थिती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी याविषयी सविस्तर माहिती दिली. आ. पवार यांनी व्यक्त केले की, औसा किल्ल्याच्या पुनरुत्थानामुळे औसा शहराला नव्या पर्यटन नकाशावर स्थान मिळेल, तसेच येत्या काही महिन्यांत संवर्धन व विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळेल.

## उदगीर-जळकोट बसस्थानकातील उर्वरित कामे तातडीने पूर्ण करावीत : आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४, नोव्हेंबर -**

उदगीर व जळकोट शहरात अत्याधुनिक बसस्थानकांच्या बांधकामाचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू असून, त्यामधील काही सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. तसेच उदगीर-जळकोट मतदारसंघात ये-जा करणाऱ्या महामंडळाच्या एस.टी. बसेसची कमतरता असल्याने प्रवाशांना मोठी गैरसोय भासत आहे. या सर्व उर्वरित प्रश्नांबाबत माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मंत्रालयात भेट घेऊन तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली.




आमदार बनसोडे यांच्या या मागणीवर परिवहन मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत बसस्थानकांच्या उर्वरित कामांसह मतदारसंघातील सर्व प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले आहे.

उदगीर मतदारसंघ हा महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमेवर असल्याने येथे नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. मात्र विद्यमान एस.टी. बसेस कमी असून काही बसेस नादुरुस्त व मोडकळीस आल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. आमदार बनसोडे यांनी उदगीर आणि जळकोट येथील बसस्थानकांच्या उर्वरित कामांना निधी उपलब्ध करून देण्याची तसेच मतदारसंघात नव्या बसेस सुरू करण्याची मागणी परिवहन मंत्र्यांकडे केली.

जळकोट शहरातील बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती भव्य पुतळा उभारण्यात येत आहे. सध्या पुतळ्याच्या चबुतर्याचे काम सुरू असून परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी जागा अपुरी पडत आहे.

या पार्श्वभूमीवर बसस्थानकातील पुतळ्याचा परिसर वाढवून सुशोभीकरणासाठी शासनस्तरावरून निधी द्यावा, अशी मागणीही आमदार बनसोडे यांनी परिवहन मंत्री सरनाईक यांच्याकडे केली आहे.

## 'रिलेशानी' प्रशिक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४, नोव्हेंबर -**

अभिनव विकास संस्था संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात पुण्याच्या 'आरोग्यभान' संस्थेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय 'रिलेशानी' प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक बदलांच्या काळात उद्भवणाऱ्या प्रश्नांना शास्त्रीय आणि समजण्यास सोपी उत्तरे देण्याच्या हेतूने हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात आरोग्यभान संस्थेचे मोहन देस, श्रुती आणि माणिक यांनी नाट्य, चित्र, संगीत आणि संवाद या माध्यमांतून विद्यार्थ्यांच्या भावनांशी थेट संवाद साधत आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध कसे निर्माण करावेत, याविषयी प्रभावी मार्गदर्शन केले.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांसमोर प्रशिक्षणादरम्यान घेतलेल्या शिकवणीचे नाट्यमय सादरीकरण सादर करून सर्वांची मने जिंकली. अनेक विद्यार्थी अनुभव कथन करताना भावविवश झाले; एका विद्यार्थिनीला तर डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. या प्रसंगातून शिबिराच्या प्रभावीतेची प्रचिती आली.

समारोप सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. त्यांनी या प्रशिक्षण शिबिरामागचा उद्देश आणि भूमिका विशद केली.

अतुल देऊळगावकर यांनी विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा उपयोग आपल्या सहकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. किशोरवयीन मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते उद्याचे आदर्श नागरिक बनू शकतात, असे ते म्हणाले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## तिरू नदीत वाहून मायलेकीचा मृत्यू; मरसांगवीत शोककळा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४, नोव्हेंबर -**

जळकोट तालुक्यातील मरसांगवी येथे अतिशय दुर्दैवी घटना घडली असून, तिरू नदीतील पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने मायलेकीचा मृत्यू झाल्याची घटना दि.३ नोव्हेंबर रोजी सकाळी सुमारास अकराच्या दरम्यान घडली.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, मरसांगवी येथील कौशल्या अजय वाघमारे (वय ३५) आणि त्यांची मुलगी रुक्मिणी अजय वाघमारे (वय १४) या दोघी सकाळी कापूस वेचण्यासाठी गावातीलच मरीबा वाघमारे यांच्या शेतात मजुरीसाठी जात होत्या.

संबंधित शेत नदीच्या पलीकडे असल्याने त्या दोघी नदी ओलांडून जात होत्या. त्या वेळी नदीत पाणी कमी होते; मात्र अचानक तिरू नदीचा प्रवाह वाढल्यामुळे दोघी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

गावकऱ्यांना ही घटना कळताच अनेक जण नदीपात्रात धावले व शोधकार्य सुरू केले. परंतु तोपर्यंत दोघींचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

मरसांगवी गावाच्या वरच्या बाजूला असलेल्या तिरू प्रकल्पातून दररोज पाणी सोडले जाते. दि. ३ नोव्हेंबर रोजीही अचानक गेट उघडून पाणी सोडण्यात आल्याने नदीतील प्रवाह आणि वेग वाढला, अशी माहिती सरपंच रवी गोरखे आणि चेअरमन उमाकांत इमडे यांनी दिली. त्यांनी सांगितले की, पाण्याचा वेग अचानक वाढल्यामुळे दोघींना अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली. मरसांगवी गाव तिरू नदीकाठी वसलेले असून, नदीवर पूल नसल्याने गावकऱ्यांना शेताकडे जाण्यासाठी नदी पार करावी लागते. पावसाळ्यात किंवा प्रकल्पातून पाणी सोडले की हा मार्ग पूर्णपणे बंद होतो.

गावकऱ्यांनी अनेक वेळा या ठिकाणी पूल उभारण्याची मागणी केली आहे. अनेक अधिकारी आणि जनप्रतिनिधींनी पाहणीही केली, परंतु आजतागायत पूल उभारण्यात आलेला नाही. जर पुलाचे बांधकाम झाले असते, तर या मायलेकीचा जीव वाचला असता, अशी भावना सध्या ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

* **लातूर, दि.४, नोव्हेंबर -**

खाजगी क्षेत्रातील नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्ह समूहाचा भाग असलेल्या बजाज फायनान्स लिमिटेडने यंदाच्या सणासुदीच्या काळात ग्राहक कर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे जाहीर केले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत उपभोक्ता कर्जांचे प्रमाण २७ टक्क्यांनी, तर मूल्य २९ टक्क्यांनी वाढले आहे. जीएसटी सुधारणा आणि वैयक्तिक आयकरातील बदलांचा यावर सकारात्मक परिणाम झाल्याचे कंपनीने सांगितले.

## प्रणव बेदमुथा यशस्वीरीत्या सीए परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४, नोव्हेंबर -**

लातूर येथील लालबहादुर शास्त्री कॉलनी, आर्वी येथील रहिवासी सुरेखा व सुनील बेदमुथा यांचे कनिष्ठ सुपुत्र प्रणव बेदमुथा याने सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या सनदी लेखापाल (सीए) अंतिम परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

बेदमुथा परिवार मूळचे निलंगा तालुक्यातील हाडोळी येथील असून, प्रणव हा हाडोळी गावचा पहिला सनदी लेखापाल ठरला आहे. कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्याने ही अवघड परीक्षा उत्तीर्ण करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल त्याचे संतोष कोटेचा, लालबहादुर शास्त्री गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन राजेश डुंगरवाल, जैन संघाचे अध्यक्ष विपीन कोचेटा, डॉ. उदय देशपांडे, घेवरजी कोचेटा यांनी अभिनंदन केले आहे.

# २०४७ पर्यंत भारत होईल विकसित देश : मंत्री ॲड. आशिष शेलार

### केशवराज विद्यालयात श्रीमद्भगवद्गीतेचे सामूहिक पठण...

### विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे शेलार यांच्याकडून कौतुक...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४, नोव्हेंबर -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम आणि कुशल नेतृत्वाखाली भारत प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट २०४७ रोजी स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करताना भारत हा विकसित देश म्हणून जगासमोर उभा राहील, असे प्रतिपादन राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

लातूरच्या केशवराज विद्यालयात वैकुंठ चतुर्दशीच्या निमित्ताने आयोजित श्रीमद्भगवद्गीता सामूहिक पठण कार्यक्रमास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या १२ व १५ व्या अध्यायांचे सामूहिक पठण करून उपस्थितांचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना ॲड. शेलार म्हणाले, संस्कार हे छोट्या-छोट्या कृतींतून घडत असतात. विज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या




युगात विद्यार्थ्यांच्या संस्काराची वीण मजबूत असणे अत्यावश्यक आहे. गुरुजन आणि आई-वडील यांच्या संस्कारांनीच विद्यार्थी समृद्ध बनतात. पंतप्रधान मोदी यांनी श्रीमद्भगवद्गीता हा राष्ट्रीय ग्रंथ म्हणून घोषित केला आहे. आज लातूरच्या केशवराज विद्यालयातील सामूहिक पठण ऐकून उद्याचा भारत कसा असेल याची झलक दिसते, असे त्यांनी नमूद केले.

तसेच वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने राज्य शासनाच्या वतीने एक विशेष उपक्रम राबविला जाणार आहे, अशी माहितीही ॲड. शेलार यांनी दिली.

या वेळी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण सरदेशमुख यांनी केले. त्यांनी विद्यालयात गेल्या तीन वर्षांपासून श्रीमद्भगवद्गीता पठणाचा उपक्रम राबविला जात असल्याचे सांगितले. पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर यांच्या सुमधुर वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, महेश कस्तुरे, डॉ. मनोज शिरूरे, रेखा पुरी, शिवाजी हेंडगे, अवंती कुलकर्णी, संपत पाटील, सुधीर धुतेकर यांसह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, महेश कस्तुरे, राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, तसेच अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, शैला कुलकर्णी, कांचन तोडकर आणि शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.